मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.


स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुररस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत



प्रा. भवानीशंकर श्रीधर पंडित

जन्म २८-४-१९०६

निधन २१-१-१९७८

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

फेब्रुवारी–मार्च, १९७८

अनुक्रमणिका



डॉ. आष्टीकर स्व. श्रीपाद कृष्णांच्या प्रतिमेला पुष्पमाला घालताना
(वि. सा. संघ शाखा, खामगांव).



कै. पद्माकर डावरे एकांकिका स्पर्धा पारितोषिक वितरण समारंभ.

अनुक्रमणिका

' महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ ' पुरस्कृत विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

फेब्रुवारी-मार्च १९७८
माघ-फाल्गुन १८९९
संपादक
वि. बा. प्रभुदेसाई
सहसंपादक :
शिरीष गोपाळ देशपांडे

मूल्य तीन रुपये) (वर्ष ३३, अंक ११-१२

प्रा. भ. श्री. पंडित यांचे निधन

सुप्रसिद्ध मराठी साहित्यिक प्रा. भवानीशंकर श्रीधर पंडित यांचे त्यांच्या नागपुरातील राहत्या घरी वयाच्या ७२ व्या वर्षी, दि. २१–१–१९७८ रोजी निधन झाले. जुन्या पिढीतील एक ख्यातनाम प्राध्यापक, वक्ते, कवी आणि आधुनिक मराठी कवितेचे जाणकार समीक्षक या नात्याने प्रा. पंडितांची कीर्ती उभ्या बृहन्महाराष्ट्रात सर्वदूर पसरलेली होती. संस्कृत आणि इंग्रजी प्रमाणेच प्रा. पंडितांचा हिंदी साहित्याचा उत्तम व्यासंग होता. 'श्रीकबीरवचनावली' हा त्यांचा काव्यानुवाद प्रसिद्धच आहे. त्यांची शिशुगीते देखील एके-काळी महाराष्ट्रात अत्यंत लोकप्रिय झाली होती. प्रा. पंडितांची वाङ्मय संपदा ही विविधतेने नटलेली असून गुणवत्तेच्या दृष्टीनेही ती समृद्ध आहे. आधुनिक मराठी कवितेची त्यांनी केलेली समीक्षा आणि काव्यांचे संपादन हे आजही प्रमाण मानले जाते. यावरून प्रा. पंडितांचा या क्षेत्रातील अधिकार सिद्ध होतो.

नागपूर विद्यापीठाच्या स्नातकोत्तर मराठी विभागाचे पहिले विभाग प्रमुख या नात्याने प्रा. पंडितांनी या विभागाला जी प्रतिष्ठा प्राप्त करून दिली त्याविषयीची जाणीव ठेवून विद्यापीठाने प्रा. पंडितांचे उचित असे स्मारक करण्याचा संकल्प जाहीर केला आहे.

प्रा. पंडित हे नागपूर विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषदेचे, त्याचप्रमाणे १९[illegible] साली खामगाव येथे भरलेल्या विदर्भ साहित्य सम्मेलनाचे अध्यक्ष होते. प्रा. पंडितांनी आपल्या अध्यापन कौशल्याने व मार्गदर्शनाने उभा केलेला शिष्य परिवार व [illegible] यांच्या नेमक्या भावना सौ. आशा [illegible] यांच्या प्रस्तुत अंकातील लेखातून प्रभावीपणे व्यक्त झाल्या आहेत. [illegible] असाच तो करुण प्रसंग असून [illegible] पंडितांना [illegible] उद्गारला असेल.

'मी जाता राहिल कार्य काय ?'

[illegible] प्रा. पंडितांना [illegible] विद्यार्थी आणि [illegible] सहकारी [illegible], [illegible] पूर्वक [illegible] प्रा. पंडितांच्या निधनामुळे [illegible] मराठीच्या अध्यापकांचा आधार [illegible] असल्याने दुःख [illegible] आहे.

प्रा. पंडितांच्या स्मृतीला वि. सा. [illegible] आणि [illegible] विनम्र [illegible]

अनुक्रमणिका

प्रा. पु. शि. रेगे दिवंगत झाले

मराठीतील नामवंत साहित्यिक व वर्धा येथे भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्राचार्य पुरुषोत्तम शिवराम रेगे, यांचे त्यांच्या ६७ व्या वर्षी मुंबई येथे आकस्मिक निधन झाले. हिमसेक, फुलोरा, गंधरेखा, दुसरा पक्षी इत्यादी त्यांचे कविता संग्रह, मनवा हा कथा संग्रह, रेणू व सावित्री या कादंबऱ्या आणि 'छांदसी' हा समीक्षाग्रंथ हे मान्यता पावलेले आहेत. 'छंद' या त्यांच्या द्वैमासिकाने मराठी वाचकांची अभिरुची संपन्न केली. प्रा. रेगे यांचे सुरुवातीचे समीक्षा लेखन 'युगवाणी' मधूनच प्रसिद्ध झाले होते याचेही येथे आवर्जून स्मरण द्यावेसे वाटते. श्री. पु. शि. रेगे यांच्यासारखा तोलमोलाचा साहित्यिक युगायुगातून एखादाच निर्माण होतो. त्यांच्या वाङ्मयीन कामगिरीची स्वतंत्रपणेच दखल घ्यायला हवी. कै. रेगे यांच्या आत्म्याला वि. सा. संघाची कृतज्ञतापूर्वक श्रद्धांजली.

डॉ. आष्टीकर व डॉ. वर्णेकर यांची साहित्य अकादमीवर नियुक्ती

वि. सा. संघाचे अध्यक्ष डॉ. मधुकरराव आष्टीकर व नागपूर विद्यापीठातील संस्कृत विभागाचे प्रमुख डॉ. श्री. भा. वर्णेकर यांची दिल्लीच्या साहित्य अकादमीवर येत्या पाच वर्षांसाठी सदस्य म्हणून नियुक्ती झाल्यामुळे विदर्भातील साहित्यिकाना प्रतिनिधित्व करण्याची संधी प्राप्त झाली आहे.

डॉ. आष्टीकर व डॉ. वर्णेकर या उभयतांचे या सन्मानाबद्दल व्यक्तिशः हार्दिक अभिनंदन !

अंतरंग

आशा सावदेकर / **स्मृतिक्षण वेचताना**

'श्री शारदे ! रंगले रंगती वा तुझ्या सेवनी जे तवोपासक
ह्या सत्कवींच्या – तुझ्या पाइकांच्या पदींचा असे हीन मी सेवक'

अशा आत्यंतिक लीनतेनं स्वतःचा उल्लेख करणारे वैदर्भीय कवी आणि काव्यसमीक्षक प्रा. भ. श्री. पंडित यांचे २१ जानेवारी, १९७८ ला निधन झाल्याची वार्ता अैकली आणि मनात प्रश्न अुभा राहिला, आता मनात अुभ्या राहाणाऱ्या नवनव्या शंकांचे निरसन पित्याच्या मायेनं कोण करणार ? काहीही कळलं नाही की जावं सरांकडे ही सवय लागलेल्या मनाला क्षणभर सारं जग झाकोळल्यासारखं वाटलं. सरांच्या अनेक विद्यार्थ्यांना नक्की असंच वाटलं असणार. वास्तविक सरांनी मला तसं कॉलेजात शिकवलं नाही की मी सरांच्या हाताखाली काम केलेलं नाही. पण तरीही वेळोवेळी ज्यांच्या प्रेमळ मार्गदर्शनाचा लाभ झाल्यानंतर निराशल्या मनाला प्रकाश मिळावा अशा त्यांच्या जवळच्या ज्ञानपिपासू परिवारापैकीच मीही अेक होते. माझ्या आजोबांपासून पंडितांचं आमच्या घराशी आणि घरातल्या लहान थोर माणसांशी नातं जुळलेलं. मी जेव्हा कविवर्य तांब्यांच्या कवितेवर संशोधन करायचं ठरवलं त्यावेळी तर ह्या संबंधाला 'सोनिया सुगंधु' यावा असं वाटलं. पण त्यावेळी पंडितांचे प्रकृतिस्वास्थ्य बिघडलेले होते. हाताखाली २–३ विद्यार्थीही होते. त्यांनी मला सल्ला दिला की तू डॉ. प्रभुदेसाअींकडे जा. रजिस्ट्रेशन झाल्यानंतर तांब्यांबाबतचे मार्गदर्शन मी तुला करीनच पण गाइड म्हणून डॉ. प्रभुदेसाअीच चांगली मदत करतील. मी थोडी घुटमळलेली पाहून सर म्हणाले – "हे पाहा, मार्ग आपला आपणच निवडायचा असतो. त्यातले काटेकुटे, दगडधोंडे यांमुळे ठेचा लागू नयेत याची काळजी घेणारा तो मार्गदर्शक. वाट तर आपणच शोधलेली असते नं ?" त्यांच्या सांगण्याप्रमाणे मी डॉ. प्रभुदेसाअी यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधनाचे काम करण्यास सुरुवात केली. डॉ. प्रभुदेसाअींच्या सुयोग्य मार्गदर्शनाबरोबरच पंडितांच्या प्रेमळ व विद्वत्ताप्रचुर संभाषणसाह्याने मी माझी वाट शोधू शकले. केव्हाही जावे सर हसतमुखाने 'या या' म्हणत. बैठक अशी रंगे की २–३ तास कसे गेले तेच कळू नये. भा. रा. तांब्यांच्या काव्यातील संगीतावर अेक प्रकरण लिहायचे होते. मला तर संगीतातला श्रीगणेशाही ठाऊक नाही. मी सरांना फोन करून माझी अडचण सांगितली. संध्याकाळी सर स्वतः घरी आले. सोफ्यावर ऐसपैस मांडी घालीत मला कागद पेन घेण्याची खूण केली. आणि तांबे कविता कशी म्हणत याचे प्रात्यक्षिक करून दाखवायला सुरुवात केली. डाव्या हाताने सोफ्यावर ताल धरीत अुजवा हात हलवीत त्यांनी म्हणायला सुरुवात केली 'या वेळी, माश्या, ये रमणां' **'या वेळी ये माझ्या रमणा'** असं नाही कारण संगिताचा ताल चुकतो; आणि 'ये रमणा' शब्दातली आर्तता कमी होते. कित्येक जुन्या नाट्यगीतांच्या–स्त्रीगीतांच्या चाली, त्यांवर तांब्यांच्या काव्याची उभारणी; हे अगदी हावभावासहित सांगितले. माझ्या अभ्यासाला लगेच नवी दिशा मिळाली.

कविवर्य तांब्यांच्या अभ्यासाबाबत कोणा कोणा जाणकारांना भेटावे अशी विचारणा केली तर सरांच्या डायरीतले २५-३० माळव्यातले पत्ते तयार ! इंदौर-ग्वाल्हेर, अुज्जैन इथे आम्ही पोचण्याआधीच त्या त्या व्यक्तींना सविस्तर पत्राने कल्पनाही दिलेली ! सरांच्या कामातला हा व्यवस्थितपणा संशोधन कार्यात मला खूप काही शिकवून गेला.

माझा अभ्यास चालू असतानाच प्रा. भ. श्रीं. चा **'तांबे आणि त्यांचे गीतिकाव्य'** हा ग्रंथ प्रकाशित झाला. योगायोगाने नागपूरच्या 'तरुण-भारता' करिता त्याचे परीक्षण करण्याचे काम माझ्याकडे आले. पंडितांना हे कळताच त्यांनी अधिकारवाणीने सांगितले - 'गोड-गोड लिहू नकोस. जे पटलं नाही ते का

पटत नाही हे सांगता आलं तर चुका सांगायलाही मागंपुढं पाहू नये अभ्यासकानं !' सरांचे हे बोल त्यांच्याच पुस्तकाबाबत नव्हे तर जेव्हा जेव्हा परीक्षण लिहिण्याची वेळ येते तेव्हा तेव्हा मैलाच्या दगडासारखे माझ्या वाटेवर कोरलेले असतात. मी निर्भीडपणे पुस्तकातल्या अेक-दोन त्रुटी दाखवल्या तर सरांनी त्यावर माझ्याशी भरपूर मनमोकळी चर्चाही केली. असा अुमद्या मनाचा विद्वान समीक्षक लाखात अेखादाच ! १४ मार्च, १९७६ रोजी विदर्भ संशोधन मंडळात प्रा. भ. श्री. पंडितांचे छायाचित्र लावण्यात आले. त्यावेळी 'तरुण-भारता'ला मी अेका छोट्या चौकटीचा मजकूर दिला. पण काही अडचणींमुळे त्यांच्या त्या सन्मान-प्रसंगी मला हजर राहता आले नाही. कार्यक्रम संपताच सर माझ्या घरी आले आणि आवर्जून आपल्याला मजकूर आवडला हे शाबासकी देत सांगितले. अशी प्रेमळ शाबासकीची थाप पाठीवर पडावी म्हणून मी बरंच लिखाण केलं. मला पीएच. डी. मिळताच सरांचा आशीर्वाद घेण्यासाठी त्यांच्याकडे गेलो असताना त्यांचा गहिवरलेला प्रेमळ चेहरा अजून मला आठवतो. वृद्धावस्था आली तरी नवनवे संकल्प करणारी त्यांची अुमेद तरुणांना लाजविणारी होती. माझे आजोबा कै. नी. ब. भवाळकर यांच्या अप्रकाशित व प्रकाशित स्फुट वाङमयावर मी पुढे संशोधनपर लिहावं असं मला सरांनी सुचविलं आणि स्वतः मार्गदर्शन करू अशी कबुलीही दिली. पण काळाला जणू ती गोष्ट मंजूर नव्हती. सरांच्या प्रेमळ मार्गदर्शनाचा लाभ यापुढे होणार नाही याचं दुःख फार मोठं आहे.

वास्तविक सरांच्या आमच्या नियमित भेटीगाठी. पण त्यांच्या मृत्यूपूर्वी ते आजारी असताना स्वतःच्या प्रकृतिअस्वास्थ्यामुळे अेकदाही मी त्यांची भेट घेअू शकले नाही. त्यांची सगळी पुस्तकं हेही त्यांचं प्रेमळ मार्गदर्शन आहेच. त्यांनी केलेली काव्यसमीक्षा ही मराठी समीक्षाक्षेत्रात वेगळी पडणारी आहे. अैतिहासिक दृष्टीने, कालानुसार किंवा संप्रदायानुसार विभागणी करून अशा रीतीने ते समग्र आधुनिक मराठी कवितेकडे पाहात नाहीत; तर प्रत्येक कवीच्या व्यक्तित्वाने मराठी काव्य प्रवाहात कोणती आगळीवेगळी भर घातली याचा विचार करणारी समीक्षा भ. श्रीं. नी लिहिली. **'केशवसुत : पाच चिंतनिका'** लिहिताना केशवसुतांची चिंतनिका भारतीय तत्वज्ञानापेक्षा इमर्सनशी कसे जवळचे नाते सांगते हे चिकित्सक दृष्टीने सांगून कुशल संपादन आणि मार्मिक संशोधन यांचा आदर्शच त्यांनी पुढील पिढीसमोर ठेवलेला आहे. **'संचय'** व **'संनिचय'** यांतील लेखांतून टेकाडे, बोबडे या वैदर्भीय कवींच्या काव्यावर आणि घंटय्या नायडूसारख्या विस्मृत झालेल्या पण महत्त्वाच्या कवीच्या काव्यावर प्रकाश टाकून भ. श्रीं. नी मोलाची कामगिरी बजावली आहे. **'समग्र केशवसुत'** व **'अुघडि नयन'** या संपादनातून केशवसुत आणि रेंदाळकर यांच्या काव्यकामगिरीचे नेमके मूल्यमापन भ. श्री. करून जातात. 'रामणीयक' कवितेसंबंधीची त्यांची संकल्पना 'अुघडि नयन' च्या दीर्घ प्रस्तावनेतच त्यांनी मांडली आहे.

भावगीत, नाट्यकाव्य, शिशुगीत, मुक्तक यांची नेमकी वैशिष्ट्ये विशद करून 'आधुनिक मराठी कवितेचा पट' त्यांनी अुलगडला आहे. **'आधुनिक मराठी कवितेचे प्रणेते भाग १–२'** यांतून बी, तांबे, विनायक व दत्त या महत्त्वाच्या पण पाच महान कवींमध्ये समावेश न केल्या गेलेल्या कवींच्या कृतींचे त्यांनी सुयोग्य मूल्यमापन केलेले आहे.

'महाराष्ट्राच्या जीवनातील स्थित्यंतरे आणि त्यांचा साहित्यावर व संस्कृतीवर झालेला परिणाम' अशी न. चिं. केळकर स्मारक व्याख्यानमाला त्यांनी १९६८ साली गुंफली होती. त्यातून त्यांनी मिळविलेली मौलिक माहिती, विदग्ध रसवृत्ती आणि पुरावे देअून विषयाची मांडणी करण्याची त्यांची हातोटी या गोष्टींचा प्रत्यय आल्याखेरीज राहात नाही.

'पिचलेला पावा', **'सुवास आणि रस'** व **'अुन्मेष आणि उद्रेक'** यांतील त्यांच्या काव्यातून किंवा **'चवथीचा चांद'** सारख्या बालगीतसंग्रहातूनही त्यांचे हेच व्यक्तिविशेष प्रकट होतात—

अर्थ केवळ ये अवगता मनाला
कळे मधुमधुता कथुन का कुणाला ?

अनुक्रमणिका

असं जे ते तांब्यांच्या काव्याबाबत म्हणतात तेच त्यांच्या काव्याबाबत म्हणता येईल. त्यांची कविता तांब्यांप्रमाणे मधुगामिनी आहे पण तांब्यांची पूर्ण अनुगामिनी मात्र नाही.

'भावांचे धागे-मुरडुनी गोफ गुंफिला गे' अशी भावतरंगिणी आहे त्याचप्रमाणे शाश्वत भावनांचे दर्शन घडविणारी मनोहारिणीही आहे—

'क्षणमात्रच केवळ तू रमणी
पण युगायुगांची तू जननी'

तांब्यांनी ज्या अभिनेय आणि शिशूंप्रमाणे वागडणाऱ्या शिशुगीतांची गुंफण केली तीच नाद, ताल, अर्थ यांनी युक्त पण बालांच्या थयथयणाऱ्या आनंदी वृत्तीला साद घालणारी बालगीते गुंफण्याची वृत्ती भ. श्रीं. च्या बालगीतांत दिसते—

'यू यू यू यू पपी पपी
खेळू आपण लपाछपी
लपेन मी सांदीत असा
हुडकुन मज तू काढ कसा!'

भ. श्रीं. च्या निधनाने निरागस बालगीते, संवेदनात्म भावगीते अशा दोन्ही क्षेत्रांत अप्रतिहत संचार करणारा कवी आणि रसज्ञ काव्यमीमांसक आपल्यातून अुठून गेला आहे. सरांच्या स्मृतीला विनम्र आदरांजली वाहून त्यांच्या दिव्य आत्म्याला शेवटची शंका विचारावीशी वाटते, 'सर' तांबे स्मृतिदिनाच्या दिवशी श्रीपाद डोंगरे यांच्या निवासस्थानी आपली भेट झाली होती. आपण आपलं शिशुगीत म्हटलं होतं—

'अहा! सानुकली सान पिले छान
जुळी भावंडे अेक! दोन! तीन!
शेवरीच्या अुवदार विछान्यात
माअुलीला बिलगून झोपतात
नसे यांना मुळि काळजी कशाची
कोणतेही नच दु:ख यांस जाची!'

पण 'सर' तुमच्या मायेच्या अुबदार कोटरात आमच्या सारखी पिलं तुमच्या ज्ञानाच्या चाऱ्याची वाट पाहात चोची अुघडत असताना तुम्ही अचानक निघून गेलात. आता आम्हाला ज्ञानचारा चोचीत देणारा वत्सल ज्ञानमहर्षी पुन्हा कसा भेटणार? आपल्या सहवासात ज्ञानसंचय करताना आनंदात गेलेले दिवस संपले.. 'आता पुन्हा येणार नाहीत'!

'गेले ते दिन! गेले ते दिन!'

⊗ ⊗ ⊗

अनुक्रमणिका

द. वा. महाजन / **विदर्भाचा 'महिपती' अनंत कवी**

महाराष्ट्राच्या संतकवींची परंपरा वरीच प्राचीन आहे. ती अकराव्या-बाराव्या शतकापासून आजतागायत अखंडित चालू आहे. या संतांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही समाजाला आपल्या मूळच्या उदात्त ध्येयापासून यत्किंचितही विचलित न होऊ देता, आपल्या सनातन भागवत धर्माचा झेंडा शतकानुशतके फडकत ठेवण्याचे असामान्य राष्ट्रकार्य केले.

या महाभागांनी राज्यक्रान्तीच्या पूर्वी धर्मक्रांती घडवून आणली. पुढे झालेली राज्यक्रांती ही पूर्वी झालेल्या धर्मक्रांतीचा व समाजक्रांतीचाच परिणाम होय, हे आता इतिहासज्ञ मान्य करू लागले आहेत. जन्ममूलक क्षेष्ठत्व, वर्णभेद, संप्रदाय, पारंपारिक दुष्टचाली, आचार हे हळू हळू पार बदलले. जो खरोखरच आचरणाने शुद्ध, मनाने पवित्र, ज्याचे अंतःकरण शुद्ध तोच खरोखर श्रेष्ठ असे नवीन नैतिक वळण त्या काळी लागले. निस्सीम भक्तिभाव तेच खरे पुण्यस्थान. हे तत्व प्रत्यक्ष आचरणात येऊन फार मोठी धर्मक्रांती झाली. याच क्रांतीतून साधुसंत व तत्ववेत्ते समाजाच्या सर्व स्तरांतून, कमल पुष्पाप्रमाणे वर आलेल्या सर्व निस्वार्थी संत मंडळाने महाराष्ट्रभर भागवत धर्माचा प्रसार केला. खेडचापाडचात अगदी अंत्यजापर्यंत अठरा पगड जाती मधून लक्षावधी लोकांना मार्गदर्शन केले.

संतांमधील अग्रणी नामदेव (शिंपी), (गोरा कुंभार), सावता (माळी), सेना (न्हावी), नरहरी (सोनार), चोखामेळा व बंका (महार), रोहिदास (चांभार), संताजी (तेली), तुकाराम (मराठा कुणबी), फार काय? पश्चात्तापाने शुद्ध झालेल्या वेश्या-कान्होपात्रा, पिंगला, दासी (शूद्र), जनाबाई, बहिणाबाई, वेणूबाई, अशी वंदनीय मंडळी आहे. एवढेच नव्हे तर काही हिंदु धर्मावर प्रेम करणारे मुसलमान संतही आहेत. या थोर संतांनी दैवी शक्तीच्या सामर्थ्याने या राष्ट्राचे पुनरुत्थान केले. याच संतांनी भक्ती, ज्ञान, वैराग्य यांची निष्ठापूर्वक जोपासना करण्याकरिता प्रसंगी जीवाचे मोल दिले. श्रीज्ञानेश्वरानंतर, रामदासी पंथ, नाथ पंथ, पंढरपूरचा वारकरी पंथ, इत्यादींचा झपाटचाने प्रसार होऊन धर्माची मूलतत्वे महाराष्ट्राच्या सात्विक भूमीत खोलवर रुजली गेली. पुराणिक, बैरागी, कीर्तनकार, गोसावी, गोंधळी व शास्त्री यांनी या नवजागृतीचे लोण देशाच्या कानाकोपऱ्यात पोचते केले. माणसाचा रडकेपणा संसारातून निघाला पाहिजे म्हणून 'अवघाची संसार सुखाचा करीन' ही प्रतिज्ञा त्यांनी केली. प्रपंच हा परमार्थापासून वेगळा नाही याचे निष्ठापूर्वक धडे दिले. यांतील बहुतेक संत संसारी होते. त्यांनी समत्व, शांती, अनासक्तता आदी सद्‌गुणांचे बीज पेरून भक्ति-ज्ञान-वैराग्याचे मळे पिकविले—

> अभक्त ब्राह्मण, जळो त्याचे तोंड ।
> काय त्याची रांड प्रसवली ।।
> वैष्णव चांभार, धन्य त्याची माता ।
> शुद्ध उभयता कुळजाती ।।

अशा वैष्णव भक्तांचा, खऱ्या देवाचा खरा अंतरंगी उपासकाचा जिव्हाळचाचा भक्त म्हणून 'उदो-उदो' केला. त्यांनी जातीची निंदा कुठेही केली नाही. केली निंदा ती खोटचाची!

याच संत-मालिकेतील अनंत कवी हे अज्ञात पण मोलाचे माणिक होय. त्यांचा "भक्तरहस्य" हा ओवीबद्ध, अप्रसिद्ध, हस्तलिखित काव्यग्रंथ, भक्तिरसाने, उदात्त विचारांनी उत्कृष्ट व काव्यमय वर्णनाने जागजागी नटलेला आहे, हे ग्रंथ वाचल्यावाचून पूर्णपणे लक्षात यावयाचे नाही.

अनंत कवी

संत कवींच्या परंपरेस अनुसरूनच अनंत कवीने स्वत:विषयी या ग्रंथात फारशी माहिती ग्रथित केलेली नाही. संत कवी स्वत:बद्दल फार उदासीन असतात. अनेक उत्कृष्ट संत कवींची नावेही अद्यापि उपलब्ध झालेली नाहीत, हे विद्वानांस सांगावयास नकोच. 'भक्त रहस्य' या ग्रंथात उल्लेखिलेली संक्षिप्त माहिती अशी :—

हा कवी, संतकवीची पुण्यभूमी अशा मराठवाड्यातील परभणी गावी जन्मास आला. त्याचे वडील सेटेपणाचा धंदा करीत. तो जातीने 'विश्वकर्मा' होता. लहानपणातच त्याचे मन संसारातून उठले. त्याला भक्तीची ओढ लागली व परमार्थाचे वेड लागले. देवाचा ध्यास लागला. तो म्हणतो—

कढ नयेचि अग्निविण ।
रड नयेचि मायेविण ।
तैसा, भक्तिविण, देव कैंचा ।। १ ।।

भक्तीवाचून परमेश्वरप्राप्ती नाही हा दृढ संकल्प करून त्याने तन्मयतेने कठोर साधना केली.

तोच पुसदच्या पुच्छ नदीच्या ओसाड वाळवंटात खेचरी मुद्रेत ध्यानस्थ असलेले सद्‌गुरू त्याला दिसले. त्यांच्या समोर अनंत कवीने लोटांगण घातले. गुरू प्रसन्न झाले व त्यांनी कवीला उपदेश देऊन धन्य केले. त्या गुरूचे नाव 'रामानंद' ते बृहस्पतीसारखे 'ज्ञानी' व शुक मुनीसारखे 'योगी' होते. यापेक्षा जास्त माहिती उपलब्ध नाही. रामानंदांनी अनंत कवीला 'आचार्य' पदाची उपाधी अर्पण केली. याच अनंतकवीने श्रीधर कविकृत "हरीविजय" या ग्रंथाची नक्कल केलेला ग्रंथ 'शारदाश्रमात' आहे. त्या हस्तलिखिताच्या शेवटी खालील महत्वाची माहिती आढळते :—

"हस्ताक्षर अंतोबा आच्यार्य । उपनाव रोडे ।। पूर्वजांची वस्ती प्रभणी । वृत्ति सेटेपणाची । हे पुस्तक त्याचे असे ।। श्री सद्‌गुरू मातापिता ।। वरदहस्त तयाचा ।। १ ।। ६ ।। पाण पासे सहेहत्तर ।। ५७६ ।। कागज दस्ते साहा ।। ६ ।। संपूर्णमस्तु ।। ५९।।"

या वरून या कवीचे नांव अंतोवा रोडे असे होते हे स्पष्ट आहे.

"भक्त रहस्य" हा रसाळ चरित्र-ग्रंथ शके १७११ (इ. स. १७८९) सौम्यनाम संवत्सरात श्रावण शुद्ध द्वितीयेस लिहून पूर्ण झाला. 'शारदाश्रम संग्रहांतील या ग्रंथाची हस्तलिखित प्रत विसाजी भीकदेव वैद्यराज, रा. पातूर, शेखबाबू यांच्या हस्ताक्षरात आहे. ग्रंथात ३२ अध्याय असून, एकूण ४८५५ ओव्या आहेत.

महाराष्ट्रीय संत-मंडळ

या ओवीवद्ध चरित्र ग्रंथात जवळ जवळ पंचवीस-तीस संतांचा उल्लेख आलेला आहे. त्यांपैकी प्रमुख तेवीस संतांची चरित्रे अत्यंत प्रासादिक वाणीतून उतरलेली आहेत. त्यात बहुतेक संत अज्ञात आहेत. त्यांची नावे अशी :—

(१) देवाजी ब्राह्मण, गिरोलीकर, (२) गंधर्वाचा अवतार तानसेन, ग्वाल्हेर (हा महाराष्ट्रा-वाहेरील अपवादभूत संत होय), (३) जिवाजी कुणवी-भोजलेकर (पुसद), (४) कान्होवा कारंजकर (अन्नदानाविषयी सुप्रसिद्ध), (५) विश्वनाथ देव, चंद्रपूरकर, (६) संगय्या जंगम वसमतकर (पुढे कारंजा), (७) पद्माजी वंजारी शिरपूरकर (वाशीम), माहूरकर उदारामराजे या घराण्याचा उद्धारकर्ता, (८) लोलींबराज-पैठणकर, (९) रुद्रभट सकलकळे-बाळापूरकर, पुढे शेगाव, (१०) संत चोखोवा महार, मेहूणकर (विदर्भ), (११) कलगा महार, पिंपरीकर (दारव्हा), (१२) रुद्रनाथ खेडकर (रिद्धपूर), (१३) वावाजी दर्यापूरकर (दिवाण केशोपंतांचे मामा), (१४) केशोपंत दिवाण, दर्यापूरकर, (१५) नाना महाराज पातूरकर, (१६) अंबूजी सावळीकर (वाळापूर), १७) शेखवाबू, पातूरकर, (१८) वहिनाबाई

उरगकर (पंढरपूर), (१९)ल्खमाप्पा जितूकर, (२०) येल्होबा सुतार, आडविहीर (फत्तेखेर्डा) (सुप्रसिद्ध 'वी' कवींच्या गुरूंचे गुरू), (२१) बाळकराम सिंदखेडकर (मराठवाडा), (२२) मलंग मुसलमान, कारंजकर, याने भगवत्‌गीतेवर टीका लिहिली, (२३) गोपालदेव भीडीकर (औरंगाबाद). यावरून अनंत कवीचा 'विदर्भाचा महिपती' म्हणून उल्लेख करणे किती सार्थ आहे हे लक्षात येईल. हा ग्रंथ अत्यंत प्रासादिक असून त्यात अनेक काव्यगुण जागजागी दृष्टीस येतात. या ग्रंथामुळे १७–१८ व्या शतकातील थोर संतांची नावे, वाचकांच्या प्रथमच निदर्शनाला येत आहेत. या ऐतिहासिक दुर्मिळ माहितीमुळे विदर्भाच्या १७–१८ व्या शतकातील सामाजिक व संस्कृतिक परिस्थितीवर नवीन प्रकाश पडतो यात शंका नाही.

वरील संतांची चरित्रे ऐतिहासिक माहितीने परिपूर्ण आहेत. ही सर्व संतमंडळी भूत काळात होऊन गेली आहे यात शंका नाही. लेखकाने त्यांपैकी अनेक ठिकाणी भेटी देऊन प्रत्यक्ष चौकशी केलेली आहे. मात्र ग्रंथातील पुष्कळसा मजकूर कवीने आख्यायिका, दंतकथा व जनश्रुती यावर आधारलेला आहे. त्यातून दंतकथा कोणत्या व इतिहास कोणता याची हंसक्षीर न्यायाने निवड करणे सूज्ञ वाचकास कठिण जाऊ नये. जुन्या कवींची भाषा, जुन्या मराठी वळणाची, किंचित अशुद्ध परंतु रसाळ व सुबोध आहे. त्यांचे दूर दूरच्या स्थळांचे देशाटन, अवलोकन शक्ती, मनुष्य स्वभावाचे ज्ञान इत्यादी पाहून मन थक्क होते. या ग्रंथातील काही स्थळांची वर्णने अतिशयोक्तिपूर्ण व काल्पनिक आहेत. परमेश्वराच्या अनन्य साधारण शक्तीवर पूर्ण श्रद्धा असल्याने, त्या शक्तीच्या सामर्थ्याशी समरस होण्याचा प्रयत्न करून, सर्व संतांनी केलेल्या अनेक अलौकिक चमत्कारांचे, जागजागी मोठ्या श्रद्धेने व तन्मयतेने वर्णन केल्याचे आढळते. अशावेळी त्या त्या ठिकाणी निव्वळ ऐतिहासिक दृष्टीने पाहण्याऐवजी प्रबुद्ध वाचकांनी त्याची खरी किंमत, भाषा, काव्य व कवित्वशक्ती याच दृष्टींनी करणे रसज्ञतेचे होईल. हा ग्रंथ अत्यंत भक्तिमय अंतःकरणाने लिहिलेला आहे, तो विवेचक दृष्टीने लिहिलेला नाही हे वाचकांनी लक्षात ठेवावे. या कवींची वाणी संपूर्ण सत्य नसली तरी शिव व सुंदर आहे यात शंका नाही.

अनंत कवी हा खरोखरच मोठ्या थोर मनाचा, विशाल हृदयाचा, मानवतेचा भक्त होता. त्याने हिंदू, अहिंदू, मुसलमान, स्पृश्य, अस्पृश्य, यात मुळीच भेद मानलेला नाही, ही गोष्ट चरित्रविषयक संतांची नावे वाचूनच स्पष्ट होईल. जातीने सोनार असून त्याने जितक्या तन्मयतेने ब्राह्मण संतांची चरित्रे लिहिली, तितक्याच आत्मीयतेने, महार, मुसलमान, सुतार, जंगम, स्त्री-पुरुषांची वर्णने करण्यात स्वतःस धन्य मानले. कवीला समाजाच्या अगदी खालील थरापर्यंत मानवाचा आत्यंतिक जिव्हाळा वाटला. अशा तऱ्हेने समाजाच्या सर्व स्तरांतून परमेश्वर पाहणारा हा थोर मनाचा संतकवी होय. हा 'भक्त रहस्य ग्रंथ' म्हणजे मराठी मायबोलीचे एक मौल्यवान लेणे होय.

या कवीच्या जन्मसरितेचा उगम व शेवट दोन्ही अद्यापि अज्ञात आहेत. एव्हढे मात्र खरे की हा कवी पर्यटण करता करता दारव्हा येथे स्थायिक होऊन तेथेच स्वर्गवासी झाला. त्याची समाधी दारव्हा रेल्वेस्टेशन मार्गावर आहे. त्याच्या सन्निध त्याच्याच वंशातील चार पाच इसमांच्या समाध्या दिसतात. दैवज्ञांचा मठ अद्यापि दारव्हा येथे असून त्याचे वंशजही तेथे आहेत. उमरावतीचे स्वराज्याच्या चळवळीच्या वेळी राष्ट्रीय गाणी गाणारे प्रसिद्ध देशभक्त शिवानंद स्वामी हे त्यांच्याच वंशातील होत.

वरील काव्यग्रंथाच्या अंतरंगाचा परामर्ष पुढे केव्हातरी घेऊ. 'भक्तरहस्य' हा ग्रंथ प्रकाशनाच्या वाटेवर आहे एवढेच तूर्त नमूद करतो.

⊗ ⊗ ⊗

अनुक्रमणिका

मराठवाडा साहित्य परिषद

सन्मित्र कॉलनी, औरंगाबाद

मराठी नियतकालिकांच्या इतिहासातील एक महत्वाचे आणि सुजाण वाङ्मयीन दृष्टी घेवून पावशतक वाटचाल करणारे मराठीतील एकमेव मासिक

प्रतिष्ठान

' प्रतिष्ठान ' आता नियमित मासिक स्वरुपात प्रसिद्ध होत आहे

वार्षिक वर्गणी रु. दहा फक्त

वर्गणी पाठवून 'प्रतिष्ठान'च्या वाटचालीत सहभागी व्हा

'प्रतिष्ठान'चे जुने बांधीव अंक उपलब्ध आहेत

संपर्क साधा

आमची प्रकाशने—

दासोपंताची पासोडी : (सं.) न. शे. पोहनेरकर, मूल्य रु. ९-००
तृणाची वेदना : तु. शं. कुलकर्णी, मूल्य रु. २–५०
अपर्णा : शिवाजी गऊळकर, मूल्य रु. ३–५०
'सिनिक'च्या कथा : सिनिक्, मूल्य रु. ३–५०
शांतीपर्वातील कथा : स. मा. गर्गे, मूल्य ३–५०
दासोपंतविरचित ललिताची पदे : (सं.) न. शे. पोहनेरकर, मूल्य ०–७५ पैसे
तिरकट : मुकुंद कृष्ण गायकवाड, मूल्य रु. ३–५०
शल्यपर्व : (सं.) डॉ. यू. म. पठाण, मूल्य रु. ६–००
रामानंद यांच्या संपादण्या : (सं.) डॉ. यू. म. पठाण, मूल्य रु. १–००
रावसाहेबाची कविता : र. लु. जोशी, मूल्य रु. ४–००
रिचर्डस्‌ची कलामीमांसा : नरहर कुरुंदकर, शिवाजी गऊळकर, मूल्य रु. ४–००
गंधवेणा : गजमल माळी : मूल्य रु. १–५०
राज्यव्यवहार कोष : रा. गो. काटे, मूल्य रु. १–५०
गीतार्थबोध चंद्रिका : (सं.) भगवंत देशमुख, मूल्य रु. ४–००

नुकतीच प्रसिद्ध झाली—

(१) **झळाया कथासंग्रह** गणेश धांडगे : मूल्य रु. १२–००
(२) **आरोह : कवितासंग्रह :** भ. मा. परसवाळे : मूल्य रु. ७–००
(३) **स्वरोवर : कवितासंग्रह :** लक्ष्मीकांत प्रामाणिक : मूल्य रु. ७–००
(४) **मराठी भाषेचा आर्थिक संसार** (भाषाशास्त्र), अशोक केळकर

आगामी—

(१) **मैफिल : कवितासंग्रह :** कृष्णचंद्र ज्ञाते

दत्तराम परशुराम इंगोले / **दलित साहित्य संमेलनातील साहित्यविचार**

दलित साहित्य संसदेतर्फे दिनांक १४ व १५ जानेवारी, १९७८ रोजी दुसरे दलित साहित्य संमेलन संपन्न झाले. दोन दिवसांचे हे संमेलन वडाळा, मुंबई, येथील सिद्धार्थ विहारमध्ये उभारलेल्या 'कवी केशवसुत नगरा'त यशस्वीरीत्या पार पडले.

प्रारंभी पहिल्या दलित साहित्य संमेलनाचे मावळते अध्यक्ष डॉ. म. ना. वानखडे यांनी संमेलनाची सूत्रे प्रा. गं. बा. सरदार यांच्याकडे सुपूर्द केली.

प्रा. गं. बा. सरदार यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात पुढील विचार मांडले. "आधुनिक काळात एकंदर मराठी साहित्य अनेक प्रतिभावंत लेखकांच्या लेखनाद्वारा विस्ताराने व गुणवत्तेनेही विकसित होत आले आहे. परंतु हे साहित्य उच्चवर्णीय पांढरपेशा मनोवृत्तीच्या पाशातून मुक्त होऊ शकलेले नाही. देशातली परिस्थिती झपाट्याने बदलत आहे. शतकानुशतके कुचंबलेले थर बंधमुक्त होत आहेत. त्यांच्या व्यथावेदनांची व आशाआकांक्षांची समरसतेने दखल घेण्याची वृत्ती या साहित्यात आढळून येत नाही. एकीकडे आत्यंतिक व्यक्तिवाद व दुसरीकडे पुनरुज्जीवनवाद या दोन प्रवृत्तींमध्ये बहुतांशी बंदिस्त झालेल्या मराठी वाङमयाच्या प्रांगणात, स्वत:च्या ज्वलंत जाणिवा आणि ध्येयवाद यांना स्थान नाही असे वाटून दलित साहित्यिकांनी बंडाचे निशाण उभारले तर ते स्वागतार्हच मानायला हवे."

दलित साहित्याची प्रेरणा

"मनुष्याचे मनुष्यत्व हिरावून घेणाऱ्या प्रस्थापितांशी संघर्ष ही दलित साहित्याची प्रेरणा आहे. मनुष्यमात्रांच्या नैसर्गिक हक्कांची पायमल्ली करणाऱ्या सांस्कृतिक परंपरेच्या संदर्भात विद्रोह हे त्याचे एक प्रमुख प्रेरक तत्व आहे. डॉ. आंबेडकर हे या लेखकांचे स्फूर्तिस्थान आहे," असे सांगून प्रा. सरदार पुढे म्हणाले, "वास्तवात मूलगामी परिवर्तन कसे घडून येते याचा या दलित लेखकांनी विचार करायला हवा. क्रांती हे एक शास्त्र आहे. अन्यायाबद्दल कितीही चीड आली तरी तेवढ्याने अन्यायकारक परिस्थिती बदलत नाही. त्यासाठी भावनेला शास्त्रशुद्ध ज्ञानाची व वस्तुनिष्ठ विचारांची जोड हवी. दलित समाजातील लेखकांनी ललित वाङमयाप्रमाणे विचारप्रधान वाङमयाच्या निर्मितीकडेही लक्ष पुरवले पाहिजे. वैचारिक लेखन करू इच्छिणाऱ्या लेखकांनी मात्र आपला व्यासंग शास्त्रशुद्ध व अद्ययावत ठेवण्याची दक्षता घेतली पाहिजे. या बाबतीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा उज्ज्वल आदर्श सर्वांच्या समोर आहे."

दलित साहित्यिकांची सामाजिक बांधिलकी

"नवोदित दलित साहित्यिकांच्या लेखनामध्ये न्यूनगंड, दुबळेपणा, अगतिकता यांचा लवलेशही दिसत नाही. त्यांच्या शब्दाशब्दांतून जिवंतपणाचा प्रत्यय येतो. या लेखकांमध्ये वाङमयीन दृष्टी आहे. पण त्याबरोबरच त्यांच्या ठिकाणी सामाजिक बांधिलकीही आहे. योग्य दिशा लाभून सर्व बाजूंनी विकास होत राहिल्यास या साहित्याचा एकंदर मराठी साहित्यावर दूरगामी परिणाम घडून आल्याखेरीज राहणार नाही," असे सांगून प्रा. सरदार पुढे म्हणाले, "दलित लेखक सामाजिक बांधिलकी मानतात, साहित्याच्या स्वायत्ततेचे तत्व त्यांच्या या भूमिकेला पोषक आहे. या तत्त्वाला कोणत्याही प्रकारे बाध येऊ नये म्हणून साहित्यिकांनी सदैव जागरूक राहिले पाहिजे.

अनुक्रमणिका

याचा अर्थ त्यांनी परंपरागत नियमांनी व संकेतांनी स्वतःला बांधून घेतले पाहिजे असा नाही. कलावस्तूतच तिला अभिनव रूप देणारे नियम अंतर्भूत असतात. त्यांचा शोध घेऊन त्यानुसार दलित लेखकांनी आपले साहित्य निर्माण केले पाहिजे."

प्रा. सरदार शेवटी म्हणाले, "दलितांच्या विरोधी साहित्याची चळवळ जेव्हा अधिक प्रभावी व आक्रमक होईल, सामान्यजनांना कार्यप्रवण व प्रतिकारक्षम वनविण्याचे सामर्थ्य जेव्हा तिच्या अंगात येईल तेव्हा समाजातील प्रस्थापितांच्या ठेकेदारांना तिची दखल घ्यावी लागेल. प्रथम ते या चळवळीचे कौतुक करतील. वडिलकीच्या नात्याने आशीर्वाद देऊन त्यांच्या विद्रोहाची धार कमी करण्याची खटपट करतील. वस्तुतः अशातऱ्हेची कौतुकाची भावना ही दलित साहित्याला कमीपणा आणणारी आहे. म्हणून तिच्यावद्दल उदासीन राहणे हेच श्रेयस्कर, मात्र कोणी सहकार्याचा हात पुढे केला तर त्याचे स्वागत केले पाहिजे."

"दलित साहित्याने प्रारंभीच लोकांचे लक्ष वेधून घेतले आहे. कादंबरी, नाटक, कथा, साहित्यसमीक्षा अशा वेगवेगळ्या प्रकारांनी यापुढे त्याची द्रुतगतीने वाढ झाली पाहिजे. पुनरुज्जीवनवादी प्रवृत्ती सध्या विविध स्वरूपांत डोके वर काढीत आहे तेव्हा तेजस्वी क्रांतिकारक साहित्याची आज विशेष गरज आहे. असे साहित्य दलित लेखक निर्माण करतील आणि समाज क्रांतीच्या लढ्यात ते सदैव आघाडीवर रहातील," अशी अपेक्षा व्यक्त करून प्रा. गं. वा. सरदार यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणाचा समारोप केला.

उद्घाटक म्हणून लाभलेले नामदार श्री. दादासाहेब रूपवते यांनी आपल्या भाषणात सांगितले, "दलित साहित्यिकांना प्रकाशात येता यावे, समान प्रश्नांची चर्चा करता यावी, त्यांच्या कलाकृतीचे आईच्या मायेने कोडकौतुक व्हावे, निव्वळ ह्यासाठी देखील खास वेगळी साहित्य संमेलने भरवावी लागली तर त्यात वावगे काय आहे हे मला कळत नाही." दलित साहित्याला संत चोखोवाने आधीच सांगून ठेवलेला 'उस डोंगा परि रस नोहे डोंगा' हा मानदंड लावला पाहिजे असे सांगून उपेक्षितांशी बांधिलकी माणणारे साहित्य व साहित्यिक 'दलित' साहित्यिक ठरतील, असेही त्यांनी म्हटले.

दलित साहित्याच्या उत्पत्तीची मीमांसा करताना ना. रूपवते यांनी सांगितले, "कोणत्याही काळी 'नवे' येते ते कोठून येते ?——भांड्यातले पाणी तापते ते कसे तापते ? आधी पाण्याचा खालचा थर तापतो, हलका वनतो, वर येतो नि वरचे थंड म्हणून जड असलेले थर खाली जातात आणि मगच तापतात. भांड्यात घुसळण-मंथन सुरू होते नि मग सारे पाणी तापते. समाजरूपी भांड्यातले पाणीही ह्याच विज्ञान-नियमाने तापते. आज भारतीय समाजात सगळ्यात खालचा थर तापून वर येतो आहे असे दिसते. त्यात अनैसर्गिक व वावगे काय ? ही साहजिक प्रक्रिया आहे, आणि म्हणूनच जे काही 'नवे' साहित्य क्षेत्रातही येत आहे ते तळच्या थरातून प्रथम उगम पावणार हे गृहीत धरले पाहिजे. ह्याचा अर्थ मात्र असा नव्हे की, जीवनाच्या इतर क्षेत्रांवद्दल नव्या दृष्टीचे काही नवे साहित्य लिहिले जाणारच नाही !"

या दुसऱ्या दलित साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष श्री. मधुकरराव तुपलोंढे यांनी आपल्या स्वागतपर भाषणात पुढील विचार मांडले :—

"दलित साहित्याच्या वाटचाला जसा गौरव आला आहे तशी कमालीची निंदाही झाली आहे." अशी सुरुवात करून पुढे दलित कवितेच्या संदर्भात वोलताना ते म्हणाले, "दलित कविता पिवळणुकीचा पुरस्कार करणाऱ्या पुराणकथांचा कटाक्षाने अव्हेर करते. म्हणून राधाकृष्ण ही प्रतिमा प्रेमभावना व्यक्त करण्यासाठी दलित कवितेत कदापीही येत नाही. कारण कृष्ण हा केवळ प्रेमिकच नाही तर एका शोषणकर्त्या सत्तेचा पुरस्कर्ताही आहे. दलित कवितेत हे भान लक्षणीयपणे आढळते."

(पृष्ठ २४८ वर पाहा)

आधार हवा. कसं गरगरतं आहे. विजेच्या पाळण्यावर बसल्यावर असंच गरगरत होतं. डोळयांसमोर अंधारी, पोटात ढवळणूक आणि डोक्यात सन्नाटा. अशीच केव्हातरी प्रदर्शनीत पाळण्यावर बसले होते तेव्हा असाच . . असाच अनुभव आताही अनुभवतो आहोत आपण. एखादा खांब तरी हवा होता या हॉलला. पण सारे खांब लांब आहेत आपल्यापासून. कांक्रीट पिलर्सवरची ही इमारत. खांबही त्या भितीशी कसे एकरूप झाले आहेत.

पलंगापासून फक्त चार फुटांवर मी उभी आहे. त्या तिकडे कोपऱ्यात टेबल आहे आणि तिथे मेरीनं ठेवलेल्या गोळया आहेत. बरोबर चार वाजता घे म्हणून बजावून गेली आहे ती. पण घडयाळ कुठे आहे ? भितीतल्या रॅकमधलं ते घडयाळ आपल्याला दिसतच नाही. दोन्ही काटे कसे एकमेकांच्या विरुद्ध धावताना दिसताहेत. सपाटून, आणखी सपाटून.

हरे राम ! असं काय होतय आपल्याला. कशीतरी लडखडत टेबलापर्यंत तर पोहोचलो आपण. आता डाव्या हातात टॅब्लेट घ्यायची आणि उजव्या हातानं तोंडात पाण्याचा घोट सोडायचा. पण बोटं अशी बधीर का झालीत ?

ही गोळी म्हणजे विष थोडंच आहे ? मेरी सांगून नाही का गेली, चार चार तासांच्या अंतरानं एकेक 'टॅब्लेट' घ्यायची only for relaxation उद्या सकाळी साडेदहालाच तुला मोकळी करते take it easy.

उद्या सकाळी साडेदहालाच मला मोकळं व्हायचंय. कशातून ? अनौरस संततीच्या जाचातून. पुढे होणाऱ्या जाचातून. सुधारलेल्या समाजाच्या पोटात माझं हे बाळ खुपेल. ते खुरटेल. त्याची वाढ खुंटून जाईल आणि एक दिवस ते जगातून नाहीसं होईल. कायमचं किंवा तो मवाली बनेल, गुंडा बनेल, डाके घालील, चोऱ्या करील.

कदाचित . . कदाचित खूप मोठंही होईल. चंद्रासारख्या . . ग्रहावर झेप घेईल . . देशाचा पंतप्रधान . . एखादा महान संशोधक, तत्ववेत्ता, लेखक. काहीही होऊ शकेल. 'No, No, I don't want future' आत्ता. या क्षणाला मला काय हवं ? काय हवं मला ?

सुचत नाही. टेबलावरच्या त्या गोळया आपल्या लाल डोळयानं माझ्याकडे पाहात आहेत. पाठीमागचा पलंग मला आपल्याकडे ओढतो आहे. मी अशी दोन्ही हातांची वल्ही वाऱ्यावर उभी करून पायांवर कशीबशी उभी आहे. या कुशीतून त्या कुशीत हळूच सरकलेला गोळा माझे दोन्ही हात खाली आणतो आणि डोक्यातलं चक्र एकदम थांबतं. पोटावर हात तसेच हळुवरपणानं फिरवीत मी पलंगाकडे एका झेपेत वळते. त्याच्यावर आडवी होत, उशीवर डोकं टेकवून छताकडे बघत राहाते.

काय हवं मला ? गवसलं का ? होय. मला मोकळं व्हायला नको आहे. मला समाजाची प्रतिष्ठा .

धोंडयात जावो, ती . . साला बदमाश समाज . . ह्या समाजाची ऐशीतैशी

सबूर. असे रांगडी पुरुषी शब्द तुझ्या तोंडात शोभत नाहीत . . तुझा देह किती आरवार ! तुझी वाणी किती मधुर ! तुझा चेहरा लाख लाख गुलाबांची फुलं कुस्करून बनवलेला. गालाचे गुलाब जामून अलगद तोंडात सोडावे आणि गपकन गिळावे इतका मगजदार.

कसं कोण म्हणालं होतं आपल्याला ? 'इश्य' ! त्यावेळी त्या शब्दानं आपण विरघळलो होतो बत्ताशासारखं. त्याच्या मिठीत कसं धुसमटून गेलो होतो. काळावेळेचं भान नव्हतं. होती फक्त मिळा-ल्याची जाणीव.

होय. ती मिळविण्यासाठी हातात एक बॅग घेऊन भर दुपारचं आपलं ते एकटं निघणं. कॉर्नर-वरून बस निघून गेली आणि आपण जो इतके दिवस शोधत होतो त्याला कवटाळायला निघालो. एका हाकेच्या अंतरावरच तर आता ते उभं आहे. पावलं जमिनीवर ठरतच नव्हती. फाटकातून आत शिरले. बापरे ! केवढं मोठं आवार. दोही बाजूंना आंबा, चिंच, चिकू आणि सीताफळांची झाडं. मधला सहाफुटी रस्ता आणि त्या रस्त्याच्या टोकाला एक बंगली.

चौकीदार वगैरे कोणीच दिसत नाही. आजूबाजूला सामसूम. कदाचित व्हरांड्यात उभे असतील आपली वाट पाहात. हीच वेळ दिली होती आपल्याला. पण हे काय ? समोरचं दारही बंदच. दारावरचा तो पिवळा हळद्या पेंट दात विचकून हसतोय चकचकीत.

व्हरांड्याच्या पायऱ्या चढले. दारावर ठकठक. पण आतून आवाज नाही. बाजूला असलेल्या बेलवर बोट ठेवलं. आत कुठेतरी गर्भात किणकिणलं. एक. .दोन. .तीन. .चार. .पाचव्या मिनिटाला दार उघडलं. माझ्या घड्याळाच्या सेकंद काट्याकडेच मी पाहात होते नं.

'ये. वाटच पाहात होतो मी तुझी.'

भारदस्त. पिळदार दंड. तांबूस वर्ण. माझं अंग एकदम शहारलं. 'हे आपले बॉस'. त्याच्या पाठमोऱ्या व्यक्तिमत्वावर माझे लोहचुंबकी व्यक्तिमत्व चाल करू लागले. एक–दोन–तीन दालनं केव्हाच पार झाली. चवथ्या दालनाच्या कोपऱ्यातल्या अंतपु:रात आम्ही येतो. बॉस मागे वळतात व आपल्या दणकट मनगटानं माझ्या मागचं दणकट दार लावतात.

मला घामावर घाम फुटतो. नदीची लाट लाटेवर चढावी तसा चढता लोट.

'घाबरलीस ? बैस.'

मी अंग चोरून कोचावर बसते. ते मोठ्यानं हसतात. आपल्या पांढऱ्याशुभ्र धोतराच्या सोग्यानं माझा घाम टिपतात. यावेळी ते माझ्या अगदी निकट बसले आहेत. केव्हा ? कसे ? मधले टप्पे मला आठवतच नाहीत.

'इथं कोणकोणती कामं करावी लागणार याची कल्पना असेलच तुला ?'

'हो' माझा घुसमटलेला आवाज.

'जाहिरातीत लिहिल्याप्रमाणे माझी काळजी घेणारं मला कोणीतरी हवं आहे. माझ्याजवळ सगळं असूनही मी एकटा आहे. मी. '

' ते सगळं त्याच दिवशी सांगितलंत मला. पूर्ण निर्णय घेऊनच मी आले आहे. मला तुमच्या-कडून.

'काय हवं तुला माझ्याकडून ?' आपले भेदक डोळे बारीक करून त्यांनी माझ्याकडे पाहिलं. मी कशासाठी आले ह्यांच्याकडे ? मी क्षणभर पापणी खाली झुकवली. बॉसनं माझ्या हनुवटीला हात घालून माझं तोंड.

माझा मनातला प्रश्न अनुत्तरीतच राहिला. मी विरघळले. त्यांच्या प्रत्येक कृतीला उत्तरं देत बसले. बेफाटपणानं, बेफामपणानं. . .

'My dear, wait a minute, first I will fulfil our contract and then we will contact ourselves' बॉसनं माझं डोकं हळुवार हातानं दूर केलं. हात लांबवून माझ्यासमोर एक टाईप केलेला कागद आणि त्याला पिन्ड केलेली ती जाहिरात धरली.

"एका विधुर श्रीमंत गृहस्थाला त्याची सर्वतोपरी काळजी घेणाऱ्या स्त्रीची आवश्यकता आहे. विना अपत्य विधवा किंवा प्रौढ कुमारिकांनी अर्ज करावा."

यावेळी ही जाहिरात कशासाठी ? ही जाहिरात पाहूनच तर मी अर्ज केला होता. त्याप्रमाणं ते माझ्या खोलीवर मला भेटायला आले होते. मला त्यांनी पसंत केलं होतं. पत्नी म्हणून नाही only for caretaker. मी त्यांच्यावर लट्टू झाले होते. मला भूक शमवायची होती. पैशाची. शरीराची. आणि त्याहीपेक्षा तीव्र अशी गरज. .कोणती गरज ? 'हे काय ?'

"Please sign here"

मी त्यांच्याकडे पाहात होते. तेवढयात त्यांनी माझ्या हातात पेन दिलं. वाकून माझे ओठ आपल्या ओठात....

आणि मी धुंद हातानं सही करून टाकली. ते कागद त्यांनी गादीखाली सरकावले आणि.

त्या आठवणीनं मला चीड येतच नाही. उलट कसे गोड गोड शहारे येतात. तो माझ्यावरचा बलात्कार थोडाच होता. मी आपणहून राजीखुशीनं त्यांच्या छातीवर मान टेकवली होती.

त्या दिवशी विहिरीवर पाणी भरायला गेले. 'बॉसला' सकाळीच गावाला जायचं होतं. त्यांना भाजी-पोळी करून द्यायची होती. पाण्यात बादली बुडवायला म्हणून विहिरीत डोकावले. छातीत धडकीच भरली. एक मोठ्ठा साप पाण्यात पडलेला. घटकेत तळाशी जायचा घटकेत वर यायचा. सुळकन पाण्यावर आल्या आल्या खबदाडीत तोंड खूपसून श्वास घ्यायचा, पुन्हा सरसर खाली जायचा. धैर्यानं मी थोडावेळ पाहात राहिले. तो पाण्यात सोडलेल्या बादलीच्या जवळ आला आणि माझे दोरावरचे हात सुटले. मी मागे झुकले. माझा पाय निसरडीवरून घसरला आणि धुणंभांडी करायच्या चौकात मी धपकन आदळले.

एक जीवघेणी कळ...पण हाका कोणाला मारू. .दूर आऊट हाऊस मध्ये राहणाऱ्या चुलत सासूबाई अजून उठल्याच नव्हत्या.

चुलत सासूबाई ! त्यावेळी सुद्धा त्या नात्याच्या कल्पनेनं मी हसले. मी बॉसची बायको कुठे आहे? 'only caretaker' पगारावर राबणारी एक नाजूक क्षणी मी त्यांना विचारलं होतं 'मी तुमची कोण ?'

'My sweet Lover माझं सर्वस्व.'

'पण बायको नव्हे, असंच की नाही ?'

'करून टाकू. गळयात चार काळे मणी अडकवले की झाली बायको.'

आत्ता घसरून पडलेल्या क्षणी मला आठवली त्यांची ती चुलती. .नंतर बॉसचे आश्वासन नंतर बॉस.

त्यांना उठवायचं का ? पण त्यांना असं उठवलेलं आवडत नाही. ते आपण होऊन उठेस्तोवर.

मी पुन्हा विहिरीत डोकावले. गुढघा खरचटला होता. कुल्ल्यातून कळा येत होत्या. तो साप पुन्हा खाली जात होता व वर पाण्यावर तरंगत होता.

मी धुण्याच्या दगडावर विसावले. .माझी स्थिती त्या पाण्यात पडलेल्या सापासारखीच. वर येता येत नाही. आधार सापडत नाही. श्वास घेता येत नाही.

मीही एका सापाचीच अवलाद. सगळेच साप काही चावणारे थोडेच असतात ! पण सरपट आणि पलायन हे दोन गुण सापाचे अविभाज्य घटक. अशाच एका दात नसलेल्या सापाच्या पोटी. .माणूस नावाच्या सरपटणाऱ्या–भिऊन पळणाऱ्या, विळात लपणाऱ्या–सापाच्या पोटी–मी जन्मले.

सापाची जात कोणती होती हे मलाच माहीत नाही. सर्पीण आपली अंडी खाते. पण मी. अंड्यानंच सर्पिणीला खाल्लं. तिनं आपलं पोट फाडलं आणि मला या जगात लोटलं.

अनुक्रमणिका

माझा पहिला 'टँहा' सुद्धा तिनं ऐकला की नाही कोण जाणे. तिच्या देहाचं वस्त्र फाडून तिचा प्राण स्वजातीत मिसळला. मीही माझ्या स्वजातीत सरपटू लागले. नुकताच जन्मलेला गोळा आणि पडलेलं पत्नीचं प्रेत दूर लोटून जन्मदात्यानं पलायन केलं. आणि त्या सूतिकागृहात मीही पळू लागले.

जीवनाच्या मागे. जगण्याच्या मागे.

जीवन तरी कसलं—लाचारी—हेळसांड हिडीस फिडीस. आदळ आपट.

सूतिकांच्या डब्यातून उरलेल्या अन्नावर, त्यांनी फेकलेल्या फाटक्या कपड्यांवर आणि बिच्चारी! शद्बांच्या भांडवलावर.

सूतिका गृहातील महान कार्यकर्त्यांचा भरवंशावर जगात आलेला जीव जगत होता. त्या अनाथांच्या नाथ बनल्या होत्या.

सभोवतालच्या अथांग पाण्यात मी तळापासून पृष्ठभागापर्यंत अथक फेऱ्या मारीत होते. प्राणवायू घेण्यासाठी कपारीवर विसावत होते. मी शिकत होते. वाढत होते. मोठी होत होते. एकेक अवयव फुलत होता. गुदमरत होता. मला अनाथ मुलीला आश्रय मिळत होता. तरी मला जे हवं होतं ते मिळत नव्हतं! काय हवं होतं मला?

'तुला आता नोकरी शोधायला हवी! तुझ्या स्वतःच्या पायावर उभं राहायला हवं! तुझं वय आता वाढलं आहे. तुझा भार संस्थेला आता पेलवणार नाही' कार्यकर्त्यांचा तो निर्णायक इशारा.

त्या दिवशी मेरीच्या मांडीवर तोंड खुपसून आपण खूप रडलो. त्या केरळीय नर्सने आपल्या काळ्या सावळ्या हातांची मला सावली केली.

मेरी! माझी चहाती. थोडीशी आश्रयदातीही. मी मायपोट सोडलं आणि आश्रयासाठी या बाळंतगृहात राहिले. मेरीनं मायपोट सोडलं आणि पैशासाठी ती ह्या बाळंतिणीच्या आश्रयाला येऊन राहिली. या दोनचार वर्षांचाच तिचा माझा सहवास. तिनं मला खोलीवर राहायला बोलावलं. सहानुभूती दाखवली.

सहवास! सहानुभूती! त्यांनी का माझं पोट भरणार? माझ्या भुकेला आता असंख्य फांद्या फुटल्या होत्या. लांब लांब, फांद्या.

भूकेची एक, फांदी होती पैशाची!

मेरीनं खटपट केली. मला स्वतःचं पोट भरता येईल अशी नोकरी मिळाली. मी आता स्वतंत्र खोली घेऊन राहू लागले. स्वातंत्र्याची माझी भूक शमवू लागले. मला जे हवं ते खरेदी करू लागले. पण मला काय हवं होतं? जे मिळत होतं त्यानं मी सुखी होती का? 'मी रात्री बिछान्यावर पडले की असंख्य खरखरीत जिभा मला आपल्या चाटत असायच्या. त्या जिभांना डोळे फुटलेले असायचे. आणि ते डोळे मला भोसकत असायचे.'

'रस्त्यानं जाताना, नोकरीवर असताना, बाजारात हिंडताना, सर्वत्र विकार मला दिसायचा. तो विकार कधी माझ्या हृदयातल्या विकाराला आंजारायचा गोंजारायचा. कधी ओरबाडायचा तर कधी विकल, हतबल करायचा.

आणि या अनेक फांद्या फुटलेली मी मुळाला पक्कं धरून बसलेली असायची. पैशाची भूक हा मोठा थोरला बुंधा होता मला कवटाळायला.

नोटीस. .नोटीस. .टेंपररी नोकरी. .टर्मिनेशनची नोटीस. पुन्हा कुठे जायचं. बाळंतिणीच्या तेलकट वासात की मेरीच्या मदनमस्त सुवासात. साप पुन्हा विहिरीतल्या विहिरीत तळापासून पृष्ठापर्यंत हेलपाटे घालू लागला.

आणि ती जाहिरात. . . माझ्या अनेक भुका पुरवणारी जाहिरात. पोटाची व शरीराची भूक भागवणारी जाहिरात. सावली आणि विश्रांती देणारी जाहिरात.

ह्या जाहिरातीला असंख्य वाकडे काटे होते. बोरीच्या फासासारखे.

बोरीचा फास. . .बोरीच्या फांद्या एकाला एक बांधून केलेला बोरीचा फास.

एव्हाना बॉस उठून आले होते. सापाची गोष्ट त्यांना कळली होती. त्यांची चुलती पण आऊट हाऊस मधून बाहेर आली होती.

माणसं जमा झाली. जाणत्यानं बोरीच्या फासाला दोरी बांधून तो विहिरीत सोडला. जीवाच्या आकांतानं फेऱ्या मारीत असलेला साप आश्रय सापडताच श्वास घ्यायला म्हणून क्षणार्धात फांदीला वेटोळी देऊन बसला. आणि फसला. बोरीच्या हुका सारख्या फासात. मला त्या सापाच्या जागी मीच दिसू लागले आश्रयानं जीवन जगणाऱ्या सापासारखी. अडकलेली. फसलेली.

फास वर ओढून उलटा फेकला. साप निसटला. पळू लागला. धरा, ठोका, मारा, चेचा आणि संपलं.

मी घरात आले. मागून बॉस आणि त्या वुलत साधूबाई. आणि मी कोलमडलेच. जीवघेणं दुखणं सुरू झालं. मी गडबडा लोळू लागले.

दोघांची कुजबूज. बॉसचा थंडपणा. त्या बाईची ती रोखलेली नजर आणि नंतर फोनची फिरवलेली डायल.

ॲम्बुलन्सने हॉस्पिटलमध्ये त्या दोघांनी आणून घातले. माझ्यामागे बॉसचे नाव लावायला त्यांनी परवानगी नाकारली. वाटलं त्या कुत्तरडाच्या तोंडावर थुंकावं. त्याला ओरवाडावं, चावे घ्यावे.

पण. . .असहाय्य अवस्था. वाटलं, या मनस्तापामुळे बांध फुटावा त्यात ह्या पळपुट्या सापाचं अंडं वाहून जावं. मी मुक्त व्हावं.

असं घडलंच नाही. बांध फुटता फुटता वाचला. त्यातल्या अंड्याला जीवदान मिळालं. डिस्चार्जचा दिवस उगवला. मी फोन करून बॉसल विचारलं 'मी घरी येऊ का?'

'कोणाच्या घरी? तुझा माझा फक्त दोन महिन्यांचा करार होता. मे आणि जून. तुझी करारावर सही आहे. दोन महिन्यांचा चेक पाठवून देतो.'

'पण मी तुमच्याकडे एप्रीलच्या १ तारखेलाच आले. तीन महिने झाले आहेत मला.'

'फुलीश! मे १ ते ३० जून पर्यंत माझ्याकडची सर्व्हिस होती तुझी I can't help'. फोन खाडकन बंद झाला. जणू माझ्या कानशिलात भडकावली त्यांनी. संताप! संताप! काय करू? कसं करू? वरून देह झोकून द्यावा का? मग हे माझ्या पोटांतील अंडे! ते पिचणार फुटणार. नाही. नाही. मला हे नको आहे? मग काय हवं मला?

मी मेरीला फोन केला. मी तुझ्या आश्रयाला येते.

पुन्हा मेरीचा आश्रय. कार्यकर्त्यांची मुलाखत. त्यांची विचारपूस 'तू आम्हाला न विचारता त्याच्याकडे गेलीच कशी? आमचा सल्ला का घेतला नाही?'

पुन्हा त्यांची धावपळ. बॉसची भेट. गळ घालणे. धाक दाखवणे.

पण त्या पळपुट्या, सरपटणाऱ्या वेडूकखाऊ सापानं करारपत्र दाखवून आपली सुटका करून घेतली.

आता मेरीपासून अवघ्याजणी माझ्या मागे लागल्या आहेत. गर्भपात करवून घे. कायद्याचा आधार घेऊन मोकळी हो.

आधार, आश्रय या भावना कधीच गळून पडल्या आहेत माझ्या. भुकेच्या काही फांद्या जीर्णशीर्ण होऊन तुटून पडल्या आहेत. वासना आता संपल्या. पोट काय कुठेही भरीन मी. पुलाखाली राहूनसुद्धा

भरीन. वॉसनं जो मार्ग दाखवला तोही चोखाळायला आता मी मोकळी आहे. स्वतंत्र राहण्याच्या कल्पना-सुद्धा आता झडून गेल्या आहेत. महारोगानं झडाव्या तशा.

आणि मेरी म्हणते, 'तुला मोकळी करते. म्हणजे तुला जीवन जगण्याचा मार्ग सापडेल. तू मुक्त होशील.' नको मला बंधनातच राहायला आवडेल. मला मुक्तता नको.

मग काय हवं मला ? जीवन जगायला हवं आहे नं ? मग काढून टाक तो गर्भ.

माझा गर्भ मी काढून टाकू ? नाही. ह्या जगात माझा म्हणून म्हणायला तोच तर माझ्या एकटीचा आहे. माझ्या एकटीचा. माझी सोबत करणारा. माझी सोबत स्वीकारणारा. सापडलं. मला काय हवं ते मला सापडलं.

मला सोबत हवी आहे. जी मला जन्मदात्यांनी दिली नाही. आश्रयदात्यांनी दिली नाही. पैशानं दिली नाही. वॉसच्या शरीरानेही दिली नाही. ती सोबत मला मिळाली. ती मी नष्ट करणार नाही. तिला घेऊन दुनियेची सैर करीन. दुनियेची.

मेरी ! गुडबाय, कार्यकर्त्यांनो हे घ्या तुम्ही बांधलेलं दिखावटी मंगळसूत्र. मी माझ्या पोटातलं. पोर घेऊन निघाले. ही पाहा जिना उतरून वळलेसुद्धा.

⊗ ⊗ ⊗

(पृष्ठ २४२ वरुन)

कारण नसतानाही दलित लेखकांत कलह उभे केले जात आहेत असे सांगून श्री. तुपलोंढे म्हणाले, "वौद्ध, दलित, प्रबुद्ध, आंवेडकरी प्रेरणेचे, मार्क्सवादी असे नाना प्रकारचे साहित्य आहे असे वाद उपस्थित केले जात आहेत. विचार, तत्वज्ञान, शास्त्रे, ही एखाद्या वादाचा पुरस्कार करीत असतात. परन्तु सृजनात्मक दलित साहित्य हे एखाद्या वादाचा पुरस्कार करीत असतात: परन्तु सृजनात्मक दलित साहित्य हे एखाद्या वादाचा कसा काय पुरस्कार करील ? 'रात्र वैऱ्याची आहे जागा रहा' असे दलित साहित्यिकांना मला उच्च कंठरवाने सांगावेसे वाटते," अशी आंतरिक तळमळही त्यांनी व्यक्त केली.

शेवटी संमेलनाध्यक्ष प्रा. गं. वा. सरदार यांच्या हस्ते दलित साहित्यविषयक ६ पुस्तकांचे प्रकाशन झाले. कविवर्य श्री. अर्जुन डांगळे यांच्या आभारप्रदर्शनानंतर दलित साहित्य संमेलनाच्या महत्वपूर्ण पूर्वार्धाची सांगता झाली.

या संमेलनात महत्वाच्या विषयांवरील परिसंवाद, चर्चा आणि कविसंमेलन याही कार्यक्रमांचा अंतर्भाव होता.

⊗ ⊗ ⊗

भा. त्र्यं. परांजपे / प्राचीन भारतीय महायुद्धे आणि रणनेतृत्व

" Old events have modern meanings "—*James Lowell*

दाशराज्ञ युद्ध, राम-रावण युद्ध आणि कुरु-पांचाल युद्ध ही तीन प्राचीन महायुद्धे आहेत, आणि ती त्याच कालक्रमाने लढली गेली. ऋग्वेदात दाशराज्ञ युद्धाचे वर्णन केलेले आहे. रामायण राम-रावण युद्धाची कथा सांगते. कुरु-पांचाल युद्ध 'जय' नावाच्या छोट्या इतिहासात वर्णन केलेले असून त्याची तपशील-वार हकीकत सुधारून वाढविलेल्या महाभारतात सांगितलेली आहे. रामायण आणि महाभारत या दोन ग्रंथांना पाश्चिमात्य पंडित 'वीरगाथा' Epics म्हणतात, ते यथार्थ आहे.

युद्धाविषयी योगी अरविंद म्हणतात, "War is a psychological necessity. What is within must come out". क्लॉजविट्झ हा जर्मनयुद्ध-शास्त्रज्ञ म्हणतो, "It is part of the intercourse of human race." दुसरा एक विचारवंत म्हणतो, "No war means no culture." हॅरोल्ड लास्की म्हणतो, "War heightens mens souls." निष्कर्ष हा की, मानव हा 'युद्धकाम', भांडकुदळ आहे. आणि त्याच्या उत्क्रांतीत आणि सांस्कृतिक प्रगतीत युद्ध अटळ आहे. म्हणूनच वेदनिर्मात्या ऋषींनी, धनुर्वेदाला–युद्धविद्येला–यजुर्वेदाच्या उपवेदात स्थान दिले आहे. "युद्धशस्त्रास्त्रव्यूहादिरचनाकुशलो भवेत्। यजुर्वेदोपवेदोऽयं धनुर्वेदस्तु येन सः ।।" युद्धात, शस्त्रास्त्रांच्या उपयोगात, व्यूहरचनेत, ज्याने प्राविण्य प्राप्त होते, तो हा धनुर्वेद, यजुर्वेदाचा एक उपवेद म्हणून प्रसिद्ध आहे, असे शुक्रनीती सांगते.

ग्रीकांच्या नगर राज्यासारख्या प्राचीन आर्यांच्या लहान लहान राज्यांच्या नेहमी लढाया होत असत. त्या काळात राजा तोच सेनापतीही असे आणि राज्यांत खडी फौजही नसे. संकटकाळी राज्याकरिता लढणे, हे प्रत्येकाचे कर्तव्य असे. अशा लढणाऱ्यांना 'राजन्य' हे नाव होते. आणि राज्याचा राजा निवडणे, हा त्यांचाच अधिकार असे. "यस्मै वै राजानो राज्यमनुमन्यते स राजा भवति न स यस्मै न ।।" ज्यास राष्ट्राचे रक्षण करणारे राजन्य मान्यता देतात, तोच राजा होतो, दुसरा कोणी नाही; असे शतपथ ब्राह्मणात सांगितले आहे. याच राजन्यांना नंतर क्षत्रिय हे नाव मिळाले.

राजाच्या नियुक्तीविषयी ऐतरेय ब्राह्मणात एक कथा आहे. सुर (देव जमात?) आणि असुर (दुसरी एक जमात ?) यांच्या लढायांत सुरांचे सर्व दिशांना सर्व लढायांत पराभव होऊ लागले. तेव्हा सुर चिंतामग्न झाले. शेवटी त्यांना असे कळून आले की, आपल्यात कोणी राजा (नेता) नाही म्हणून आपल्या लढाया विस्कळित होतात व आपले 'युद्धप्रयत्न' (War Efforts) फुकट जातात. तेव्हा त्यांनी आपल्यापैकी सोमाला राजा (नेता) निवडले आणि युद्धांचा रंग पालटला. ते विजयी होऊ लागले.

ऋग्वेद राजाला सांगतो, "इहराष्ट्रमुधारय" या राष्ट्राची धारणा कर; रक्षण कर, असे सांगत नाही. धारणेत रक्षणाचा अंतर्भाव होतोच. परंतु यथावकाश राज्ये मोठी होत गेली, तशी धारणाही विविध स्वरूपाची आणि विस्तृत क्षेत्रीय झाली. आणि श्रम विभागाच्या सोयीकरिता 'सेनापती', 'रणनेता' वेगळा केला गेला. अर्थात तो अधिपतीचा अंकित होता. क्रमशः त्याला मंत्र्यापेक्षा कनिष्ठ स्थान मिळाले. कारण त्याचा उपयोग फक्त युद्धाकरिताच आणि युद्धापुरताच करून घेणे सुरू झाले. असे असले तरी, कृष्णाला सेनापतीच्या महत्पदाची जाणीव होती. गीतेच्या विभूतियोग नावाच्या अध्यायात 'सेनानीनामहं स्कंदः' असे कृष्ण अर्जुनाला सांगतो. वैदिक आर्यांनी राजाला 'विष्णुपद' बहाल केले आहे. राजा इतक्या मोठ्या

पदाला, कोणत्याही देशाने, सेनापतीला चढवलेले नसले तरी, राजाचे राजेपण सेनापतीच्या कुशल नेतृत्वावरच अवलंबून असते.

धारणा आणि संरक्षण—राजा आणि सेनापती अशी राज्याच्या प्रशासनाची विभागणी झाली असली तरी "नीती शस्त्रास्त्रव्यूहमहि्नति विद्याविशारदाः। सेनाधीपाः सैनिकांश्च कार्या राज्ञा जयार्थिना।।" युद्धात जय मिळवू इच्छिणाऱ्या राजाला आणि सेनापतीला, युद्धशास्त्राच्या सर्व अंगोपांगांचे आणि नीती (राजनीती) यांचे ज्ञान असले पाहिजे, असे शुक्रनीतीत सांगितलेले आहे. वैदिक आर्य राजाला आणि सेनापतीला असे दुहेरी ज्ञान कलियुगाच्या प्रारंभापर्यंत तरी होते. (कुरुपांचाल युद्धाचे अखेरीस कलियुगाचा प्रारंभ झाला, असे संशोधकांनी ठरविले आहे). त्या युद्धातले कौरव पक्षाचे एक सेनापती आणि कौरव व पांडव यांचे पितामह भीष्म, जखमी होऊन शरपंजरी पडले असता, त्यांनी राजधर्म, राजनीती, युद्धधर्म इत्यादी विषयांसंबंधी युधिष्ठिराने विचारलेल्या प्रश्नांना सविस्तर उत्तरे दिली. (महाभारत. शांतिपर्व-राजधर्म पर्व).

वैदिक आर्यांची उपासना 'यज्ञप्रधान' आहे. निरनिराळ्या प्रसंगी निरनिराळ्या मनकामना पूर्ण होण्यासाठी, निरनिराळे यज्ञ सांगितले गेले आहेत. 'राजसूय' यज्ञ आणि 'अश्वमेघ यज्ञ' हे राजकीय आकांक्षा फलद्रूप होण्यासाठी सांगितलेले यज्ञ आहेत. यशस्वी अश्वमेघ यज्ञ, सम्राटपद मिळवून देतो. यशस्वी यज्ञ याचा अर्थ या यज्ञातील यज्ञीय पशू घोडा, मोकळा सोडला जातो. त्याच्याबरोबर ससैन्य एक सेनापती जातो. हा घोडा अडविणारा प्रत्येक पराभूत करीत जाऊन, शेवटी तो घोडा निघाल्या ठिकाणी सुखरूप परत आणणे. यावरून असे दिसून येते की, सेनापतीच राजाला सम्राटपद मिळवून देतो.

युद्ध आणि रण हे जरी समानार्थी शद्ब असले, तरी 'युद्धनेतृत्व' आणि 'रणनेतृत्व' एकच नव्हेत. राजा अथवा देशाचा प्रधान प्रशासक आपल्या पदसिद्ध हक्काने युद्धनेतृत्व करतो. युद्ध सुरू करणे आणि बंद करणे त्याच्या अधिकारात असते. तो युद्धप्रसंगी जातीने हजर असतोच असे नाही. आणि त्याने हजर असले पाहिजे असेही नाही. त्याला युद्धविद्येचे ज्ञान आणि/अथवा कार्यानुभव असतोच आणि असला पाहिजे असेही नाही. (आधुनिक काळात नसतोच) तो न खेळणारा चमुपती (Non-playing captain) असतो. रण-नेत्याची कामगिरी दुहेरी असते. "The function of the Military Leader is duel--to forge the instrument and to wield it." त्याला आपले साधन (सैन्य) घडवावे लागते (युद्धकलेत तरबेज करावे लागते) आणि त्याचा उपयोग करावा लागतो. उपयोग म्हणजे सैन्याचे नियोजन, नियंत्रण आणि मार्गदर्शन. स्वतःच्या शस्त्रास्त्रप्राविण्याचेच फक्त प्रदर्शन नव्हे. एकंदर सैन्यासंबंधीच्या युद्धातल्या आवश्यक आणि उचित गोष्टी करीत असताना, सेनापतीने जरूर तेथे आपले हत्यारही चालवावयाचे असते. ते सैन्याला उदाहरण घालून देण्याकरिता-स्फूर्ती मिळावी! त्याने आपली वैय्यक्तिक खाजगी लढाई (Private and Personal Battle) लढावयाची नसते. त्याने तसेच करीत राहिल्यास, तो सैन्याचे नियंत्रण, नियोजन किंवा मार्गदर्शन यांपैकी काहीही करू शकत नाही. तो फक्त वीर फार तर अनन्यसाधारण वीर येवढेच त्याचे स्थान उरते.

सुदास या भरतकुलोत्पन्न राजाविरुद्ध, दहा निवडक आर्य राजे लढले. म्हणून आर्यांच्या या पहिल्या महायुद्धाला दाशराज्ञ-युद्ध हे नाव मिळाले. दहा राजांच्या दोस्त मंडळात, काही अनार्य राजे सामील झाले असले तरी, हे युद्ध आर्य-अनार्य संघर्ष नव्हता. हे महायुद्ध राजा सुदासाने राजपुरोहित विश्वामित्राच्या उत्तेजनाने केलेल्या अश्वमेघ यज्ञाची प्रतिक्रिया होती. यज्ञाचा घोडा अडविण्याची जरी एक एकट्या राजाची छाती झाली नाही, तरी सुदासाच्या सफल यज्ञाचे शल्य, इतर सर्व राजांना टोचत होते. त्यात सुदास राजवंशाशी जुने परंपरागत वैर असणाऱ्या राजांची भर पडून, सुदासाविरुद्ध एक प्रबळ बळ संगठित झाल्याची खबर समजताच, सुदास गर्भगळित झाला. आणि हे संकट विश्वामित्राचे ऐकल्यामुळे आपल्या अंगावर आले, अशा समजुतीने त्याने विश्वामित्राला राज-पुरोहितपदावरून दूर करुन ते पद वशिष्ठांना दिले. देवांचा

महा पराक्रमी राजा इंद्र वशिष्ठाचा मित्र होता. वशिष्ठांना राजपुरोहित पद देण्यात त्यांच्यामार्फत आपल्याला इंद्राची मदत मिळेल, असा सुदासाला भरवसा वाटला आणि तो खरा ठरला. राजपुरोहितांच्या या पदच्युती-नियुक्तीविषयी डॉ. केतकर म्हणतात, " या युद्धाचा प्रत्यक्ष ऋषीशी संबंध आलेला आहे. याला मोठे ऐतिहासिक महत्व आहे. पुरोहित संस्था राज्यक्रांतीस उपयुक्त ठरली होती."

दाशराज्ञ युद्ध ५० वर्षे चालले. ते परूष्णी (रावी) आणि यमुना या नद्यांच्या परिसरात, निरनिराळ्या ठिकाणी, एक एकट्या राजांच्या फौजांशी सुदासाची सेना आणि सुदासाचा मित्र यांच्याशी झालेल्या लढायांनी लढले गेले. अनेक राजे मिळून किंवा सर्व सेनांचा एक सर्वोच्च सेनापती, अशा पद्धतीने ते लढले गेले नाही. सुदासाच्या मदतीला एकटा इंद्रच आलेला होता. देवांच्या सैन्याचा उल्लेख कोठेही आढळत नाही. इंद्र अतिशय मोठा पराक्रमी वीर होता. त्याचे 'वज्र' हे एक आगळे अमोघ शस्त्र होते. सुदासाच्या सैनिकांनी तलवारी, भाले आणि कट्यारीचा उपयोग केलेला दिसतो. धनुष्य बाणांचा उपयोग आढळत नाही. त्यावरून हे युद्ध प्रत्यक्ष हातघाईचे युद्ध होते असे दिसते. 'पादाति' होतेच यांचाही उल्लेख आढळतो. त्यावरून असे दिसते की, या युद्धाच्या काळात सैन्याची दुसरी दोन घोडे आणि हत्ती, ही अंगे तयार झालेली नव्हती. या युद्धात एक आधुनिक प्रकार केला गेला होता हे विशेष आहे. सुदासाच्या सैन्याला अडथळा करण्याकरिता आणि पाण्यात बुडवून टाकण्याकरिता शत्रूंनी परूष्णी नदीचा बांध एके ठिकाणी फोडून टाकला होता. त्यामुळे पाण्याचा प्रचंड लोंढा आसपासच्या प्रदेशात पसरला. "दुराध्यो अदितिं स्त्रेवयन्तो चेतसो विजगृभ्रे परुष्णीम्" असा ऋग्वेदात उल्लेख आहे.

या युद्धाचे वर्णन ऋग्वेदात आहे त्याअर्थी ते ऋग्वेदाच्या पूर्वी लढले गेले होते. तसेच काही काळानंतर रचलेल्या धनुर्वेदात सांगितलेल्या युद्धशास्त्रानुसार ते लढले गेले नव्हते. या युद्धातल्या विजयाचे सर्व श्रेय इंद्राच्या व्यक्तिगत पराक्रमाचेच आहे. दोस्त मंडळातला शंबर हा शेवटचा शत्रू होता. त्याला इंद्राने ठार केले आणि युद्ध संपले. "सिंह्यं चित्येत्वेना जघान" शेळीनेच शेवटी सिंहाची शिकार केली, असे ऋग्वेद या युद्धाविषयी म्हणतो. त्याचा उलगडा हा की, सुदास ही दहा राजांच्या सामर्थ्यवान सिंहाच्या तुलनेत शेळीच होती. परंतु त्या सिंहाची जी शिकार झाली, ती त्याच्या साह्यकर्त्या इंद्राने आपल्या एकट्याच्या पराक्रमाने केली. या युद्धात रणनेतृत्वाचा प्रश्नच उद्भवत नाही. त्या काळी युद्धविद्या तितकी प्रगत झालेली नव्हती. वशिष्ठाकडेही पर्यायाने या युद्धाच्या यज्ञाचे श्रेय जाते. त्यांच्याशी असलेल्या मैत्रीसाठी इंद्र युद्धात उतरला.

राम-रावण-युद्ध हे दुसरे प्राचीन महायुद्ध. एक पक्ष अयोध्येचा राजपुत्र राम, बंधू लक्ष्मण, मित्र वानर जमातीचा, रामाने राजा बनवलेला, सुग्रीव आणि त्याची सेना; दुसरा विरुद्ध पक्ष लंकेचा राजा रावण आणि त्याची चतुरंग सेना यांच्यात हे युद्ध लढले गेले. हे एक आठवड्याच्या आतच समाप्त झालेले दिसते. काही संशोधक आग्रह धरतात त्याप्रमाणे लंका भारतातच असली तर हे युद्ध भारतीय भूमीवर लढले गेले. अन्यथा ते भारताबाहेर एका बेटावर झाले. काही लोक या युद्धाला आंतरराष्ट्रीय पार्श्वभूमी असल्याचे प्रतिपादन करतात. रावण हा महाप्रबळ क्रूरकर्मा जुलमी राक्षस राजा देवांना आणि मानवांना अजिंक्य झाला होता. त्याने भारताची काही भूमी बळकावून तेथे आपली चौदा हजार राक्षस सेना कायमची स्थापना केली होती आणि ती अतिशय उपद्रवी होती. आधुनिक काळात जिंकलेला मुलुख ताब्यात ठेवण्याकरिता आणि शत्रूवर वचक बसविण्याकरिता फौज ठेवली जात असते. तिला Army of occupation म्हणतात. आपल्या मुख्य सैन्यांच्या किंवा केंद्रीय प्रदेशाच्या संरक्षणाच्या हेतूने आणि शत्रूला शक्य तितके दूर थोपवून ठेवण्यासाठी मोर्चेबंदी केली जात असते. त्या परिसराला fore-most defended locality म्हणतात. रावणाची जनस्थानातली फौज, या कामगिरीकरिता नियुक्त झालेली असेल तर, रावणाला आधुनिक युद्धतंत्रही अवगत होते असे म्हणावे लागेल. किंवा हे युद्धतंत्र नवे नाही असे कबूल करावे लागेल. रावणाच्या या आघाडीच्या फौजेशी त्याचा संपर्क होता (Communication).

रामजन्माच्या आधी दशरथ राजाच्या एका यज्ञप्रसंगी आर्य राजांनी रावणाचे पारिपत्य करण्याचा मनसुबा रचला होता. त्याप्रमाणे पुढे हे युद्ध झाले, असे एक प्रतिपादन आहे. आर्य राजांच्या मनात असा विचार आलेला असेल, परंतु त्यांनी काही निश्चित योजना आखल्याचे, किंवा त्या योजनेचे नेतृत्व कोणावर सोपविले असल्याचे, आढळत नाही. रामाकडे ते असणे शक्यच नव्हते. त्यावेळी रामजन्म झालेलाही नव्हता.

जनस्थानातल्या चौदा हजार रावणसैन्याचा, वनवासी राम आणि लक्ष्मण या फक्त दोघांनीच फडशा पाडला; याचा अर्थ त्यांनी इतके राक्षस वीर मारून टाकले असा नाही. त्यांनी आपल्या अचुक शरसंधानाने खर इषण हे त्या सैन्याचे सेनापती 'टिपले'. ते पाहून राक्षस सैन्याने हार मानून, हाय खाऊन पळ काढला. यात रणनेतृत्वाचा प्रश्नच उद्भवत नाही. सेनापती मारला गेला, किंवा दिसेनासा झाला, म्हणजे सैन्याने पराभव गृहीत धरून जाणे-पळून जाणे, ही खास प्राचीन भारतीय रणरीती भारतीय सैन्याला शेवटपर्यंत शेवटल्या पानिपतापर्यंत पुरली. ती अखंडपणे चालू राहिली. युद्धासाठी रामाने ससैन्य कूच करण्यापूर्वी, हनुमन्ताने रावणाने उचलून नेलेल्या सीतेची भेट घेतलीच होती. त्याशिवाय उत्तम हेरगिरी करून रामाला युद्धोपयोगी माहिती (Tactical Intelligence Report) सादर केली होती. शत्रूशी हात मिळवणी करण्याकरता कूच करण्याला धनुर्वेदाच्या परिभाषेत 'युद्ध यात्रा' किंवा 'स्कंधावार' म्हणतात. इंग्रजीत (Advance to contact) म्हणतात. या यात्रेत मार्गस्थ असलेल्या सैन्याच्या संरक्षणाची काळजी घेणे, हे सेनापतीचे काम असते. येथून त्याच्या रणनेतृत्वाला प्रारंभ होतो. रामाने ते काम योग्य प्रकारे केले होते. त्याने बीनी, आघाडी, बगला आणि पिछाडी, अशा तुकड्या सेनाधिकाऱ्याच्या हुकूमतीखाली नियुक्त केल्या होत्या. त्याशिवाय या संरक्षक फौजेचा मुख्य अधिकारी नील याला मार्गातील शत्रूकडून दूषित आणि विषात्त पाणी, फळे, खाद्यान्न, यांच्याविषयी सावधगिरी बाळगण्याच्या सूचनाही रामाने दिल्या होत्या. पुढे समुद्र पार करण्यासाठी नल आणि नील यांनी एक कच्चा पूल बांधला होता. त्यावरून चालत जाऊन, रामाने लंकेला तिच्या तटबंदीबाहेरून वेढा घातला. वानर वीरांचे तटबंदी फोडून किंवा तटावरून चढून लंकेत घुसण्याचे प्रयत्न यशस्वी झाले नाहीत.

रावणाचा बचावाचा पवित्रा होता. रामाचे सैन्य, पूल बांधीत असताना त्याच्यावर हल्ला चढविण्याचे रावणाला सुचले नाही. यावरून असे दिसते की, त्या काळातही युद्धविद्या प्रगत झाली नव्हती. आणि डावपेचांचाही उपयोग केला जात नव्हता. रावण आपला एक एक सेनापती तटाबाहेर पाठवीत होता. प्रत्येक चकमक तटाबाहेरच झाली. रावण स्वत:ही तटाबाहेर येऊन लढला. तो जखमी झाला असता रामाने त्याला जीवदानही दिले होते. राम लक्ष्मणही जखमी झाले होते. लढताना व्हायचे ते सर्व सोपस्कार सर्वांवर होऊन, शेवटी रामाच्या बाणाने रावण ठार झाला आणि युद्ध संपले.

या सगळ्या लढायांत, रामाने कोणालाही मार्गदर्शन केले नाही. लंकेच्या तटाच्या निरनिराळ्या दरवाजांवर, सुग्रीवाचे दुय्यम वीर लढत होते, तेथे राम किंवा सुग्रीव कोणीही गेले नाहीत. कोठेही मदत पाठविली नाही. रामलक्ष्मणासकट प्रत्येक योद्धा आपआपली व्यक्तिगत खासगी लढाई (Personal Private Battle) लढत होता. राम आणि लक्ष्मण यांचेखेरीज, कोणाजवळही कोणचेही शस्त्र नव्हते. सर्व वानर वृक्ष पाषाणांनी लढले; असे रामायणात लिहिले आहे. याचा अर्थ त्यांना शस्त्रे माहीतच नव्हती असा होतो. त्यांच्या लढाया म्हणजे हल्लीच्या All-In सारख्या कुस्त्या आणि हाताला येईल त्याने मारामाऱ्या. त्यांनी आपल्या अचाट शारीरिक शक्तीने आणि कुस्त्यांतल्या पेचांनी शत्रूंना मारून टाकले अथवा जायबंदी केले. अशा सैन्याचे नेतृत्व कोणालाही करता येण्यासारखे नसते. युद्धयात्रेतील संरक्षण योजनेशिवाय, रामाने रणनेतृत्वाची दोन कामे केली होती. रामाने दोन व्यूह रचले असल्याचा उल्लेख आहे. परंतु अशा सैन्याला व्यूह समजणे आणि त्यात नेमून दिलेल्या जागेवर ठामपणे युद्ध करणे अशक्य होते. रामाने

आणखीही एक गोष्ट केली. युद्धात सेनापतीने अविचाराने अंगावर संकट ओढवून घेता कामा नये, असे युद्धशास्त्र सांगते. सुग्रीवाला अर्थातच ते माहीत नव्हते. तो एकदा रावणाच्या अंगावर अविचाराने तुटून पडला होता. परंतु नशीब थोर, म्हणून बचावला. रामाने याबद्दल सुग्रीवाची खरडपट्टी काढली होती.

या युद्धाचा रणनेतृत्वदृष्टीने सारांश हा की, रामाला रणनेतृत्वाची काहीशी जाण होती. परंतु त्याच्याबरोबर जे सैन्य आणि सेनापती होते, त्यांना युद्धशास्त्राचे किंवा शस्त्राच्या उपयोगाचे यत्किंचितही ज्ञान नव्हते. रामबाणाने रावण ठार झाला म्हणून नेहेमीच्या शिरस्त्याप्रमाणे युद्ध संपले. रावणाला फितुर बिभीषणाखेरीज, दुसरा कोणताही वारस नव्हता, आणि त्या काळात आणि नंतरही, आर्य राजे, पराभूत अथवा ठार झालेल्या राजांची राज्ये 'खालसा' करीत नसत, म्हणून रामाने रावणाचे राज्य बिभीषणाला दिले.

भाऊबंदकीचे कुरुपांचाल युद्ध हे तिसरे आणि शेवटचे प्राचीन महायुद्ध होते. ते अठरा दिवस चालले आणि दोन्ही पक्ष मिळून त्या युद्धात अठरा अक्षौहिणी फौज लढली. शेवटी फक्त आठ जिवंत राहिले. (१ अक्षौहिणीत २१,८७० रथ, २१,८७० हत्ती, ६५,६१० घोडे आणि १,०९,३५० पायदळ). इतके प्रचंड सैन्य एकाच वेळी लढत होते. राखीव सैन्याचा कोठेही उल्लेख आढळत नाही. अर्थात आघाडी कित्येक योजने पसरलेली असली पाहिजे. सैन्यगणना झालेली असून, लहानात पत्ती या तुकडी पासून मोठ्यात मोठ्या अक्षौहिणीपर्यंत मोठमोठे होत जाणारे, उपविभाग, विभाग अशी रचना झालेली होती. सैन्य चतुरंग झाले होते. विभागरचनेत मुख्य दोष हा होता की प्रत्येक लहानात लहान 'पत्ती' या तुकडीपासून प्रत्येक अंगाच्या सेनाप्रकाराचे सैनिक होते. त्यामुळे प्रत्येक तुकडी एक खिचडी होती; आणि लढताना प्रत्येकाची दुसऱ्याला अडचणच होती. त्यामुळे कोणीही आपल्या पूर्व कौशल्याने, लढू शकत नव्हता. आणि अशा परिस्थितीत निरनिराळ्या अंशांचे एकमेकाला सहकार्य अथवा साह्य मिळणे अशक्य होते. ही विचित्र रचना ऐतिहासिक काळातही चालू होती. परकीय आक्रमकांनी केलेल्या पराभवांचे हेही एक महत्वाचे कारण होते.

या युद्धात अनेक देशांची सैन्ये उभय पक्षांत होती. पांडवांचे स्वतःचे असे सैन्यच नव्हते. उलट कौरवांची फार मोठी फौज होती. पांडव पक्षाने, धृष्टद्युम्नाला सेनापती नियुक्त केले होते. येवढाच त्याच्या नावाचा उल्लेख आहे. त्याने काय केले, सैन्याचे संचालन कसे केले, याविषयी काहीही माहिती युद्धाच्या वर्णनात आढळत नाही. याचा अर्थ तो फक्त नावाचाच सेनापती होता असे दिसते. कौरवांचे सेनापती बदलले होते. धनुर्वेदात सांगितलेल्या सर्व शस्त्रास्त्रांचा तसेच युद्धपद्धतींचाही या युद्धात उपयोग झाला. त्यात पादातीने पादातीशी, घोडेस्वाराने घोडेस्वाराशी (धर्मयुद्ध) वाटेल त्याने वाटेल त्याच्याशी (संकुल युद्ध Free fight) आणि संघ–युद्ध म्हणजे व्यूह रचून (Collective) या तीन्ही पद्धतींनी लढाया झाल्या. त्यांपैकी पहिल्या दोन पद्धतींत, रणनेतृत्वाचा म्हणजे सेनापतीचा संबंध येत नाही आणि त्याला काही वाव नसतो. तीच गोष्ट द्वद्वांची. संघयुद्ध, व्यूहयुद्ध (Collective fighting) यातच रणनेतृत्व कसाला लागते.

या युद्धात दोन्ही बाजूंचे सेनापती, राजे सकाळी वेगळाले 'व्यूह' रचून ठेवीत असत; म्हणजे सैन्यांची मांडणी करीत असत (Battle formations) आणि आपल्या व्यक्तिगत खाजगी (Individual Private) युद्धाला मोकळे होत. व्यूह रचून ठेवल्यावर एकाही सेनापतीने, त्या व्यूहाचे काय झाले, कोणती जागा कमजोर ठरली, कोणता भाग नेमक्या ठिकाणी मजबूत राहिला, कुठल्या भागाला मदतीची जरूर पडली वगैरे एकाही बाबीकडे लक्ष दिले नाही. आणि मोडलेले, कमजोर झालेले व्यूह, दुरुस्त केले नाहीत किंवा निराळी जरूर ती नवी व्यूहरचना केलेली नाही. सेनापती आणि प्रसिद्ध योद्धे यांची द्वंद्वयुद्धे सुरू असताना, दुसरे सैनिक आपले लढणे थांबवून द्वंद्वे पहात उभे असत अशी वर्णनेही आहेत.

अर्जुन, द्रोण, दुर्योधन, कर्ण अशा काही थोरांचे रथ, रणभूमीवर चौफेर दौडत होते. परंतु ते आपआपल्या फौजेचे नियंत्रण, मार्गदर्शन, कमजोर ठिकाणी मदत, किंवा यशस्वी भागावर जोराची चढाई, इत्यादी नेतृत्वाच्या कामाकरता नसून, निरनिराळ्या ठिकाणी आपल्या स्वतःच्या लढाया लढण्याकरता.

अनुक्रमणिका

अभिमन्यूला एकट्यालाच चक्रव्यूहाचा 'भेद' करण्याची म्हणजे आत शिरण्याची युक्ती माहीत होती, परंतु बाहेर कसे पडावे हे माहीत नव्हते याचा अर्थच कळत नाही.

सारांश हाच की, भारतीय 'योद्धे' शस्त्रास्त्रविद्येत निपुण होते, वैयक्तिक शौर्यात अद्वितीय होते, तरी त्यांनी रणनेतृत्व केलेले नाही. तो युद्धाचा महत्वाचा भाग ते शिकले नाहीत. कारण भारतीय युद्ध-विद्येने या विषयाचा काहीच विचार केलेला नाही. अर्थात प्रगतीही नाही. या दृष्टीने झालेली युद्धशास्त्राची उपेक्षा शेवटपर्यंत भोवली.

आता ती परिस्थिती बदलली आहे, हे बांगला-मुक्ति युद्धातील यशाने सिद्ध झाले आहे. आणि भारतीय सेनापतीची युद्धविद्या आता अद्यायावत झालेली आहे.

⊗ ⊗ ⊗

मोहन सावंत / **चारचौघे**

चारचौघे जमून येतात
चौघांची मिटींग असते.
चारचौघे निथळत निथळत दमून जातात.
चौघांचे तुरे गळलेले असतात.
चारचौघे एकवटून येतात अंधारात
चौघांनाही गस्त घालता येत नाही.
चारचौघे खांद्याला खांदा लावून असतात
चौघांचे खांदे अडचणीत येतात.
बदलता येत नसतात म्हणून.
चारचौघे जागवतात झोपडीला. उठवतात म्हातारीला
अंधारात जमून येतात. अंधारात जमून जातात.
फिरून फिरून खांदे जुळवीत शेवटचे वळण घेतात.

निता शाह / **अर्थ**

तुझ्या येण्याला
फार अर्थ होता.
प्रत्येक श्वास
गीत होऊन
उमलला असता.
प्रत्येक क्षण
रंग होऊन
खुलला असता.
तुझ्या न येण्याला
फार अर्थ आहे.
प्रत्येक शब्द
मृत होऊन
उतरत आहे,
प्रत्येक स्वप्न
श्रावण होऊन
झरत आहे.

निळकंठ महाजन / **घोडेस्वार**

कुठला राजा कुठले राज्य ओसाडीचा मी सरदार
पडेल माझे पाऊल तेथे आकाशाचा मज आधार

मावळतीच्या पंगु वेदना उगवाईचा रंगित भास
आकाशाचे नुस्ते अहंपण वास्तवतेचा गळयास फास

जगण्याचे हे सूख असे की वैर असावे हिरवेगार
सागरातल्या थोर भितीला क्षितिजाचीही सैल मिठी

उफाळणाऱ्या लाटांचीही हृदयी होते कण माती
कुठे दिशांची फसवी झाडे आणि गितांचे पक्षी चार
किती ऋतूंना दिले निमंत्रण हात उधळुनी हातांसाठी

मागेपुढे मौन सुनेपण सोशित असते निधडी छाती
अशा रथाला मीच सारथी मीच दिशाहिन घोडेस्वार

एकदा एक वाटसरू जीवनातील आवश्यक सुख भोगून प्रवासाला निघाला. तो अविरत प्रवास करीत होता. हजारो मंत्रशक्ती त्याने संपादन केल्या. प्रत्येक शास्त्रात तो पारंगत झाला व अलौकिक बुद्धिसामर्थ्याने नटला. अनेक संकटांशी त्याने झुंजी दिल्या. झाडाची पानं गोठून टाकणाऱ्या थंडीतून तो तरला, जमीन भेदून टाकणाऱ्या उन्हातून तो बचावला आणि मोठमोठे पहाड भुळभुळीत करून टाकणाऱ्या पावसातून-देखील तो जिवंत राहिला ! त्याने कित्येक दिवस भुकेशिवाय काढले. कित्येक क्रूर प्राण्यांशी तो लढला व जिंकला तेव्हा जगातील कुठलीच शक्ती आपणास जिंकू शकणार नाही, ही इच्छा त्याच्यात प्रबळ झाली. स्वतःच्या कर्तृत्वावर त्याचा त्याच्या शरीरापेक्षाही जास्त विश्वास होता. या जगात मानवास अशक्य अशी कुठलीच गोष्ट नाही, ही त्याची ठाम समजूत झाली. सर्व कार्यात यशस्वी झाल्यामुळे त्याच्यात तऱ्हेवाईक उद्धट हुशारी निर्माण झाली होती. तो आता वेगळ्याच बेफिकीरीत भ्रमंती करू लागला !

एके दिवशी तो दुपारच्या वेळी एका वृक्षाखाली झोपला असता अचानक प्रचंड आवाजाने त्याला जाग आली. आजूबाजूचा परिसर त्या आवाजाने क्षणभर मूर्च्छित झाला आहे, असे त्यास वाटले. पण त्या आवाजाने आपल्यावर झोप उडण्याखेरीज दुसरा कुठलाच परिणाम झाला नाही, हे बघून त्याची छाती अभिमानाने भरून आली. त्याने समोर बघितले तेव्हा त्याच्यासमोर त्याच्याच उंचीच्या दोन आकृत्या उभ्या होत्या. एक आकृती अमावास्येहून गडद काळी होती तर दुसरी हिमकणांहूनही अधिक शुभ्र होती ! त्या आकृत्या एकटक त्याच्यावर दृष्टी खिळवून होत्या. क्षणभर वाटसरू भीतीने आक्रसला. परन्तु लगेच उसने अवसान आणून निर्भयपणे त्याने प्रश्न केला, 'तुम्ही कोण ?' काळी आकृती मंद स्मित करीत म्हणाली, 'मी तुझा भूतकाळ' आणि 'मी भविष्यकाळ'. कणखर आवाजात पांढरी आकृती दणाणली. 'तू स्वतः वर्तमानकाळ आहेस', दोघेही एकदमच म्हणाले. क्षणभर निर्जीव शांतता पसरली. काळी आकृती परत बोलू लागली, 'आम्ही दोघं नियतीचे गुलाम आहोत व तूसुद्धा नियतीचाच गुलाम आहेस. तू स्वतःला जरी बुद्धिमान समजत असलास तरी तुझ्या प्रज्ञेला नियतीची साथदेखील आवश्यक आहे. तिच्या कृपादृष्टीशिवाय तुझी बुद्धी निरर्थक आहे.' हे ऐकताच वाटसरू मेघांच्या गडगडाटाप्रमाणे हसत म्हणाला, 'तुम्हा दोघांजवळ कुठल्याही समरप्रसंगाला तोंड देण्याची शक्ती किंवा बुद्धी नाही. म्हणून स्वतःला नियतीचे गुलाम म्हणवता. आपल्यापेक्षा एखादा गुण जर दुसऱ्यात जास्त असेल तर त्याला श्रेष्ठ मानणारे तुम्ही, नियतीचे गुलाम होण्याच्याच लायकीचे आहात.' तेव्हा मंद स्मित करीत भूतकाळ उद्गारला, 'हे मूर्खा तुझ्या प्रत्येक भूत काळातील क्षणाशी मी निगडीत आहे. आतापर्यंत तू जे यश संपादिले ते केवळ तुझ्या बुद्धिसामर्थ्याने नव्हे तर नियतीच्या कृपादृष्टीमुळेही. परन्तु तू सर्व यश आपणच आपल्या बुद्धिसामर्थ्यावर मिळविले या भ्रमात आहेस.' तेव्हा वाटसरू म्हणाला, 'निसर्गाच्या व नियतीच्या चक्राला घाबरणाऱ्या क्षुद्र प्राण्यांपैकीच तुम्ही आहात. माझा कर्तृत्वावर पूर्ण विश्वास आहे. मी आजवर जे यश संपादिले ते केवळ माझ्या मनगटाच्या जोरावर व बुद्धीवरच.' त्याच्या प्रत्येक शब्दात स्वाभिमानाचा दर्प होता. आपल्या मित्राचे बोलणे ह्या मूर्खास पटवून द्यावे म्हणून भविष्यकाळ म्हणाला, 'हे अज्ञानी माणसा, तू केवळ अज्ञानात सुख मानणाऱ्यांपैकीच आहेस असं दिसतं. तुझ्या प्रत्येक कृतीत नियती तुझी सावली म्हणून काम करते. तेव्हा स्वतःच्याच सावलीला न ओळखणारा तू किती कृतघ्न आहेस हे ह्यावरून दिसून येते'. तेव्हा चिडून वाटसरू म्हणाला, 'नियतीचं गुणगान तुम्ही दुसऱ्या कुठल्याही निर्बुद्ध प्राण्यासमोर करा, माझ्या-समोर नको. तुम्ही ताबडतोब चालते व्हा !' तेव्हा हसत हसत त्या दोन आकृत्या तेथून निघून गेल्या. त्यावेळी आजूबाजूचा सर्व परिसर कुठल्यातरी दडपणाखाली असल्यासारखा निःशब्द होता ! आता वाटसरूस

तहान लागल्यासारखे वाटू लागले. जवळच एक ओढा वाहत होता. तो हावऱ्या लालसेने त्याजवळ गेला आणि पाणी पिण्यासाठी खाली वाकताच धबकन ओढयात पडला. खळाळत्या पाण्याबरोबर तो भरकटू लागला. त्याला किनाऱ्यावर येता येईना ! त्यामुळे त्याचा जीव गुदमरू लागला. कित्येक भीमकाय नद्या पोहून जाणारा तो त्या लहान ओढ्यात जणू पोहणंच विसरला. त्याची मती व शक्ती नष्ट झाली. तो स्वतःला बाहेर काढण्याविषयी व्याकुळतेने ओरडू लागला. त्याचवेळी त्याला त्याच्या शरीरातून एक आवाज ऐकू आला. 'मित्रा, मी आता भविष्यकाळ नाही तर तुझा मित्र आहे.' तेव्हा वाटसरू म्हणाला, 'मित्रा, या संकटातून मला सोडव' तेव्हा एक विकट हास्य त्याच्या कानी पडलं व त्याला ऐकू येऊ लागलं, 'आता आपल्या दोघांचं मरण अटळच आहे. कारण नियतीच्या मनात तेच आहे. मी व तू आता वर्तमानकाळ होऊनच मरणार !' आणि त्याचक्षणी वाटसरू पाण्यात गडप झाला. एक काळी आकृती निःशब्द पाण्यावर तरंगत होती. झाडे आनंदाने डोलत होती व ओढा खळखळ वाहात होता.

⊗ ⊗

भगवान मोरे / **पाणी दाखवा**

जनताजनार्दनाने
महाप्रयासाने
अश्वमेधवारू
जिंकून आणिला
तरीही
अनेक वर्षांचे
त्यांच्या तैनातीतले
त्यांचे विश्वासू
चणे देणारे
दाणे घालणारे
पाणी पाजणारे
त्यावरोबर आहेत.
त्याला साथ देताहेत
हे विसरू नका
दृष्टीआड करू नका.
ते
वारूबिथरवतील
खुनशी करतील
त्याला
मग
काबूत ठेवणे
आज्ञेत ठेवणे
जड जाईल
कठीण होईल.
अशांना हेरून
बाजूला सारून
त्यांची परत
पाठवणी करून
वारू
आपल्या कह्यात आहे
आपली पकड
कायम आहे
हे शाबीत करा
आणि
जगाला
आपले पाणी दाखवा

ववन सराडकर / **घरटे**

निळयाभोर आभाळाचा तुला पंख आहे
पायवाट माझी, मीही चालतोच आहे . .
उंचशा सुखाच्या राशी तुझ्या भोवताली
इथे रात्र माझी मीही रेटतोच आहे
स्फुंदतील डोळयांवाटे वेदना परंतुऽ
मंद मंद ज्योत अजुनी तेवतेच आहे
विस्कटून गेले आता जरी गाव सारे
काळजात घरटे माझ्या बांधतोच आहे

प्रल्हाद वडेर / **गोमंतक मराठी साहित्य संमेलनातील साहित्यचिंतन**

मराठी साहित्य महामंडळाकडून भरविण्यात येणाऱ्या साहित्य संमेलनांचा दबदबा फार मोठा असला तरी आता त्यांच्या स्वरूपाबद्दल अनेकजण साशंक झालेले दिसतात. या मोठ्या संमेलनांची जत्रा होते व त्यात हौसे, गवसे व नवसे जमून खुद्द साहित्याला व साहित्यिकांनाच अंग चोरून वावरावे लागते याचा अनुभव गेली अनेक वर्षे येत आहे. पुण्याचे पु. भा. भावे यांच्या अध्यक्षतेखालील अ. भा. मराठी संमेलन तर गोंधळात संपले. याचे कारण समाजाच्या विविध घटकांच्या विविध अपेक्षा व ताण आजही मोठी संमेलने सहन करू शकणार नाहीत हे आता स्पष्ट झाले आहे. म्हणूनच छोटी छोटी संमेलनेच बरी असा नवा विचार स्वागतार्ह आहे. ख्रिस्ती संमेलन, दलित संमेलन, बालकुमार साहित्य संमेलन इतकेच नव्हे तर कथालेखिकांचे व कवयित्रींचे संमेलन असे हे विकेंद्रीकरण झालेले दिसते व त्यातूनच काही साहित्य-विषयक कार्य होते असा अनुभव आहे. तसेच स्थानिक साहित्यकांनाही तेथे वाव मिळतो व मंत्र्यांचा व पुढाऱ्यांचा सुळसुळाट तेथे नसतो. त्यामुळे एकतर साहित्याला पोषक असे वातावरण तेथे निर्माण होते व परस्परांचा परिचय व विचारविनिमय होतो आणि माणसांना जवळ आणण्याचे महत्वाचे कार्य साहित्य करते!

गोव्यातील कुडचडे–सावर्डे येथे दि. ३१ डिसेंबर, १९७७ व १ जानेवारी, १९७८ रोजी भरलेले गोमंतक मराठी साहित्य संमेलन या दृष्टीने अत्यंत यशस्वी झाले. अध्यक्ष होते सुप्रसिद्ध मराठी कथाकार व कादंबरीकार लक्ष्मणराव सरदेसाई. आणि स्वागताध्यक्ष होते मराठीतील लोकप्रिय कादंबरीकार चंद्रकांत काकोडकर व उद्‌घाटक 'मुंबई सकाळ' चे संपादक माधव गडकरी. प्रा. गं. वा. सरदार यांच्या हस्ते ग्रंथप्रदर्शनाचे उद्‌घाटन झाले. माधव गडकऱ्यांनी उद्‌घाटनाच्या भाषणात एका बाजूला साहित्यात शासनाचा हस्तक्षेप व व्यासपीठावर मंत्रीही नको अशी भूमिका घेतली. पण लगेच साहित्याची भूमिका तपासून पाहण्याचा अधिकार समाजाला आहे असे म्हणून मोर्चा, निदर्शने वगैरेंचे समर्थनही केले. त्यामुळे दुर्गा भागवतांच्या भूमिकेइतकी ही भूमिका तर्कशुद्ध वाटली नाही. चंद्रकांत काकोडकरांनी आपल्या भाषणात आत्मचरित्र सांगण्यावरच भर दिला.

लक्ष्मणरावांनी मात्र साहित्यचिंतनावर भर दिला. ललित वाङ्मयाची शक्ती, साहित्यिकांची कर्तव्ये, जाहिरातबाजी व प्रसिद्धी यांपासून दूर राहण्याची गरज आणि साहित्यातील कामशक्तीचा आविष्कार यांवर त्यांनी आपली मते मांडली. शासनाकडून साहित्यिकांची होणारी उपेक्षा आणि गोमंतकातील कोकणी व मराठी या दोन्ही भाषाप्रेमीयांनी एकत्र येण्याची आवश्यकता यावरही त्यांनी भर दिला.

त्यांनी साहित्य ही एक शक्ती आहे, असे सांगून तिच्या आत्मिक सामर्थ्यावर म्हणजे मंत्रावर भर दिला. 'चाललंय ते सगळं ठीक चाललंय' असे वाटणाऱ्यांनी लेखन करण्याच्या फंदात पडू नये असे त्यांनी बजावले. खरा कलावंत हा अस्वस्थ असला पाहिजे आणि त्याने तंत्रापेक्षा मंत्राची साधना करून अनुभवांचे दर्शन आपल्या साहित्यातून घडविले पाहिजे, यासाठी त्याने बाजारी प्रसिद्धी व अहंकारापासून दूर राहिले पाहिजे असे ते म्हणाले. काम हा एक महत्त्वाचा पुरुषार्थ आहे असे सांगून प्रेम, रोमान्स ही त्याची सौम्य रूपे, तर संभोग हे त्याचे रौद्र स्वरूप असे ते म्हणाले. साहित्यिकाला कोणताही विषय वर्ज्य नाही, पण कामशक्तीचे चित्रण करताना विकृतीचे चित्रण विकृती म्हणूनच केले पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले. श्रेष्ठ कलावंत विकृतीचे चित्रण करताना विकृतीत रस घेत नाहीत, तर एक पतन म्हणूनच जे रंगवितात आणि मानवाला उच्च पातळीवर नेण्याचाच त्यापाठीमागे हेतू असला पाहिजे असे लक्ष्मणरावांनी पुढे म्हटले.

गोमंतकीय साहित्यिकांकडे वळून त्यांनी सांगितले की, गोव्याच्या सांस्कृतिक परिपक्वतेचा, मॅच्यूरिटीचा त्यांनी उपयोग करून घेतला पाहिजे. व्यक्तिगत प्रगल्भता येथे पुरेशी नाही. कलाकारानं

आपलं आगळेपण, वेगळेपण राखावं, पण आपल्या समाजाशी, सांस्कृतिक परंपरेशी एकरूप होऊन. अपूर्ण वास्तवतेवर आपल्या आदर्शाचे संस्कार करून. भूमी आणि भाषा यांचा संबंध तोडून ललित साहित्याचं पोषण होऊ शकत नाही. त्याचबरोबर साहित्यात प्रादेशिकताच पुरेशी नाही, तर विश्वात्मक असं काही जीवनात असतं तेही समजून घेण्याची आणि व्यक्त करण्याची ताकद त्यांच्यात हवी असे त्यांनी मुद्दाम बजाविले. प्रादेशिक आणि विश्वात्मक विरोध नाही. जे खरं प्रादेशिक तेच विश्वात्मक तत्व किंवा सत्य ढोवळ, किंवा भोंगळ व निराकार, बिनरंगी शैलीत सांगणे म्हणजे साहित्य नव्हे, हा त्यांचा विचार महत्वाचा होता.

लक्ष्मणराव कोकणीचे कट्टे पुरस्कर्ते व महत्वाचे लेखक असूनही त्यांनी मराठी व कोकणीत सहकार्य व समन्वय असावा ही भूमिका घेतली. इतकेच नव्हे तर दोघांचे पुढे एक संमिश्र संमेलन भरावे, असेही ते म्हणाले.

राज्यकर्त्यांनी साहित्यिकांची उपेक्षा केली असे ते समारोपाच्या भाषणात म्हणाले. शासनकर्त्यांचे अनेक पुतळे गोव्यात होतात पण कै. राम मनोहर लोहियांचा पुतळा उभारावा असे कोणाला वाटत नाही याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली. शासनकर्ते साहित्यिकांकडून लाचारीची स्तुतिस्तोत्रांची अपेक्षा करतात हेही त्यांना बरोबर वाटले नाही. एकूण त्यांच्या भाषणात विचारांना खूप खाद्य होते.

संमेलनात दोन परिसंवाद होते व कविसंमेलन आणि कथाकथनही होते. 'मराठी विनोदी साहित्यातील विनोद असली किती आणि नकली किती ?' या मं. वि. राजाध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पहिल्या परिसंवादात बाळ सामंत, जयवंत दळवी, विजया राजाध्यक्ष, मधु मंगेश कर्णिक, माधव गडकरी, सुभाष भेण्डे व प्रल्हाद वडेर यांनी भाग घेतला. मराठीतील आजच्या लेखकांना पांडुतात्या, वंडूनाना, बाळकराम किंवा चिमणराव यांसारखी अविस्मरणीय व्यक्ति रेखा निर्माण करता आली नाही, याचे कारण त्यांचे समाजाचे एकूण आकलनच कमी आहे. आणि ते जीवनातील एखादी विकृती बाजूला काढून तिच्यावर आपला विनोदाचा कसा मारा करतात याची चर्चा झाली. आणि कोट्या, वाष्कळपणा, नवश्रीमंताच्या मूर्ख स्त्रिया किंवा लेखकांच्या बायका हेच त्यांच्या विनोदाचे तेच ते विषय असतात. त्यामुळे मराठी विनोदाची स्थितीसुद्धा फार 'गंभीर' आहे असा एकूण विचार दिसला.

'गोमंतकीय लेखकांच्या साहित्यात गोवा दिसतो काय ?' ही चर्चा बरीच गंभीर व विषयाला धरून झाली. अध्यक्ष होते डॉ. गं. व ग्रामोपाध्ये. लक्ष्मीदास बोरकर, नरेश कवडी, सोमनाथ कोमरपंत, सौ. पाणंदीकर, शंभु बांदेकर, वामन राधाकृष्ण, चंद्रकांत केणी आणि नरेंद्र बोडके यांनी त्यात हजेरी लावली. बहुतेकांनी मराठी गोमंतकीय साहित्यात गोवा दिसतो असे म्हटले. पण त्याहीपेक्षा गोव्यातील खाणधंदा, भाटकार-मुंडकार संबंध, मागासजातीच्या समस्या यांचे दर्शन अधिक स्पष्टपणे होणे महत्वाचे आहे असे म्हटले. पण त्याहीपेक्षा महत्वाचा प्रश्न असा की, गोवा दिसायलाच पाहिजे काय, हा होता. अध्यक्षांनीदेखील प्रादेशिकतेबरोबरच वैश्विकताही आली पाहिजे व प्रादेशिकतेवर जास्त जोर देण्यात अर्थ नाही असे म्हटले.

दा. अ. कारे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कवि संमेलनात चाळीस एक कवी होते. कथाकथनात शैलजा राजे, जोत्स्ना देवधर, प्रभाकर भसारी व दत्ता नायक यांपैकी पहिल्या दोघींनी लक्ष वेधून घेतले. पं. महादेवशास्त्री जोशी हे अध्यक्षस्थानी होते. संमेलनात ज्येष्ठांचा सत्कार व साहित्यिकांचा गौरव होता. वा. द. सातोस्कर, पं. महादेवशास्त्री जोशी, के. ना. वर्वे व वि. वा. प्रभुदेसाई यांचा शाल श्रीफळाने सत्कार करण्यात आला. सर्वांच्या वतीने प्रा. डॉ. वि. वा. प्रभुदेसाई यांचे याप्रसंगी समयोचित भाषण झाले.

अशा या गोमंतक मराठी साहित्य संमेलनात कोकणी-मराठी कवि-लेखक एकत्र आले, लक्ष्मणरावांनी दोन्ही भाषांच्या समन्वयाची व सहकार्याची भूमिका घेतली, यामुळे काही लोकांना बरे वाटले नाही. एवढी मळमळ सोडली तरी सर्वसामान्य वाचक व रसिक यांना या संमेलनाने खूपच काही दिले.

नलिनी वि. पाध्ये / **साय**

दुधापेक्षा दुधावरल्या सायीलाच अधिक जपायला हवं. आपल्या प्राणापलीकडे आपल्या भाषेवर प्रेम करणारे प्रा. विठ्ठल वाघ यांचा 'साय' हा काव्यसंग्रह 'वऱ्हाडी बोली' चे जिवंत प्रतीक होय. सातपुड्याच्या कुशीत जन्मलेला कोणताही वऱ्हाडी माणूस 'साय' ह्या काव्यसंग्रहाला आपल्या 'माय' इतकेच महत्त्व देईल यात शंका नाही.

केवळ ग्रामीण शब्द पकडून ठेवून साहित्यनिर्मिती करणारे लेखक व कवी वेगळे. जी वऱ्हाडी भाषा विशेषत: अकोट तालुक्यात बोलली जाते तिचे दर्शन या काव्यसंग्रहात घडते. उत्कृष्ट चित्रकाराने निसर्गाचे हुबेहूब चित्र रेखाटावे तसे प्रा. विठ्ठल वाघ यांनी आपल्या काव्यसंग्रहातून रसिकांना मोहवून टाकले आहे.

"जेथे नाही हृदींची प्रेमकळा । काव्यकळा विकळा विफला ।।" या उक्तीनुसार 'साय' हा काव्य-संग्रह एक सार्थ कलाकृती आहे.

भाषेच्या दृष्टीने पाहता ग्रामीण भागात बोलली जाणारी भाषा जशीच्या तशी उचलली आहे. त्यातील निवडक शब्द—इठू, चिचीचे वाक्कोल, इठोल, वल्या, हळव्या, पिपया, घोयका, काडून, वांगळचा पयस, गोचिळ, पुनिव, तुया, माया, दवळी, नयतुरनी, डोया सितोळे, गिल्लास, गुयचर, दानेदुने, लमकले, वाऱ्याची झुयुक वगैरे शब्द पाहिले म्हणजे ही ग्रामीण नक्कल नसून ते बोलभाषेचे अस्सल स्वरूप आहे हे लक्षात आल्यावाचून राहत नाही.

केवळ वऱ्हाडी बोलीकरिताच काव्य लिहिलेले नसून ते त्यांच्या आविष्काराचे माध्यम आहे. सावत्याच्या अंभगाची निर्मिती काळचा मातीतून सहजगत्या कोंब यावेत तशी आहे असे कवी म्हणतो—

"काया माती पोटी कोंब । टरारून वर आले ।। सावत्याच्या गायेतून । गीत इठूचे फुलले ।।"

आता तुकारामाच्या चिपळचा पाहा—

"डांगोडांगी लमकले । असे चिचिचे बाक्कोल ।। तुकारामाच्या चिपळचा । गाती इठ्ठोल इठ्ठोल ।।"

हा कवी स्वत: नावानेच 'विठ्ठल' असून त्याची आपल्या काळचा मातीवर अपरंपार प्रीती असल्याने पंढरीला जाण्याची त्याला गरज वाटत नाही—

नाही ठाऊक देहूचा काय अष्टगंध बुका ।। कायी माती लावली त इठू भुलसील तुका ।।

खऱ्या बुक्याऐवजी तुकारामाने माझ्या वावरातली काळी मातीच बुक्का म्हणून कपाळाला लावली तर त्यालासुद्धा प्रत्यक्ष पांडुरंगाचा विसर पडेल. काळचा मातीवर याहून अधिक प्रेम करणारा दुसरा वऱ्हाडी साहित्यिक विरळाच ! पाहा कवीची पंढरी—

आषाढीले जारे तुमी । माझा वावर पंढरी ।। हाळे भळाच्या पानांत । झेंडी इठोबाची खरी ।।
चंद्रभागेची आंघोई । माइया नशिबांत नाही ।। एक डाव बस म्हना । मोटीखाली रखमाई ।।

आता कविवर्णित लक्ष्मीचे रूप पाहा—

वल्या मातीत तिफन । दाने उभ्या काकरान ।। जाते लक्ष्मीला सांगावा । याच भोळचा अळक्षरान ।।

प्रीतीच्या मनोहर कल्पनाही नजरेत भरण्यासारख्याच आहेत—

वटभरनाच्या राती । नाही केसांत हुंगला ।। जीवा भुलोनारा वास । कसा धानातून आला ।।

किंवा—

चुना लावला पानाले । थोडा राहिला बोटाले ।। लाली मैनाच्या तोंडची । कशी राघूच्या होटाले ।।

सर्व कवितांमध्ये 'वऱ्हाडी बोली' ही कविता वैशिष्ट्यपूर्ण वाटते—

इन्द्राघरच्या परीच । नाचनाचतां पाऊल ।। अमृताचे घागरीले । एक दिवस लागल ।।

कलंडल्यान घागर । सार अमृत सांडल ।। थेंबाथेंबातून त्याच्या । कांही निपजले बोल ।।

अशी वऱ्हाडी बोलीची काल्पनिक जन्मकथा ! हिचा विस्तार कवळ्या काकडीच्या वेलासारखा, हिची चव वाणीच्या हुरड्यासारखी, आणि हिची चाल बघा—

सातपुड्याच्या कुशीत । लेकीसारखी खेयते ।। नदीनाल्याईच्या संग । वला टाकत पयते ।।

हिचं कौतुक करावं तितकं थोडंच—

माझ्या वऱ्हाडी मायेचं । करु कितक कीर्तन ।। तिच्या दुधावरची साय । किस्न खाय वरपून ।।

प्रा. भाऊ भालेराव हे प्रस्तुत काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेत लिहितात, "विठ्ठला, ठिगळे जोडून गोधडी तयार होते, गालीचा होत नाही !" त्यांचा अधिकार आणि नातेसंबंध यांना अनुसरून प्रा. विठ्ठल वाघ यांना त्यांनी हे सहजतेने म्हटले असावे, असे वाटते. तथापि 'विठ्ठल' हा साधाभोळा आहे व गोरगरिबांचा कनवाळू देव आहे. त्याला गालीचाची जरूरच काय ? त्याची गोधडी त्याला व त्याच्या रसिक जनतेलाही मानवणारी आहे.

⊗ ⊗ ⊗

विलास जाधव / वेटरची कविता

सूडानं पेटलेली हरअेक सायंकाळ
त्याचे अिवले निळे डोळे विरत जातात
चमचमत्या चांदण्यात
हरवलेलं त्याचं आकाश शोधण्यात....
धवधवत्या नळावरोबर
अुगवलेली अगतिक सकाळ,
त्याची वामन पावले
जातात अुमटत 'कॅफे लव्हज' कडे
त्याला नकळत
– आणि मिळालं नाही जे
त्यासाठीच सुरू होते त्याची
पांढरीशुभ्र धावपळ,
वाटीत फिरवतो तो हिरेवगार हास्य
कटलेट वाल्यांना
रस्त्यांचे प्लॅटफार्म होत जातात
लोकप्रिय दैनिकांचे अंक
हातोहात खपतात (तितक्याच जलदीने)
सराअीत नजरा शोधतात
आपापला कॉलम
(साधारणतः कॉलर असणाऱ्यांना
कलम करुन घ्यावाच लागतो
हा अविभाज्य भाग)
- अेक कॉलम कलम न झालेला रोखून बघतो
बुलेट प्रुफ भिंगावरून याच्याकडेही
ओढून घेतो 'हा' आपलीच झुलपे
आपल्या निस्तेज डोळ्यांवर-—
हरवन जातो त्याचा चेहरा
येरातल्या थंडगार मचूळ पाण्यात,
लटपटतात अस्सल दारुबाजासारखे
कोलांट्या अुड्या घेत
आडवे तिडवे पसरतात शद्ब त्याच्या ओठांत
गूडमॉनिंग सर, 'सॉरी बॉय, गूडनून'
चमकतो तो कसे चुकलो आपण !
—काअुंटरवर चोहोबाजूला फिरणारा 'रॅलिफॅन'
त्याच्या मेंदूत हजार अिंगळ्या वळवळतात.
पुनः पुनः झळकते समोरची जाहिरात
'चि. कृष्णा निघून ये...'
भिंतीवरचे जुने घड्याळ
फिरवू लागते त्याच्या डोक्यात मागेपुढे लोलक
..आपण साला कन्हैयां, सबका कन्हैयां'
पण कन्हैया,
मला तुझी यशोदा नाही मिळाली रे
नाहीतर मीही वाजवली असती बासरी
राखली असती खिलारे
आतूर झाली असती माझ्यासाठीही
गोकुळातली राधा
पण वाट्याला आला दारुबाज बाप...
'काय करु, काय करु'
झळकणारी जाहिरात
चि. कृष्णा निघून ये.....

प्रदीप भा. विटाळकर / **महादेवा जातो गा, माह्या शंकर राजा**

(महादेवाच्या गाण्यांचा परिचय)

वऱ्हाडी माणसाच्या जीवनात महादेवाला फार महत्त्व आहे. हिंदुस्थानात महादेवाची देवळं गावोगाव, उंच डोंगरावर किंवा नद्यांच्या काठी सर्वत्र आहेत. सामान्यतः पर्वताचा किंवा डोंगराचा उंच भाग असला, शिखर असले की, तेथे हटकून महादेवाचे देऊळ असते. संभाचे दर्शन सहजासहजी घडू नये, त्यासाठी कष्ट पडावेत, ह्या हेतूनेच प्राचीन काळापासून ह्या देवाची मंदिरे अवघड जागी उभारण्यात आली असे वाटते. 'मोठा महादेव' हे देवस्थानही मध्यप्रदेशातील पचमढी या थंड हवेच्या ठिकाणापासून सुमारे दहा मैलांवरील सातपुड्याच्या उंचवट्यावर आहे. या 'मोठ्या महादेवा'च्या दर्शनासाठी श्रावणमासात दुरून दुरून लोक येतात. वऱ्हाडातील म्हणजे नागपूर, खापा, सावनेर, परतवाडा, मोर्शी, वरूड, मुलताई, बैतूल इ. भागांतील भगत या यात्रेचे नित्य पाईक आहेत. लांबच लांब माळरान, त्यात मध्येच अस्ताव्यस्त अंग टाकून दिलेल्या दगडधोंड्याच्या राशी, त्या पलीकडे डोकावणारे डोंगर-सुळके आणि श्रावणीतील रम्य वनश्रीने नटलेल्या या डोंगरात राहाणारा महादेव आपल्या भगताची कसोटी पूर्ण करणारा आहे. श्रावणात वरून पाऊस कोसळत असतो. दवना (एक सुवासिक वनस्पती, गवत) वाढलेला असतो. परंतु कशाचीही पर्वा न करता हजारो 'पोहे' दऱ्याखोऱ्यांनी विकट बनलेली मोठ्या महादेवाची डोंगरी वाट चढत असतात. (या यात्रेला जाणाऱ्या भगतांच्या जमावाला 'पोहा' असे म्हणतात). 'महादेवा जातो गा, माह्या शंकर राजा' ची कैफ या भगतांना चढलेली असते.

नागपंचमीच्या ३–४ दिवस आधी हे भगत 'मोठ्या महादेवा'ला जाण्यासाठी निघतात. गावकरी मोठ्या भक्तिभावाने या भगतांना निरोप देत असतात. या भगतांच्या गळचांत फुलांच्या माळा असतात. खांद्यावर पिवळ्या किंवा लाल रंगाची धोपटी असते. त्याला 'खारी' असे म्हणतात. त्यात पूजेचे साहित्य असते. एक भगत म्हणतो——

खांद्यावर खाऱ्या गा
देवा गा माह्या
घेतला काहून गा, घरचा वैताग पाहून

या भगताच्या अंगावर नवीन कपडे असतात. कपाळावर गुलाल झळकत असतो. प्रमुख भगताच्या हातात त्रिशुल असतो. एकाजवळ मशाल असते. गावातील महादेवाच्या पाया पडत, वाजतगाजत पोहा गावाबाहेर पडतो व महादेवाची वाट चालू लागतो. परंतु ही वाट तो मुकाट्याने चालत नाही तर मुखाने तो महादेवाची गाणी गातच असतो.

विदर्भातील सर्वात कठिण व मोठी यात्रा 'मोठ्या महादेवाची' समजण्यात येते. या यात्रेला सर्वच थरांतील भगत येत असतात. ही यात्रा आज जरी इतकी कठिण नसली तरी काही वर्षांपूर्वी ती फारच कठिण होती. म्हणून या यात्रेला जाणाऱ्या भगतांना निरोप देताना आजही अक्षरशः रडत असतात. इतकेच नाही तर एक भगत या यात्रेला जाताना गणगोताची माया सोडली असे म्हणतो——

महादेवा जातो गा, देवा गा माह्या ।
आजूबाजूले खाया, अन् सोडली गणगोताची माया ।।

ही यात्रा किती प्राचीन असावी याचा अंदाज एका गीतावरून करता येतो. अशावेळी भगतांनी दवना ही वनस्पती तोडून जेमतेम जाता येईल अशी वाट तयार केली——

देवा तुह्या वाटनं गा, भोलेबावा, अन देवा लागला चक्रीघाट ।
व्हय शंकराची वाट, अन तिथ दवना मोठा दाट ।।
अन भक्तजन तुम्ही उपडा एक एक दास, करा कैलासाले वाट, घेऊ शंकराची भेट.

अनुक्रमणिका

या भगताच्या मनात यावर्षी यात्रेला जावयाचे नव्हते. परंतु भोलानाथ स्वप्नात आला नि घेऊन गेला—

जान नव्हती मनी होऽऽ, भोलीरेनाथा।

येन नव्हत ननी गा, सपनी येऊन कसा चालला घेऊन ।।

आणि ही कठिण पर्वतराजी चढताना पहिल्या पायरीला वंदन करूनच कठिण वाट चढावयाची असते. पहिली पायरी म्हणजे विशाल शिलाखंड! अगदी कड्यासारखा! त्याची पूजा करा, नारळ फोडा, कापूर जाळा, नि मग पुढे जावे. समोरील कठिण शिखराकडे पाहून भगत म्हणतो—

उदाकापराचे होऽऽ देवा गा माह्या।

भंकार हो सुटले, कैलाशीचे राजे शिखरी बसले ।।

आणि दुसरा भगत त्या जळणाऱ्या कापराकडे पाहून म्हणतो—

कापूर जये लाहीलाही, देवा गा माह्या ।

माह्या हृदयी संभा नाचे ठायी ठायी ।।

हा गड कसा आहे तर, या गडाला सोन्याचे दार, सोन्याच्या भिंती आहेत—

गडावरी गड हो, भोलीरेनाथा ।

चवऱ्याच्या गडाले आहे सोन्याचे दार, चवऱ्याच्या गडाले आहे सोन्याच्या भिंती ।।

हे या गडाचे वर्णन झाले. परंतु हा गड पाहून त्याची छाती धडधड करू लागते, त्याला रडू कोसळते. परंतु तो महादेवाचे नाव घेतो आणि एवढाही कठिण पहाड चढून जातो—

गडावरी गड, देवा रे माह्या, गड पाहून येतो रड ।

भक्ताची छाती करे धडधड, धपगड आहे अवघड गा ।

पद्मशेषाचे नाव कर स्मरण, मंग चढ धूपगढ ।।

हा कठिण गड चढताना थकवा आला असता भगत 'हो संभा हात कर लंबा' अशी आरोळी मारतात. या गडावरील रस्त्याच्या काठिण्याचे वर्णन करताना भगत म्हणतो—

अन या चवऱ्याचा गड गाऽऽ भोलेरेबावा ।

हे गा तरवारीचे नोक, अगा तरवारीचे नोक भक्ता, जाईन तुहा झोक ।।

इतकेच नव्हे तर हा चवऱ्याचा गड म्हणजे अक्षरशः मरण आहे असे तो म्हणतो—

अगा चवऱ्याचा गड आहे आसमानी, दिवट्या देवा दिसते चांदणी ।

अन चवऱ्याचा गड देवाचा, आहे मराची निशानी ।।

भगतानं या यात्रेचा विचार जरी व्यक्त केला तरी कुटुंबातील नातेवाईकांच्या मनात घालमेल सुरू होते, जीवाचा थरकाप होतो. तो म्हणतो, मी तुझ्या दर्शनाला येताना थकत नाही. तर मी मोठ्या आनंदाने तुझ्या दर्शनाला येतो—

येतो देवा या भक्तजन राजा ।

नाही मी थकत, तुह्या दर्शनाले आलो टोंगळे फेकत ।।

दुसरा भगत म्हणतो की महाल, माड्या, संपत्तीचा त्याग करून मी तुझ्या दर्शनाला आलो, तर पापी मात्र शरीर-रूपी झोपडीचा त्याग करण्यास भीत आहे—

महादेवा जातो रे देवा गा माह्या ।

सोडल्या महाल माड्या, पापी नाही सोडत बापा तनाच्या झोपड्या ।।

पोहा मात्र घाईघाईने जात असतो, त्याचे समर्पक व सुंदर वर्णन पाहण्यासारखे आहे—

महादेवाच्या वाटनं हो, सांडली लाही गाऽऽ।

अन् पोहा चालला घाईघाई ।।

आणि निसर्गाचे वर्णन करताना तो म्हणतो—

महादेवाच्या वाटनं देवा गा माह्या, मोठे मोठे साग हो ।
अन केळीच्या पानावर लहऱ्या मारे डोम्या नाग ।।

हा पोहा वाजत जात असतो आणि भगतांच्या तोंडी महादेवाची गाणी असतात—

मांगिनीचे पोरी वो, या शंकरराजा ।
तुझा बाप कोठे गेला, चवऱ्याच्या गडावर पोहा वाजवत नेला ।।

महादेव (सुर) आणि दारू (सुरा) यांचा मेळ पुराणातीलच आहे. मग या भगतांनी का प्राशन करू नये ? दारूला भगत 'गपई' हा पारिभाषिक शब्द वापरतात—

महादेवाच्या वाटनं देवा रे माह्या ।
दारुवाले पेते दारु, सिंदीवाले पेते सिंदी, ऐसी कलारीन फंदी, मांगे बोटातली मुंदी ।।

ही महादेवाची गाणी म्हणत असताना भगताचा आवाज बसतो तेव्हा तो म्हणतो—

अगा गाणे म्हणू म्हणू गा, अगा पडला माझा गरा ।
संभा पाठव गा अमृताचा पुडा ।।

या महादेवाच्या गाण्यांमध्ये विषयांची विविधता दिसते, पण विचारांचा एकजिनसीपणा दिसून येत नाही. काव्यास लागणारी आवश्यक गोष्ट भावना आणि सहजता ओतप्रोत दिसून येते. त्यातही कलात्मकता आहे, परंतु ती सोनाराच्या किंवा कलाकाराच्या परिश्रमशीलतेची नसून निसर्गाच्या भावमधुर संसाराची आहे.

'महादेवाची गाणी' गाण्याची पद्धत ठरलेली दिसते. एका भगताने गीत म्हणावयाचे आणि सर्वांनी गीताच्या ओळीनंतर 'अगा देवा', 'देवा गा माह्या', 'भोलीरेनाथा', 'या शंकर राजा', 'अभा महादेवा' इत्यादी पालुपदासारखे म्हणावयाचे. म्हणून ही समूहगीते वाटत नाहीत. आणि गीताच्या शेवटी सर्वांनी 'हर बोला हरहर महादेव' अशी ललकारी द्यावयाची. अवघड पर्वतराजी चढत असताना होणारे शारीरिक श्रम नाहीसे व्हावे. तसेच पोहा एकापुढे एक चालत असल्याने पुढच्याची चाहूल मागच्याला असावी व तीच ओळ मागच्याने उच्चारून आपण मागे सुखरूप आहोत हे सांगावे हा या गीतांचा हेतू असावा काय ? तसेच ही गाणी वाचण्यापेक्षा भगताच्या तोंडून ऐकल्याने विशेष कळतात व त्यांतील सौंदर्य चाखावयास मिळते.

यात्रेच्या काळात पर्वतराजीच्या वाटा माणसांनी फुललेल्या असतात. सारा आसमंत, परिसर संभूच्या गजरांनी भरून आणि भारून जातो. गाण्यांचे सूर आणि पर्वतराजीवर त्यांची घुमणारी आंदोलने ऐकून कुणाही रसिकाचे अंतःकरण आंदोलित झाल्याशिवाय राहत नाही. हेच या गीतांचे सामर्थ्य आहे. हे गीत ऐकदा ऐकले की ते लक्षात राहावे एवढा जबरदस्त प्रभाव या गीतांतील वेचक शब्दात, त्यात वर्णन केलेल्या भावनांत आहे.

साहा महिन्याची काशी बरी, तीन महिन्याची पंढरपुरी,
दोन महिन्याची गोदावरी, एका महिन्याची रामेश्वरी,
पंधरा दिवसांचा महादेव, आहे दुःखाच्या डोंगरी.

ही मोठया महादेवाची यात्रा कितीही कठिण, दुष्कर असली तरी वऱ्हाडी माणसाला मात्र या यात्रेचे फार आकर्षण आहे. या महादेवाच्या गीतांबद्दल त्याच्या मनात जिव्हाळा व ओढ आहे, हे निर्विवाद.

⊗⊗⊗

अनुक्रमणिका

रमेश कांबळे / उत्थानगुंफा

'प्रबोधन प्रकाशन' तर्फे नुकताच प्रकाशित झालेला प्रा. यशवंत मनोहर यांचा 'उत्थानगुंफा' हा कवितासंग्रह जीवन आणि काव्य यांचे एकजीव रसायन झालेली 'काव्यात्म शैली' हा त्यांच्या लेखनाचा विशेष आहे. जीवन जगावे, जगण्याचाच एक उन्नत प्रकार म्हणून शतकानुशतके चिरडल्या गेलेल्या समाजाच्या क्रांतीविषयी अनोखे चिंतन करावे आणि या जगण्यातून जे संचित हाती येईल ते या दलित समाजपुरुषाला अर्पण करावे अशी ही प्रा. यशवंतांची 'मनोहर काव्यात्म वृत्ती' आहे.

'दलित' हे विशेषण प्रा. मनोहरांना केवळ जातीपुरते मर्यादित नाही; दलित वर्गाच्या वर्तुळातही ते फिरत नाही, तर संपूर्ण दलित-शोषित समाज अशी ही त्यांची व्यापक जीवनदृष्टी आहे.

आजच्या मराठी साहित्यात दलित साहित्याचा प्रभावी प्रवाह दिसून येतो. कविताक्षेत्रात दलित कवितेचे अमाप पीक आले आहे. नामदेव ढसाळ, दया पवार, राजा ढाले, त्र्यंबक सपकाळे, अर्जून डांगळे, केशव मेश्राम, वामन निंबाळकर आदी प्रमुख कवींच्या कवितांनी मांडलेल्या विद्रोहातून विषमतेची, अत्याचाराची व शोषणाची जाणीव समाजाच्या निदर्शनास आणून दिली होती. परंतु या कवीभोवती आता त्याच-त्या-पणाची वलये निर्माण होऊ लागली होती. आत्मनिष्ठेच्या केंद्राभोवती कविता गरगरत होती. त्यामुळे एक मर्यादा ठरण्याची भीती वाटत होती.

अशा या पार्श्वभूमीवर 'उत्थानगुंफे'चा आत्मविश्वास जबरदस्त वाटतो. अग्निप्रलय, विजांचा कडकडाट व लखलखाट करीत ही कविता पुढे आली. आपल्या गर्जनेने नवे सूर्यायण घडविण्याची उमेद घेऊन आली. दलित-कवितेला पडू पाहणाऱ्या मर्यादांच्या रेषा तिने पुसून टाकल्या.

'उत्थानगुंफे'च्या अगदी अर्पणपत्रिकेच्या पहिल्या पानापासून तो अखेरच्या कवितेपर्यंत हा आत्मविश्वास जबरदस्त आहे. 'जो जे होऊनी असे तेचि बोले, हेच खरे'—पुस्तकातील काही अभिप्राय याचा प्रत्यय देतील. "निर्मळ मनाच्या रसिकांना सांगणे एवढेच, या कवीचा स्वतःवरचा विश्वास कुणापुढे शरण पत्करण्यासाठी जन्माला आला नाही." असे कवितेबद्दल लिहून पुढे अर्पणपत्रिकेत प्रा. मनोहर लिहितात, "येथील ईश्वरशाही, अध्यात्म व कर्मविपाकशाही यांच्या नावांखाली शतकानुशतके चाललेल्या अमानुष शोषणाचा, जळजळीत आयुष्याने मृत्युलेख लिहिणाऱ्या बाबासाहेब आंबेडकर नावाच्या सर्व दलितांच्या युगप्रवर्तक विद्रोहाला आणि माझ्या कवितेला कुळारंभ देणाऱ्या मराठीतील आदिविद्रोही कवी केशवसुतांना माझी कविता अर्पण आहे."

'केशवसुत' या कवितेत ते लिहितात, "धगधगत्या वणव्यासारखा तू भांडलास इथल्या काळोखाशी हाती येईल ते हाणून. त्याच्या मग्रुरीचा मेरु तू कासाविस केला. तू उजेडाच्या धरणाच्या भिंती फोडल्यास. अरे ईश्वराचे थोबाड खेटराने रंगवणारा तू, माणसासाठी तुझा शब्द माय झाला. केशवसुता, आम्ही ज्वालामुखी झालो आहोत. इथल्या काळोखाशी आम्ही तुझ्या दाहकतेने भांडू लागलो आहोत."

केशवसुतांनी कुळारंभ केलेल्या या आदिविद्रोही परंपरेत आता पुढे काय हवे ? 'येथून पुढे' या कवितेत कवी म्हणतो:—

"येथून पुढे मी सूर्यकुलांची लागवड करणार आहे. आणि तुमच्या ओठांतून ज्वालांचे जळते पीक घेणार आहे. इथेच मी तुमच्या महाकाव्यांची बागाईत करणार आहे. आणि उद्याच्या क्रांतीला बांधून आणणाऱ्या युगंधर विवेकाचे खतपाणी देणार आहे. राखण करील या पिकाची माझी कविता या चोरांपासून, हरामखोरांपासून, हे चोर कोण ? हे हरामखोर कोण ? या जाणिवेचे 'वैरी' कोण आहेत, तर — ते ग्रीष्म माझे 'वैरी' आहेत. ज्यांनी इथे प्रामाणिकपणा रुजू दिला नाही, ज्यांच्या शोषक कल्पनांनी भीषण गावकूस घडवले - कपटी चांडाळ ते आहेत, ज्यांनी माणूसपण इथे शब्दातच सडवले."

त्या हरामखोर परंपरांवर हा कवी विध्वंसाचा नांगर धरू पाहतो आहे. देव, दैव व शद्वप्रामाण्य मानणारे सर्वच कवीचे नव्हे, तर या दलित समाजाचेच वैरी आहेत. कारण त्यांनीच अस्पृश्यता अभंग केली, तिची मधुर ओवी केली.

प्रा. मनोहरांची कविता रसिकाला अक्षरशः हादरवून सोडते. ही कविता शद्बांची केवळ किमया नाहीच. अनुभूती, अनुभव घेऊन ती सहज आत्माविष्कार करते. कारण तिच्यातील 'दलित-जाणीव' अत्यंत महत्वाची आहे. या जाणिवेतून अवतरलेल्या उत्कटतेत सच्चेपणाचा सूर आहे. म्हणून ती कविता नाटकी होत नाही. ती केवळ संकेत म्हणून येत नाही. 'उत्थानगुंफा' म्हणजे काव्यप्रयोग नव्हे तर ते प्रा. मनोहरांचे एक उत्कट, अनौपचारिक व समतेच्या पातळीवरचे जगणे आहे.

ही कविता आत्मकेंद्रित नाही. हा कवी स्वार्थी नाही असेही नाही. परंतु प्रा. मनोहरांचा हा स्वार्थ केवळ कवीच्या देहापुरता मर्यादित नाही; तो कवीच्या जातीपुरताही मर्यादित नाही. तर संपूर्ण दलित समाजासाठी, त्या जाणिवेसाठी तो स्वार्थ आला आहे. 'स्व'-कडून समाजाकडे जाणारी; नवे विश्व, नवे क्रांतियुग निर्माण करू पाहणारी ही कविता आहे. सांस्कृतिक लढा तिला हवा आहे. प्रा. मनोहर यांचा 'मी' हा वर्णविषमता, दुःख, दैन्य व दास्य यांच्या विरोधात चालू असलेल्या संघर्षात प्रकटतो. मनोहरांचा 'मी' हा देव-धर्म-देशापेक्षा 'माणूस' मोठा आहे हे सांगतो. या विद्रोहाच्या परंपरेचा मूळ पुरुष 'चार्वाक' आहे असे हा कवी मानतो. म्हणून चार्वाकापासून आंबेडकरांपर्यंत विद्रोहाची ज्वलंत परंपरा कायम ठेवणाऱ्या महापुरुषांसमोर तो नतमस्तक होतो व ती परंपरा तितकीच जिवंतच नव्हे, तर त्यातून नवे क्रांतियुगदेखील घडेल अशी खात्री तो बाळगतो. 'मला पाहून आता' या कवितेत कवी म्हणतो :—

"मला पाहून आता तुमचा सर्वकर्ता करविता परमात्माही
माझ्या पायावर नम्र डोके ठेवून मला क्षमा मागणार आहे
मी आंबेडकरांच्या ओठांवर उगवलेला प्रलयंकारी सूर्य आहे"

आम्ही आता नवे सूर्ययुग निर्माण करण्यास समर्थ आहोत. पण एकटया कवीला हे शक्य नाही : एका झाडाच्या हालचालीने झंझावात सुटत नाहीत. याकरिता कवी दलितांना आवाहन करतो :—

"होऊनी विद्रोह जळता मागितो तुम्हांस हाका
खड्गावरी तुमच्या करातील लिहीन क्रांतीच्या कविता
तुफान झालो आज मी जरा साथ द्या ...
आग झालो आज मी आगाग झालो
ज्वालामुखीला ओठी तुमच्या वाट द्या"

दलित चळवळीमध्ये थोर व्यक्तिमत्व नसल्याची खंत कवीला आहे. डॉ. आंबेडकरांना कवी प्रश्न विचारतो :—

"आमची लक्तरलेली आयुष्ये शिवलीत
तो सुईदोरा कुठे ठेवलात
अरे या बेशरम अत्याचारांना फाडतांना आम्ही विजयी होऊत
असे विजांचे शस्त्रसाठे तू कुठे ठेवलेस, कुठे ठेवलेस ?"

प्रा. मनोहरांच्या या कवितांची जात विद्रोहात्मक आहे, हे मान्य; पण विद्रोह म्हणजे विध्वंस नव्हे हे लक्षात घ्यावयास हवे. विद्रोह हा विध्वंस राहीलच तरी कसा? विद्रोहातून काहीतरी नवे निर्माण करायचे असते म्हणजेच काहीतरी जतनही करायचे असते. मागूनही हक्क मिळत नाहीत म्हणून तर ही क्रांती हवी आहे.

हे सारे आवाहन करताना व आव्हान देताना कवीलाही आपल्या मर्यादांची जाण आहे. कुठेकुठे ही कविता नैराश्याकडे झुकते. कारुण्याची झालर तिला लाभली आहे हेही तिचे वैशिष्टय.

या कवीच्या डोळ्यांत अंगार आणि आसू सोबतीनेच आहेत. अंगार कशासाठी तर जे शतकानुशतके शोषण करीत आलेत त्यांना जाळण्यासाठी; व आसू कशासाठी तर जे पेटत आलेत त्यांना विझवण्यासाठी. या कवितेत दुखावलेली अस्सल माणुसकी आहे म्हणूनच दु:खाचे ते स्वरूपही अस्सलच आहे. कवितेतील औदासिन्य उपरोधातून नाही तर कारुण्यातून आहे. 'परिशिष्टा'तील बारा कविता याचा प्रत्यय देतात :—

अ) कालचा पाऊस आमच्या गावात आलाच नाही
सदरहू पीक आम्ही आसवांवर काढले आहे.
आ) माझी कविता उपाशी जन्मांसाठी उपोषणाला बसली आहे.
इ) माझे हृदय विकत मागणाऱ्या बाजाराला उद्देशून मी जहरतो आहे
मी शद्बांशी सौदा केला नाही शद्बांनीच मला पोटाशी घेतले आहे.
ई) मी पेश केले आहे माझे हुंदरणारे काळीज आणि माथे भडकलेले वादळ
माझ्या पद्धतीने माझ्या अक्षरांमध्ये.
उ) आहे जीव तोवर पाखडीत जाणारच आहे
शेवटचा दिस गोड होवो न होवो.

'आम्ही झालो गुंफा' या कवितेत ते म्हणतात :—

'नका दाऊ आम्हा । देवाजीचा धाक ।
तोही आम्हा साप । ठेचू तया ।।
पाखंड्यांनो आता । नका मारू थापा ।।
आम्ही झालो गुंफा । उत्थानाच्या' ।।

काही कवितांमधून उदासीनता दिसत असली तरी उदासीनतेची व नैराश्याची ही पूजा नव्हे. तर वस्तुस्थितीचे व क्रांतीच्या उत्कटतेचे हे दर्शन आहे. उदासीनतेचे हे समर्थन नाहीच. माझ्या डोळ्यांतली आसवे पाहून जर तुमची अंत:करणे पेटत नसतील तर त्या उदासीनतेला काही अर्थ नाही. अशीही प्रा. मनोहरांची आत्मविश्वासाची व रोखठोक भूमिका आहे.

उत्थानगुंफा (कवितासंग्रह), कवी प्रा. यशवंत मनोहर; प्रबोधन प्रकाशन, औरंगाबाद, पृष्ठसंख्या–८४; मूल्य १० रुपये.

⊗ ⊗ ⊗

सुरेश गांजरे / आभाळ

उधारीत घेतलेलं
हास्य संपते तेव्हा
तोडून घ्यावे वाटतात
दोन लचके,
बेईमान आयुष्याचे
—आभाळात फेकून देण्यासाठी.
प्रसुतीच्या वांझ वेदना घेऊन
जगण्याची जिद्द बाळगून
करायचा आहे नवा सौदा
एका उंच हातासाठी
अन्—
छाटून टाकायचं आहे
ते आभाळ
उंच हात पोचण्यापूर्वीच !

अनुक्रमणिका

द. प. इंगोले / दलित मुक्तिलढा आणि दलित साहित्य

श्री. वामन इंगळे यांची साहित्यसेवा संख्यात्मकदृष्टया अल्प असली तरी गुणात्मकदृष्टया संपन्न आहे. श्री. इंगळे यांचे 'दलित मुक्तिलढा आणि दलित साहित्य' हे पुस्तक १९७५ मधील आहे. त्याची 'पूर्वचर्चा' नामक प्रस्तावना फ. मु. शिंदे या तरुण कवीची लाभलेली आहे.

या ग्रंथाची विभागणी नऊ प्रकरणांत केलेली आहे. हे एक छोटेखानी म्हणजे केवळ ४६ पृष्ठांचे समीक्षापर पुस्तक असून त्यात लेखकाने प्रस्तुत विषयाला भरपूर न्याय देण्याची अपेक्षा करणे योग्य नाही. अनेक विषयांचे ढोबळ मानाने विश्लेषण तेवढे यात आढळते. अनेक संकल्पना वामन इंगळचांनी संदिग्ध स्वरूपात सादर केल्या आहेत. मुख्य विषय हाताळताना विषयांतराचे प्रसंगही वारंवार आढळतात. तरीसुद्धा त्यांची काही विधाने निर्भेळ सत्याच्या जवळपास जाणारी आहेत हे मात्र निर्विवाद.

इंगळचांनी दलित साहित्याविषयी असे भाष्य केले आहे:— 'दलित साहित्य ही संज्ञा मूलतः प्रश्नसूचक आहे. महार, चांभार, मातंग, खाटिक, भंगी या आणि यांसारख्या जातींच्या (अस्पृश्यताविषयक आणि संलग्न) प्रश्नांचा विचार आणि ललित कृती-द्वारा आविष्कार करणाऱ्या साहित्याला दलित साहित्य म्हणता येते. परंतु दलित साहित्याची व्याख्या इतकी संकुचित मुळीच नाही. अनेकांना अपेक्षित असलेल्या व्यापकतेचे समावेशन त्यात नाही.

'दलित' या शब्दाची व्याख्या केवळ महार, मांग, चांभार, खाटिक, भंगी यांच्यापुरतीच मर्यादित नाही तर जे जे पिळले गेलेले श्रमजीवी आहेत ते सर्व 'दलित' या संज्ञेत मोडतात. अशा पिळल्या गेलेल्यांच्या व्यथा-वेदनांचा यथार्थ आविष्कार ज्या साहित्यात होतो ते दलित साहित्य. हीच खरी दलित साहित्याची व्याप्ती.

या ग्रंथाच्या दुसऱ्या प्रकरणात नारायण सुर्वे हे जन्माने दलित की आणखी कोणी ? हा प्रश्न इंगळचांनी उपस्थित केला आहे आणि या प्रश्नास स्वतःच त्यांनी 'वानरी उत्सुकता' असे म्हणूनदेखील टाकले आहे ! दलित साहित्याचे वस्तुनिष्ठ दृष्टचा परीक्षण केले तर या संदर्भातील साहित्यकृतीच्या निर्मात्यासंबंधी असे प्रश्न वस्तुतः निर्माण होऊ नयेत. ऋषीचे कूळ व नदीचे मूळ शोधू नये म्हणतात. 'ऋषी'— ऐवजी आपण फक्त 'कवी' हा शब्द घालावयाचा म्हणजे इंगळचांच्या उत्सुकतेला उत्तर मिळेल. 'ज्या साहित्यकृतीत दलितांच्या जाणीवा उत्स्फूर्तपणे प्रकट झाल्या आहेत, जे साहित्य वर्गवाद प्रस्थापित करण्या-विरुद्ध बंड करून उठते ते दलित साहित्य व या साहित्याची निर्मिती करणारे दलित साहित्यिक' असे स्पष्टीकरण या क्षेत्रात परस्परावलंबित्वाच्या भूमिकेतून देता येईल. नारायण सुर्व्यांचे उदाहरण घेऊन मानववंशशास्त्रात शिरणे योग्य नाही. तो प्रांत या ग्रंथविषयाला धरून नाही. सुर्व्यांचा पिंड साम्यवादी आहे. आणि साम्यवादी प्रवृत्तीतूनच ते समाजाच्या खालच्या थरातील व्यक्तिसमूहाच्या सुखदुःखाशी समरस होताना कधी आत्मनिष्ठ तर कधी समाजनिष्ठ पातळीवरून त्यांच्या कवितेतून जाणवतात. इथे रक्तगट तपासण्याचा संबंध येतोच कोठे ? सहाव्या प्रकरणाच्या शेवटी श्री. इंगळे बौद्ध वादाच्या पराभवाची मीमांसा आपल्या युक्तिवादाने पटवून देऊ इच्छितात. परंतु ज्या वेळेस देशात क्रांती करण्याचा प्रसंग देशरक्षणाच्या उदात्त भावनेतून निर्माण झाला त्यावेळेस बौद्ध भिख्खूंनी हाती शस्त्र धरल्याची अनेक उदाहरणे आहेत. इंगळे हे रामविलास शर्मासारख्या बौद्ध तत्वज्ञानाच्या एका अभ्यासकाचा आधार घेऊन लिहितात, "खरे पाहता बौद्ध धर्माच्या प्रसाराला राजे लोकांपेक्षा व्यापाऱ्यांनीच जास्त हातभार लावला होता. बुद्धाने जर तत्कालिन अर्थपद्धतीला विरोध केला असता तर या सर्व सुविधा बुद्धाला उपलब्ध होणे शक्य तरी झाले असते काय ?" असल्या दिशाभूल करणाऱ्या विधानाच्या दृष्टांताचा आश्रय लेखकाने घ्यावा याचे

सखेदाश्चर्य वाटते. कारण ज्यावेळी बौद्ध धर्माचा स्वीकार भारतातील सम्राट अशोक व सम्राट हर्षवर्धन यांनी केला होता, त्यावेळेस बौद्ध धर्मास राजाश्रय हा मिळालाच होता. मग 'राजे लोकांपेक्षा व्यापाऱ्यांचा हातभार अधिक' हे विधान कसे पटू शकेल ? स्वत: सम्राट अशोकाने आपली मुले युवराज महेन्द्र आणि युवराज्ञी संघमित्रा यांना बौद्धधर्म प्रसाराकरिता सिलोन (लंका) इथे पाठविले होते हे भारतीय इतिहासाच्या अभ्यासकांना सुपरिचितच आहे.

विवेचनाच्या ओघात लेखक साहित्यमीमांसेकडून धर्मकारणाकडेही वळला आहे आणि नकळत चातुर्वर्ण्याचे समर्थनही त्याच्या हातून घडल्याचे स्पष्टपणे प्रत्ययाला येते.

आजच्या दलित साहित्यामध्ये ना. सी. फडके यांच्या साहित्यसृष्टीतील लोभसवाणे प्रणयविश्व दिसणार नाही, खांडेकरांच्या कादंबऱ्यांतील अशक्य कोटीतला ध्येयवाद आणि दलितांविषयीचा भूतदया-वादी दृष्टिकोनही आढळणार नाही. तर दलित साहित्यात दिसेल फक्त सगळ्या आसमंतात चहूबाजूंनी दाटून आलेला आक्रोश, प्रत्यक्ष जगण्यातून आलेला दारुण अनुभव. कलावंताचे हृदय लाभलेला दलित लेखकच या अनुभवांचे विशेष प्रत्ययकारी चित्रण करु शकेल, असे मला प्रामाणिकपणे वाटते.

दलित मुक्तिलढा आणि दलित साहित्य ले.—वामन इंगळे; कालचक्र प्रकाशन, औरंगाबाद; मूल्य ७ रुपये.

⊗ ⊗ ⊗

पंडित आवळीकर / **एक स्नानमग्ना**

'स्नानमग्ना' या शद्वाबरोवर आपल्या डोळ्यांपुढे अनेक चित्रे तरळू लागतात. त्या शद्वाशी संबंधित असलेल्या अनेक श्रुति-स्मृतींनी कानामनांत गर्दी करावी एवढे सामर्थ्य 'स्नानमग्ना' या एका शद्वात आहे असे मला वाटते. कारण स्नानात मग्न झालेल्या स्त्रीच्या निव्वळ कल्पनेतही सृजनशीलतेला आणि रसिकतेला आव्हान देण्याचे विलक्षण बळ आहे. हे आव्हान एकाच प्रकारचे असणार नाही आणि त्याची प्रतिक्रियाही एकाच साचाची असणार नाही. तशी आवश्यकताही नाही.

माझे लक्ष वेधून घेणाऱ्या एका स्नानमग्नेकडे वळण्यापूर्वी थोडेसे स्पष्टीकरण केले पाहिजे असे मला वाटते. 'स्नान' आणि 'आंघोळ' किंवा 'अंग धुणे' या शद्वांतील ज्या अर्थच्छटा मला जाणवतात त्या इतरांना—विशेषतः भाषाशास्त्र्यांना—मान्य होतीलच असे नाही. सामान्यतः पुरुष करतात ती 'आंघोळ'! बायका उरकतात ते 'अंग धुणे' 'मी अंग धुऊन येतो' असे पुरुष म्हणणार नाहीत. 'मी आंघोळ केली' असे बायका म्हणणार नाहीत. (निदान त्यांनी तसे म्हणू नये!) एखादी आंग्लाळलेली 'बाई' 'मी बाथ घेतला' असे म्हणते ती 'बात' वेगळी! पुरुष 'स्नान' हा शद्व वापरतात. पण 'आंघोळ' करतात. 'गोपीचंदी स्नान', 'स्नानसंध्या' यांतून मनःपूत आणि शास्त्रपूत अश्या पुरुषी आंघोळीचे प्रकार सूचित होतात. पण ते प्रकार नैमित्तिक होत नित्याच्या आंघोळीच! म्हणून 'स्नानमग्न' हे पुरुषी रूप (हिंदी चित्रपटांत दिसत असले आणि 'धरम' प्रिय पोरीवाळींना फार फार प्रिय असले तरी) कवी–चित्रकारांपुढे उभे राहातच नाही! फार तर Bathroom-Singing ने कुणाच्या श्रुती धन्य होत असतील एवढेच!

त्याउलट उघड्यावर स्नान करण्यात मग्न असलेल्या ललनेच्या स्मृती मोजक्याच प्रतिभावंतांनी शद्वांकित अगर रेखांकित केलेल्या आढळतात. विशेषतः एखाद्या नदीत स्नान करीत असलेल्या स्त्रीचे रूप पाहणे आणि त्याने रोमांचित होणे हा अनुभव वेगळा आहे. (स्नानगृहातील स्नानमग्ना चोरटेपणाने——'अवध्य' मधील 'झरोका' पद्धतीने—पाहणे निराळे). प्रतिभावंताची प्रतिक्रिया निखळ सौंदर्यानुभूतीतून व्यक्त होईल तशी लंपट वासनाजागृतीतूनही प्रकट होईल. काहीवेळा ती संमिश्रही असेल. पण याहून वेगळी अशी एखाद्याची प्रतिक्रिया व तिच्यातून निर्माण झालेल्या कलाकृतीचे स्वरूप वेगळेच असू शकेल.

'ओलेती'सारखे चित्र हे काही स्नानमग्नेचे चित्र नव्हे. किंवा 'लंपट ओलें वस्त्र होउनी। अंग अंग तव लिंपुनि घ्यावें' या पु. शि. रेगे यांच्या ओळींत दिसणारी ओलेती हीही स्नानमग्ना नव्हे. तीच गोष्ट अत्र्यांच्या 'यमुनाजळीं'ची! 'यमुनाजळी'त 'त्या' कन्हय्याच्या स्नानमग्ना गोपीची (ज्यांची वस्त्रे कृष्णाने कदंबवृक्षावर नेऊन ठेवली होती)! 'मग्ना'मधील 'तंद्री' नाही. आहे तो थिल्लरपणा. बोरकरांच्या 'सरिंवर सरी आल्या ग' मध्ये 'सचैल न्हाल्या गोपी ग' अशी ओळ आली आणि मी म्हणतो ती 'मग्ना'मधील 'तंद्री' तेथे काहीशी आढळली तरी पावसात भिजणाऱ्या त्या गोपी म्हणजेही स्नानमग्ना नव्हेत. शिवाय त्या 'सचैल' आहेत हेही 'मग्ना'मधील अर्थच्छटेला बाधकच आहे.

स्नानमग्नेचे आव्हान मराठी कवींनी तसे समर्थपणाने स्वीकारलेलेच नाही असे माझे म्हणणे आहे ही माझी खंत आहे. नाही म्हणायला, कुसुमाग्रजांच्या 'ताजमहाल' या कवितेत ताजमहाल वरील उत्प्रेक्षेच्या रूपाने एक 'जलकेली' करण्याला आलेली रूपगर्विता दिसते. कुसुमाग्रज सांगतात :—

> की कालिंदीवर करण्याला जलकेली
> कुणि यक्षलोकिची रूपगर्विता आली
> त्या नितळ दर्पणी विवस्त्र होउनि पाही
> निजलावण्याची उसासलेली वेली!

पण नार्सिसच्या कुळातील ही रूपगर्विता पाण्याच्या नितळ दर्पणात स्वतःचे रूप पाहण्यातच-स्नानापेक्षा अधिक मग्न आहे. प्रत्यक्षात पाहिलेल्या स्नानमग्नेची ती पडछाया असावी. आता मला भेटलेल्या एका स्नानमग्नेकडे वळतो. तिची माझी भेट झाली ती काफकाझमधल्या (म्हणजे कॉकेशियस पर्वतप्रदेशातल्या) कायसिन कुलियेव या रशियन कवीच्या मध्यस्थीमुळे. त्याच्या एका सुरेख कवितेमुळे. कुलियेवच्या मूळ कवितेचे नाव आहे 'ज्हेन्शिना कुपायेत्सा व रिके' मुळातून मी अनुवादलेली ती कविताच आपल्यापुढे सादर करतो. कवितेचे नाव आहे 'एक स्त्री करीत आहे स्नान नदीमध्ये'——

एक स्त्री करीत आहे स्नान नदीमध्ये,
सूर्य आहे उभा दूर हरवून स्वतःमध्ये,
हळुवारपणे ठेवून तिच्या खांद्यावर
स्वतःच्या सोनेरी किरणांचे कर.
तिच्यालगट स्पर्शून मान आपली,
होत आहे चिंब काठावरली रान-सावली.
निःशब्द आहेत तृणांकुर कुरणामधले,
दगडगोटे ओलेते काठावरले.
होते अनावृत स्नानेच्छुका जळात,
ना पाप, ना मरणही कुठंच आढळात.
विश्वात ना हिमवादळं, ना ऋतू हिवाळी,
ना तुरुंग जगात, ना झोळी,
नाहीत युद्धं एकाही खंडामध्ये. .
एक स्त्री करीत आहे स्नान नदीमध्ये.

एका स्नानमग्नेच्या दर्शनासंबंधीची निखळ सौंदर्यानुभूती अगर लंपट वासनाजागृती यांहून वेगळी अशी एका कवीची प्रतिक्रिया आणि तिच्यातून निर्माण झालेली वेगळी अशी कलाकृती म्हणजे कायसिन कुलियेवची ही कविता. या कवितेतील स्नानमग्ना ही कुणी रूपगर्विता नाही की भुरळ घालणारी कामुक सौंदर्यवती नाही. ती नुसती एक 'स्त्री' आहे. ती सुंदर असेलही किंवा नसेलही. परंतु स्त्रीत्वाचे एक निराळेच असे अपार्थिव आणि शद्वातीत सामर्थ्य तिच्याजवळ आहे. तिच्या रूपाचा आणि स्नानक्रियेचा कसलाही तपशील या ठिकाणी नाही. या चतुर्दशपदीत पहिल्या आठ ओळी आणि नंतरच्या सहा ओळी यांचे वरवर अलग वाटणारे परंतु आतून सलग असणारे दोन तुकडे आहेत. 'एक स्त्री करीत आहे स्नान नदीमध्ये' या पहिल्या आणि अखेरच्या ओळींतील मुखड्याने त्या दोन तुकड्यांना विस्मयकारकरीत्या जोडलेले आहे. 'करीत आहे स्नान' आणि 'होते अनावृत' एवढ्याच प्रत्यक्ष तिच्या हातून घडणाऱ्या कृती आहेत. तिच्या अशा या दोन कृतींचा प्रभाव आणि परिणाम स्नानमग्नेत मग्न झालेल्या आसमंताचा आणि दिगंताचा भारून-गेले-पणा—अनुक्रमे पहिल्या आणि दुसऱ्या तुकड्यात मूर्त झालेला आहे.

नदीमध्ये एक स्त्री स्नान करीत आहे हे पाहून, तिच्या खांद्यावर 'हळुवारपणे' आपले सोनेरी कर ठेवून सूर्य स्वतःमध्येच हरवून गेल्याच्या अवस्थेत दूर उभा आहे. ('रवी'त मला 'कवी' स्पष्ट दिसतो). सूर्याच्या बाबतीत असे 'हळुवारपण चित्ता' येते तरी कसे ? स्नानमग्नेच्या दर्शनाने त्याचे एवढे भान हरपते तरी कसे ? तिच्या खांद्यावर आपले सोनेरी कर ठेवून तो कोणती भावना व्यक्त करतो ? स्वतःला विसरून, दुरूनच आपले (कल्पनांचे) हात तिच्या खांद्यावर हळुवारपणे ठेवणाऱ्या कवीलाच रवीची भावना माहीत असेल. एरवी 'चंड', 'मार्तंड' असणाऱ्या सूर्याचे ते 'वितळणे' असावे : आणि तेही स्वेच्छेने. आमच्या ज्ञानदेवांच्या 'तपहीन मार्तंडा'चा आणि 'आलंछन चंद्रम्या'चा साक्षात्कार काफकाझमधील रवीला आणि कवीला त्या स्नान-मग्नेच्या रूपाने झालेला असावा. केवळ सूर्यालाच नव्हे, तर तिला मानेने स्पर्श करून चिंब होत असलेल्या

काठावरल्या रानसावलीला सुद्धा. स्नानमग्नेची अंतर्बाह्य ओलीचिंब आर्द्रता कशी असेल ? पाणीच पाण्यात स्नान करू लागेल तर त्याची आर्द्रता जशी असेल तशीच ! अशा ओलेचिंबपणाला स्पर्श केल्यावर–तोही मान लववून–काठावरली रान-सावलीदेखील चिंब होणारच. कुरणांतले (आधी) सळसळणारे तृणांकुर निःशब्द होतात आणि काठावरले दगडगोटे ओलेते होतात हा स्नानमग्नेचाच प्रभाव आणि तिच्या मूकार्द्र सामर्थ्याचा त्यांना आलेला प्रत्यय होय. आसमंताचा भारून-गेले-पणा पहिल्या तुकड्यात असा मूर्त होतो.

दुसऱ्या तुकड्यातील दिगंताचा भारून-गेले-पणा 'होते अनावृत स्नानेच्छुका जळात' या ओळीने जाणवू लागतो. वास्तविक हा दुसरा तुकडा पहिल्याचीच दुसरी बाजू आहे एकाच नाण्याच्या दुसऱ्या बाजूसारखी. स्नानेच्छुका ही जळात उतरल्यावर 'स्नानमग्ना' होते ती 'होते अनावृत' तेव्हाच. 'करीत आहे स्नान' आणि 'होते अनावृत' या तिच्या क्रिया एककालिक आहेत : दोन क्रिया वाटल्या तरी त्या 'एकच' आहेत. 'होते अनावृत'चा प्रभाव दिगंतावरील परिणामांतून दृग्गोचर होतो. 'ना पाप, ना मरणही, ना हिमवादळं, ना ऋतू हिवाळी, ना तुरुंग, ना झोळी, नाहीत युद्धं,' ही स्थिती 'दुरिताचें तिमिर जाओ', 'अर्णव । पीयूखांचे', किंवा 'वांछिल तें तें लाहो । प्राणिजात' या ज्ञानदेवांच्या 'पसायदाना'शी आंतरिक नाते सांगणारी आहे. थोडेसे गंमतीने, पण खरोखर गंभीरपणाने मला असे म्हणावेसे वाटते की, काय्सिन कुलियेवची ही स्नानमग्ना आदिजननीच्या निरंजन स्वरूपात जणू 'पसायदान'च म्हणत स्नानात मग्न झालेली असावी. ही स्नानमग्ना एक 'स्त्री' खरी पण ती आदिजननी आहे. 'करीत आहे स्नान' 'होते अनावृत' यांतील तिच्या स्नान करण्याला आणि अनावृत होण्याला निराळेच अर्थ आहेत. आपण 'गंगा-माता' म्हणतो त्याप्रमाणे 'मात्-वोल्गा' (मात् म्हणजे 'माता' :) 'वोल्गा-माता' म्हणणारे मातृपूजक रशियन मन अशी वेगळीच एक स्नानमग्ना शद्बांकित करू शकते याचे हे प्रत्यंतर मोठे सुखद आहे. स्त्रीचे प्रभावी मातृस्वरूप कुलियेव्च्या 'ग्द्ये-तो स्तन्येत् ज्हेग्शिना द्वाली' या कवितेत वेगळ्या तऱ्हेने प्रकट झालेले आहे. केवळ आठ ओळींची ती कविता कवीच्या मनातील 'स्त्री'चे मातृस्वरूप अधिक स्पष्ट करते. त्या ओळींचा माझा अनुवाद असा :––

कुठंतरी कण्हते एक स्त्री दूरवर,
गाताना गीत — अंगाई,
सनातन भय-चिंता, ज्या जगभर,
टाकतात भरून गीत–अंगाई.
पहिली गोळी युद्धातील कुठल्याही
घुसते हृदयात मातेच्या.
कुणीही जिंको अखेरची लढाई,
पण जागतं दुःख हृदयात मातेच्या.

या कवितेवर मी भाष्य करीत नाही. परंतू या कवितेतील 'एक स्त्री' आणि स्नानमग्ना 'एक स्त्री' यांची एकरूपता मात्र पुन्हा आपल्या नजरेस आणतो. आणि या रूपाचा साक्षात्कार घडविणाऱ्या काय्सिन कुलियेवला, त्याच्याच भाषेत मनःपूर्वक म्हणतो "खराशो ! ओचिन् खराशो !"

⊗ ⊗ ⊗

अनुक्रमणिका

शशिकला कार्लेकर / **पार्थिवतेचे उदयास्त**

द. भि. कुळकर्णी यांच्या समीक्षालेखात प्रामुख्याने विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील वाङ्मयीन प्रवाहांचे वळण अधोरेखित करायचा प्रयत्न केला आहे. कविता, कथा, कादंबरी, ललितनिबंध या वाङ्मय-प्रकारांचा प्रामुख्याने विचार केलेला आढळतो. विसाव्या शतकातील वाङ्मयावर तत्कालीन सर्वांगीण प्रभाव, परभाषिक वाङ्मयप्रवाह आणि पाश्चात्य विचारवंतांचा प्रभावही दिसतो. हे सर्व न्याहाळण्याचा प्रयत्न द. भि. करतात. हा सारा आवाका व त्यावरील परिणाम यांची चर्चा हे लक्षात घेता रसिकांना वाङ्मयाचा सर्वांगीण आस्वाद घेण्यासाठी द. भि. किती काळजीपूर्वक लेखन करतात ते लक्षात येते.

जी. ए. कमल देसाई, पु. शि. नेमाडे, ग्रेस, दिलीप, चित्रे यांच्या वाङ्मयातील प्रतिमा, शब्द अभिव्यक्तीची पद्धती, त्यातील अनुभव त्यांची अपरिहार्यता हे सारे न्याहाळण्याची व त्यानुसार येणाऱ्या अस्तित्ववादाची द. भि. ओळख करून देतात. "जगात स्थिर काय आहे ?" याचा विचार पूर्वीपासून चालू आहे, प्रश्न तेच असतात, केवळ दिशा बदलतात.

कोणतीही कलाकृती पूर्ण कळावीच असा आग्रह आपण धरू शकत नाही. जसे आकाश पूर्ण कळले, आकाशांचे सर्व रंग, खोली सारे आपल्याला कळले असे ठाम म्हणणे अवघड असते. हास्यास्पद असते. कारण चांगली कलाकृती काय किंवा निसर्ग काय दोन्ही विलक्षण लवचिक असतात. द. भि. जेव्हा एखाद्या कलाकृतीची समीक्षा करतात तेव्हा समीक्षेची लय बिघडत नाही. एकेका गोष्टीचे सहज विवेचन करत ते पुढे जातात. त्यांच्यातील रसिकाची उपस्थिती इथे महत्वाची ठरते.

आजच्या वाङ्मयीन भाषेसंबंधी बोलतांना अलंकार्य व अलंकार याचे चांगले विवेचन द. भि. करतात. जाणीवपूर्वक आलेली अलंकारिक भाषा यासंबंधी द. भि. सांगतात, प्रतीके व प्रतिमा यामधून पुढे जाणारा वाङ्मय-ओघ यावद्दलही ते सांगतात, प्रतीके व प्रतिमा यांचा नेमका अर्थ व त्यांचे अपरिहार्यत्व (कलाकृतीच्या संदर्भात) हे ते पटवून सांगतात.

'कोसला'संबंधी ते चांगले विधान करतात, जे नेमकेपणे नेमाडचांचे अनुभवविश्व उकलते.

"विचित्र कारंजातील पाणी क्षणाक्षणाला वर उडावे आणि क्षणाला पुन्हा आल्यावाटेने आत शोषले जावे." कारंजे म्हणजे खरे तर पाण्याचा उन्मुक्त अविष्कार तरीही त्यात पाणी विचित्र उंचीपर्यंत उडण्यासाठी बंदिस्त अशी योजना असते. उन्मुक्त तरीही बंदिस्त अशा तऱ्हेने कारंजे ही संज्ञा इथे लक्षात घ्यावी लागते. कारंजाचा आत-बाहेर असा उन्मुक्त बंदिस्त प्रवास अव्याहत चालू आणि त्या प्रवासावर एका शक्तीचे नियंत्रण अशा तऱ्हेनें हे विधान लक्षात घेतले की त्यातील लक्ष्यार्थ सहज जाणवतो.

प्राणी व वनस्पती या माध्यमातून जी. ए. कथा कशी पुढे नेतात हे सांगायचा व त्या कथांमधली माणसे भावनेने जाणवून घ्यायचा प्रामाणिक प्रयत्न द. भि. करतात. सामान्य माणसे पण त्यांच्यावरचे कोसळते आक्रित असामान्य, सारे आयुष्य हादरवून टाकणारे संकट तरीही त्यांची त्या माणसांची चिवटता एका अतूट प्रेमाच्या वळावर त्या विलक्षण माणसांचे संकटांना सामोरे जाणे थरकाप उडवणारे, थक्क करणारे असते. शोकात्म नायकाची खास लक्षणे किंवा खास इतिहास, पार्श्वभूमी त्याच्यामागे नसते. प्रचंड सोशिकपणा हे सारे त्यांना करायला भाग पाडतो. मृत्यु, जगणे, एखादी वस्तू यांची अनिवार ओढ द. भि. उलगडण्याचा प्रयत्न करतात. जी. ए. च्या कथांतील वातावरणाचा विचार द. भि. करतात. काजळमाया हा जी. ए. चा महत्वाचा संग्रह, त्यासंबंधी द. भि. चे मत असे की "काजळमायाचा सौंदर्यकंद रूपककथा नाही", हे मत सर्वांना स्वीकृत वाटणार नाही. 'विदूषक', 'रत्न', 'ठिपका', 'गलाम' या रूपककथांमधून जाणवलेले जी. ए. चे जीवनाविषयीचे तत्वज्ञान, जी. ए. ना

जाणवलेली जीवनातील विफलता, माणसांवर नियंत्रण करणारी शक्ती, त्या शक्तीचे वर्चस्व, त्या माणसांचा जीवनप्रवास गोठलेला व पशू आणि निर्जीव, सजीव वस्तू या प्रतिकांतून जाणवणारे मानवाचे थिटेपण सारे जी. ए. च्या कथात शोकान्तिकेचे सधन रंग भरू पाहाते. पूर्वीपासूनच असलेल्या रूपक कथांच्या प्रवाहाला जी. ए. नी दिलेले देखणे वळण चकीत करते. त्यात रूपक कथात तात्विक अंगाने विकार होतो म्हणून द. भि. कुळकर्णी यांना त्यातील सौंदर्याला गालबोट लागते असे वाटत असावे.

जी. ए. कुळकर्णी यांची कथा शिल्पासारखी वाटते, असे रसिक द. भि. सांगतात तेव्हाच त्यांना असे म्हणायचे असते की शिल्पाकृतीचे सौंदर्य शिल्पाकृतीतच अनुस्युत असते, त्याला भोवताली पार्श्वभूमी आवश्यक नसते, शिल्पाकृतीद्वारे सौंदर्यानुभव समर्थपणे आपल्यापर्यंत पोचवला जातो.

चित्र्यांच्या कवितेसंबंधीचे संवेदनाचे अनोखे दर्शन या समीक्षालेखात दिसते. चित्र्यांच्या कवितेला कोणत्याच संज्ञेत बंदिस्त करता येत नाही असे मत मांडून द. भि. त्यांचा एकप्रकारे गौरवच करतात. अनेकदा रसिकांना कवितेतील प्रतिमा, संवेदनाचित्र नीटसे न उलगडल्याने कवितेचा आस्वाद घेणे अवघड होते तेव्हा अशा समिक्षालेखाने रसिकांची अडचण दूर होऊन एक नवा प्रकाशच त्या कलाकृतीला (कविता, कथा इत्यादी) म्हणजेच त्यातील सौंदर्याला प्रकाशमान करतो.

'चर्चवेल' या लेखात एक त्रुटी जाणवते ती ही की ग्रेसच्या लेखांचा किंवा त्यांच्या कोणत्याही वाङमयकृतीचा विचार होताना त्यांचा काव्यात्म पिंड दुर्लक्षित करून चालणार नाही. समीक्षक द. भि. ग्रेसच्या ललित लेखांचे भाग पाडतात ते खटकते व आस्वाद प्रक्रियेला अडचण निर्माण होते. कारण 'चर्चवेल' हा मुळात एकसंघ असा अनुभव आहे.

हे सारे समीक्षालेख या पुस्तकात छापण्यापूर्वी 'तरुण भारत', 'सत्यकथा' यांमध्ये प्रसिद्ध झालेले आहेत. त्यांनी हे लेख तसेच पुन्हा दुसऱ्यांदा प्रसिद्ध केले तेव्हा त्यात थोडी अधिक भर घातली असती तर अधिक बरे झाले असते, कारण चित्रे, ग्रेस, नेमाडे, जी. ए. यांच्या लेखनात अधिक भर पडली आहे. त्याचाही विचार झाला असता व आजमितीस यांचे जेवढे उपलब्ध साहित्य आहे त्याचा पूर्ण आलेखच रसिकांसमोर आला असता, यासाठी ही सूचना केली.

द. भि. हे जाणकार समीक्षक आहेतच पण ते कलाकृतीकडे भावनुभवातून निर्माण झालेले अनोखे शिल्प ह्या रसिकाच्या भूमिकेतून पाहातात हे विशेषत्वाने जाणवते. या समीक्षालेखांच्या अनुरोधाने वाचकाला वाङमयकृती रसिकतेने अनुभवायची, वाङमयकृतीकडे निरनिराळ्या दृष्टिकोनातून पाहायची एक दिशाच गवसते.

पार्थिवतेचे उदयास्त द. भि. कुळकर्णी
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७७.
पृष्ठे ८९, मूल्य ९ रुपये.

⊗ ⊗ ⊗

विदर्भ साहित्य संघ

कार्यवृत्त (१९ डिसेंबर, १९७७ ते १५ फेब्रुवारी, १९७८)

गो. स. देहाडराय, सरचिटणीस

१. कार्यालय व्यवस्थापन

१.१ दि. १९–१–७८ ला विश्वस्तांची सभा झाली. विश्वस्त डॉ. वा. शि. वारलिंगे यांनी पंचाहत्तरव्या वर्षात पदार्पण केल्यावद्दल त्यांना या सभेत पुष्पहार अर्पण करून त्यांचे अभीष्टचिंतन करण्यात आले. तसेच संघाध्यक्ष डॉ. मधुकर आष्टीकर यांची साहित्य अकादमीवर सदस्य म्हणून निवड झाल्यावद्दल त्यांचेही पुष्पमालेने अभिनंदन करण्यात आले.

२. आजीव सभासद चुकीची दुरुस्ती – मागच्या कार्यवृत्तातील नाव नामदार श्री. नाईक सुधाकरराव राजूसिंग, पुसद, असे वाचावे.

२ (अ) – मानचिन्ह : नागपूर महानगरपालिका यांचेकडून वि. सा. संघाला पालिकेच्या रजत्‌जयंती-निमित्त मानचिन्ह मिळाले.

३. सांस्कृतिक कार्यक्रम:

३.१ संघाचा पंचावन्नावा वर्धापन दिन दि. १४ जानेवारी, १९७८ ला मकर संक्रमणदिनी संघाचा पंचावन्नावा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. इतिहास संशोधक व शिवशाहीर श्री. व. मो. उपाख्य वावासाहेव पुरंदरे अध्यक्षस्थानी होते. या प्रसंगी डॉ. व. शि. पुरोहित, डॉ. व. वि. कुलकर्णी, डॉ. मधुकरराव पाठक व डॉ. सौ. चेतना दुरगकर ह्यांना (मराठीत) पीएच. डी. पदवी मिळाल्यावद्दल श्रीफल व शाल देऊन सत्कार करण्यात आला. तसेच श्री. आ. रा. उपाख्य आप्पासाहेव देशपांडे यांना साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळाल्यावद्दल त्यांचा गौरव करण्यात आला. डॉ. वि. वा. प्रभुदेसाई हे नागपूर विद्यापीठ मराठी विभाग प्रमुख झाल्यावद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला. समारंभाचे अध्यक्ष श्री. वावासाहेव पुरंदरे यांच्या भाषणानंतर संघाध्यक्ष डॉ. मधुकर आष्टीकर यांनी त्यांचे व इतर उपस्थितांचे आभार मानले. तिळगूळ वितरणानंतर हा कार्यक्रम संपला. या निमित्ताने १५–१–७८ ला रसिकरंजन या संस्थेने 'राजाचा खेळ,' नवप्रभात या संस्थेने 'कांमन इव्हनिंग' व सुभाष मंडळाने 'सायलेन्स खटला चालू आहे' या तीन एकांकिका सादर केल्या.

३.२ सन्माननीयांच्या भेटी :

दि. २९ डिसेंबर, १९७७ ला "श्री" साप्ताहिकाचे संपादक वसंत सोपारकर व 'मराठी व्लिट्झ'चे संपादक श्री. भाऊ तारसेकर यांनी संघाला भेट दिली. त्याप्रसंगी 'वृत्तपत्रात मराठी साहित्याचे योगदान' या विषयासंवंधी उपस्थितांशी त्यांनी चर्चा केली.

३.३ दि. ९–१–७८ ला सकाळी सुप्रसिद्ध कवी श्री. वसंत बापट, नारायण सुर्वे, केशव मेश्राम, मंगेश पाडगावकर, शंकर वैद्य व विंदा करंदीकर यांनी संघाला भेट दिली, त्याप्रसंगी त्यांचा सत्कार करण्यात आला. उपस्थितांशी त्यांनी आजच्या कवितेची वाटचाल याविषयी उद्‌वोधक चर्चा केली.

३.४ दि. ९–१–७८ ला सायंकाळी श्री. उद्धव शेळके व मनोहर तल्हार यांनी वि. सा. संघाला भेट दिली. कादंबरी विषयक: लेखक आणि वाचक यांच्या परस्पर अपेक्षांबद्दल उपस्थितांशी मनमोकळी चर्चा झाली.

३.५ श्री. वेहेरे व्याख्यानमाला

यावर्षी कै. ना. के. बेहेरे व्याख्यानमाला दि. १४ व १५ फेब्रुवारी १९७८ या दोन दिवशी गडकरी सभागृहात सुप्रसिद्ध साहित्यिक व कर्नाटक महाविद्यालय, धारवाड, येथील मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. पंडित आवळीकर यांनी 'कवींचे धर्मांतर' व 'कवींचे आकलन' या विषयांवर गुंफिली. व्याख्यानानंतर त्यांनी रशियन कवींचा व त्यांच्या काव्याचा परामर्श घेतला. डॉ. प्रभुदेसाई यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला. कविवर्य अनिल यांनी अध्यक्षस्थान भूषविले होते.

३.६ दिवंगतांना श्रद्धांजली संघाचे आजीव सदस्य, खामगाव येथे १९५३ साली आयोजिलेल्या विदर्भ साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, थोरकवी व साक्षेपी समीक्षक प्रा. भवानीशंकर श्रीधर पंडित यांचे दि. २१–१–७८ ला दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनानिमित्त २२–१–७८ ला संघाध्यक्ष डॉ. मधुकर आष्टीकर यांच्या अध्यक्षतेखाली शोकसभा झाली. त्याप्रसंगी डॉ. वि. भि. उपाध्य भाऊसाहेब कोलते, डॉ. सुरेश डोळके, प्रा. श्री. मा. कुळकर्णी, डॉ. वि. बा. प्रभुदेसाई, डॉ. म. रा. जोशी, प्रा. अनुराधा केणे, डॉ. सौ. शंकुतलाबाई खोत, डॉ. मधुकर आष्टीकर व श्री. गो. स. देहाडराय यांनी आपल्या भाषणात कै. पंडितांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. शेवटी संघाध्यक्ष डॉ. मधुकर आष्टीकर यांनी दुखवटयाचा ठराव वाचून दाखविला. त्यावेळी उपस्थितांनी दोन मिनिटे स्तब्ध राहून आपली संवेदना व्यक्त केली.

३.७ नागपुरातील जुन्या पिढीतील थोर नागरिक व संघाचे आश्रयदाते श्रीमंत माधवराव उपाख्य राजाबाळ चिटणवीस यांचे २१–१–७८ ला निधन झाल्याचे कळताच संघातर्फे शोकसंवेदना व्यक्त करण्यात आली.

३.८ गडकरी स्मृतिदिन : दिनांक २३–१–७८ ला सकाळी सावनेर येथील कै. गडकरी यांच्या स्मृति समाधीला संघातर्फे पुष्पहार सर्मपित करून भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. त्याच दिवशी सायंकाळी ७ वाजता गडकरी सभागृहातील आयोजित गडकरी स्मृतिदिन प्रसंगी संघाध्यक्ष डॉ. मधुकर आष्टीकर यांचे हस्ते कै. डावरे एकांकिका स्पर्धेतील मानकऱ्यांना पारितोषिके देण्यात आली. स्मृतिदिनाच्या अनुषंगाने दि. २४–१–७८ ला नागपूरातील उदयोन्मुख संस्था 'अभिव्यक्ति' या संस्थेने 'गडकरी दर्शन' हा अभिनव उपक्रम सादर केला. नागपूरचे तरूण समीक्षक श्री. अक्षयकुमार काळे ह्यांनी गडकऱ्यांच्या विविध साहित्य गुणांचे शब्दांकन केले.

३.९ व्याख्यान आयकर सल्लागार श्री. शांतिलाल शहा ह्यांचे दि. २७–१–७८ ला 'वैज्ञानिक युगात धर्माचे स्थान' या विषयावर व्याख्यान झाले.

३.१० गांधी निर्वाणदिन दि. ३०–१–७८ ला गांधी निर्वाण दिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला.

३.११ तीन कवी एक समीक्षक हा कार्यक्रम दि. ४–२–७८ ला झाला. यात सर्वश्री रमेश कावळे, पद्माकर पाटील, कु. विजया देशपांडे या तीन कवींनी आपल्या कविता म्हटल्या. समीक्षक होते श्री. जेमीनी कडू.

४. संगीत मंडळ

४.१ दि. २५–१२–७७ ला गांधर्व संगीत विद्यालयातील विद्यार्थ्यांनी संगीत व वाद्यवादनाचा कार्यक्रम केला.

४.२ ८ जानेवारी, १९७८ ला वुटी संगीत विद्यालयातील विद्यार्थ्यांनी संगीत व वाद्य वादनाचा कार्यक्रम केला. याप्रसंगी सूरपणी डॉ. शंकुतला पळसकर यांचा सत्कार करण्यात आला.

५. नाटयसमिती

५.१ पुरुषपात्र विरहित एकांकिका लेखन स्पर्धा यंदा नोव्हेंबर, १९७७ मध्ये ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत महाराष्ट्रातून एकूण १६ स्पर्धकांनी भाग घेतला. या लेखन स्पर्धेत प्रथम

क्रमांकाचे पारितोषिक रु. १०१ श्री सुभाष सोनवणे यांच्या 'अस्पर्श,' द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक रु. ७५ प्रा. ज. रा. फणसाळकर लिखित 'एक स्वप्न वांझोटे' व तृतीय क्रमांकाचे पारितोषिक श्री. नाना ढाकुलकर यांच्या 'व्यथेची पूर्तता' ह्या एकांकिकांना देण्यात आली. नाशिकचे श्री. बाळ गाटे व शेगावचे प्रा. राम डोके या स्पर्धेचे परीक्षक होते.

५.२ डावरे एकांकिका स्पर्धा

स्पर्धेत २३ संस्थांनी प्रयोग सादर केले. विशेष आनंदाची गोष्ट अशी की स्पर्धेत भाग घेण्यासाठी सेवाग्राम, गोंदिया, खापरखेडा येथील लोक आले होते. या स्पर्धांचा निकाल पुढील प्रमाणे :––

प्रथम पारितोषिक कै. पद्माकर डावरे फिरती ढाल व ७५ रु. रोख, बंगाली असोसिएशनने सादर केलेल्या "चिऊताई चिऊताई दार उघड" या एकांकिकेस देण्यात आले.

द्वितीय पारितोषिक रु. ४५ रोख, विभागून देण्यात आले. "जगत मी आलो असा" सादर कर्ते देव बाप्पा व "खिसे कापू," सादर करते बाल रंजन.

तृतीय पारितोषिक रु. ३५ रोख, हेही पारितोषिक विभागून देण्यात आले. 'टार रोड,' सादर कर्ते रिझर्व्ह बँक रिक्रिएशन क्लब व "स्पर्धेतील नाटक" फिनिक्स थेटर.

नाटकाचे उत्तेजनार्थ प्रशस्ती पत्रक कला निकेतनने सादर केलेल्या 'महाव्दार' या एकांकिकेस देण्यात आले.

वैयक्तिक अभिनयाची पारितोषिके एकूण सहा.

पुरूष विभाग

प्रथम पारितोषिक रु. २५ रोख, पराग लुले, रंजन कला मंदिराने सादर केलेल्या 'डार्क रूम' मधील म्हाताऱ्याच्या भूमिकेसाठी.

व्दितीय पारितोषिक रु. १५ रोख, श्री. प्रदीप जोशी, मेडिकल कॉलेज, सेवाग्राम, नी सादर केलेल्या 'हंगर स्ट्राईक' मधील काळुच्या भूमिकेसाठी.

तृतीय पारितोषिक रु. १० रोख, श्री. राम गाढवे, कला निकेतनने सादर केलेल्या 'महाव्दार' मधील विदूषकेच्या भूमिकेसाठी.

स्त्री विभाग

प्रथम पारितोषिक रु. २५ रोख, कु. ममता गुर्जर, धरमपेठ महाविद्यालयांनी सादर केलेल्या "सती" मधील सुशीच्या भूमिकेसाठी.

व्दितीय पारितोषिक रु. १५ रोख, कु. रंजना शेवडे, रामनगर नागरिक मंडळाने सादर केलेल्या "आम्ही सौजन्यात आहो" मधील नानीच्या भूमिकेसाठी.

तृतीय पारितोषिक रु. १० रोख, कु. माया शिंदे, महाराष्ट्र विद्युत महामंडळानी सादर केलेल्या "झुलता फूल" मधील 'ती'च्या भूमिकेसाठी.

यावर्षीपासून प्रथमच दिग्दर्शनाची दोन व लेखनाची एक अशी तीन पारितोषिके सुरू करण्यात आली आहेत. यंदाचे बक्षिसाचे मानकरी खालील प्रमाणे :–

दिग्दर्शन

प्रथम पारितोषिक रू. ६१, श्री. गणेश नायडू, एकांकिक, "जगत मी आलो असा," सादर कर्ते देववाप्पा.

व्दितीय पारितोषिक रु. ४१ रोख, श्री. विजय वाटाणे व श्री. किशोर भांदक्कर यांना संयुक्तपणे, एकांकिका "स्पर्धेतील नाटक," सादर कर्ते फिनिक्स थेटर, दिग्दर्शनाचे उत्तेजनार्थ प्रशस्ती पत्रक डॉ. सुरेश मेश्राम, एकांकिका "प्लेजिया," सादर कर्ते मुक्तिवाहिनी.

यावर्षी पासून लेखनाचे रू. ५१ चे पारितोषिक विदर्भातील लेखकांसाठी ठेवण्यात आले. एकांकिका पद्माकर डावरे स्पर्धेत प्रथमच सादर केलेली असावी. यावर्षीचे पारितोषिक श्री. मधुकर प्रधान यांना देण्यात आले. एकांकिका 'या प्रश्नाला उत्तर नव्हते'. सादर कर्ते, राहुल क्रिडा मंडळ. लेखनाचे उत्तेजनार्थ प्रशस्ती पत्रक श्री. कमलाकर डहाट यांना त्यांच्या 'पडद्या मागील पडदा' या एकांकिकासाठी देण्यात आले.

गडकरी स्मृत्तिदिन प्रसंगी झालेल्या पारितोषिक वितरण समारंभानंतर सुभाष मंडळाने 'एक होता औरंगजेब' ही एकांकिका सादर केली.

स्पर्धेचे परीक्षक सर्वश्री नाना ढाकुलकर, मधुसुदन वेलणकर व महेश पातुरकर होते.

पारितोषिक वितरण प्रसंगी डॉ. मधुकर आष्टीकर यांनी आपल्या भाषणात डावरे एकांकिका स्पर्धेत अधिक संस्थांनी भाग घ्यावा, यासाठी पुढील वर्षापासून बक्षीसांची एकूण मिळून रकम रु. ५०१ संघ मंजूर करील असे आश्वासन दिले. तर श्री राजीव रत्नपारखी यांनी आपल्या वडिलांच्या स्मृतिप्रीत्यर्थ रु. १५१ व सूभाष मंडळाने रु. ५१ देणगीदाखल दिले. याबद्दल नाटचसमिती कृतज्ञता व्यक्त करते.

५.३ श्री सेतू माधवराव पगडी, यांची दि. १०, ११ व १२ फेब्रुवारी, १९७८ ला व्याख्यानमाला झाली.

व्याख्यानाचे विषय (१) उर्दू काव्यातील प्रवाह, (२) इतिहास संशोधनातील विनोद आणि (३) मराठी रंगभूमी–'काल, आज, उद्या' असे होते.

६. चित्रकला प्रदर्शन

६.१ दि. ११–१–७८ ला वि. सा. संघाच्या सहकार्याने "यातना १९७८" प्रदर्शन भरविण्यात आले. यात आणीवाणीतील अत्याचारांच्या चित्रांचे दर्शन श्री अरुण मेंडुले, शरद ढोमणे, नर्मदाप्रसाद श्रीवास्तव आदि कलाकारांनी रेखांकन केले.

७. परीक्षा समिती

७.१ १९७७–७८ यावर्षी प्रथम सत्रात ६०३ व व्दितीय सत्रात १९५९ या प्रमाणे एकूण २५६२ परीक्षार्थी विविध परीक्षेत सम्मीलित झालेत. गतवर्षी पेक्षा ही संख्या ६५६ ने कमी आहे. शाळांच्या बरोबर महाविद्यालयातहि केंद्रे असल्यामुळे, संपस्थितीमुळे परीक्षा तारखेत बदल केला असता तर निश्चितच संखेचे प्रमाण गतवर्षिपेक्षाही वाढले असते, परंतु महाविद्यालयांची गैरसोय झाली असती. प्रस्तुत वर्षी एकूण ५५ केंद्रात परीक्षा झाल्या.

७.२ शासकीय परीक्षेचा निकाल

मराठी प्रविण

निम्नस्तर – १ श्री. श्यामसुंदर गुप्ता, प्रथम श्रेणीत सर्वप्रथम पुरस्कार रु. १५, २ श्रीमती रोहिणी-देवी वडलामुडी प्रथम श्रेणी.

मराठी प्राज्ञ

उच्चस्तर – १ श्री. आझादकुमार जैन, प्रथम श्रेणी सर्व प्रथम प्रावीण्य व प्रथम पुरस्कार रु. २५,
२ श्रीमती नीलिमा सप्तर्षी, प्रावीण्य,
३ श्री. मोहम्मद सौ. मोहम्मद बशीरोद्दीन, प्रावीण्य,
४ श्रीमती वैंकंट नरसम्म परचुरी, प्राविण्य.

प्रथम श्रेणी

श्री. सूर्यनारायण शर्मा, श्री. के. एन. शामण्णा, श्री. गुंडपलेट कृष्णपा वैंकटेश, श्री. शम्मूनाथ भार्गव, श्री. सरोज नमनशाँह मास्तर, श्री. डॉ. डी. यस. गुप्ता, श्री. कमलकांती बॅनर्जी, श्री. चैंतन उदिआवर, श्री. सलीम साईनाथ, श्री. एस. व्ही. सुब्बाराव, श्री. रविकमल भार्गव, श्री. रुमा धीरेशचन्द्र सरकार, श्री. व्ही. राघवन.

८.	शाखा सभावृत्त

८.१	अचलपूर	शाखा सभेच्या विद्यमाने 'वाविशी संस्थान' येथे एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. त्या स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोपिक, जानकीबाई कन्या शाळेने सादर केलेल्या 'हसा मुक्ते नेली', द्वितीय क्रमाकांचे पारितोपिक, बॉईज हायस्कूल, परतवाडा, या शाळेत सादर केलेल्या 'कोवंडा पाहतो वाट उजाडण्याची' आणि तिसऱ्या क्रमांकाचे पारितोपिक, महिला मंडळ, परतवाडा, या संस्थेच्या 'झिमझिम' ह्या एकांकिकांना मिळाले. वैयक्तिक अभिनय गुणाचे बक्षीस कु. अलका मुन्शी हिला मिळाले. सर्वश्री वि. रा. खेरडे, रमेश काळापुरे व सौ. आसावारी कानेटकर परीक्षक होते आणि पारितोपिक वितरण समारंभ अचलपूरचे सिव्हील जज्ज श्री. सोहोनी साहेब यांचे हस्ते झाले.

८.२	यवतमाळ	दि. २२–११–७७ ला महाराष्ट्रातील पालक-शिक्षक संघाच्या कार्याध्यक्षा सौ. शांताबाई किर्लोस्कर यांचे भाषण झाले. डॉ. गो. वा. पंडित अध्यक्षस्थानी होते. श्री. व. ना. एकबोटे यांनी प्रास्ताविक व प्रा. गोविंद देशपांडे यांचे परिचयात्मक भाषणे झाली.

दि. १२–१२–७७ ला श्री. आ. रा. उपाख्य आप्पासाहेव देशपांडे यांच्या 'दशपदी' संग्रहाला साहित्य अकादमीचे पारितोपिक मिळाल्यावद्दल आनंद व्यक्त करण्यात आला.

दि. १५ डिसेंबर, १९७७ ला महाराष्ट्राचे महाकवी ग. दि. माडगूळकर यांना प्रा. शरच्चंद्र टोंगो, प्रा. संजविनी देशमुख व प्रा. गोविंद देशपांडे यांनी भावपूर्ण शब्दांत श्रद्धांजली वाहिली.

दि. ५–१–७८ ला नामवंत कवी श्री. पांडुरंग श्रावण गोरे, यांचा वर्धापन दिनानिमित्त सत्कार करण्यात आला.

८.३	भंडारा

४–११–७७ ला कवी श्री. निरंजन उजगरे (मुंबई) यांचे काव्यवाचन.

२६–१२–७७ ला कवी श्री. ग. दि. माडगूळकर यांच्या निधनावद्दल कार्यकारी मंडळाच्या सभेत शोक प्रस्ताव संमत केला.

८.४	खामगाव

२५–१२–७७ ते ३०–१२–७७ ला व्याख्यानमाला गुंफण्यात आली. डॉ. मधुकर आष्टीकर यांचे हस्ते उद्घाटन व व्याख्यान–प्रायोगिक मराठी रंगभूमी, श्री. व. ना. एकबोटे – खाडिलकर आणि वीर वामनराव यांचे त्यांच्या नाटचकृतीव्दारा पुण्यस्मरण, प्रा. सौ. उषाताई चौधरी, अमरावती – साहित्याची सामाजिक वांधिलकी, डॉ. यु. म. पठाण–'संत एकनाथ' व प्रा. नि. आ. वक्काणी, मेहकर, यांनी "राष्ट्रीय शेर शायरी" या विषयांवर व्याख्याने दिली.

१९–१–७८ ला गडकरी स्मृतिदिनानिमित्त डॉ. द. भि. कुळकर्णी, नागपूर, यांचे 'राम गणेश'–नवे आकलन, या विषयावर भाषण झाले.

२२–१–७८ ला प्रा. भ. श्री. पंडित, यांच्या निधनानिमित्त शोकसभा झाली.

८.५	दारव्हा

दि. १५–८–७७ प्रा. ज. सा. गवळीकर यांचे अध्यक्षतेखाली कवी संमेलन आयोजित करण्यात आले.

दि. २–१०–७७ ला गांधी जयंतीनिमित्त भाषणे झाली. अॅड. तात्यासाहेव महागावकर अध्यक्षस्थानी होते.

दि. २३–११–७७ ला श्रीमती शांताबाई किर्लोस्कर यांचे भाषण झाले.

८.६	मूर्तिजापूर

३–१–७८ ला शाखा सभेचा वर्धापन दिन साजरा झाला. त्याप्रसंगी प्रा. पंढरीनाथ मांडवगणे, यांच्या अध्यक्षतेखाली 'दारूवंदी आणि नैतिकता' यांचा अर्थाअर्थी काहीही संबंध नाही या विषयावर परिसंवाद

आयोजित करण्यात आला. दि. १–१–७८ ला कवी श्री. ग. दि. माडगूळकर यांच्या निधनानिमित्त शोकसभा झाली. दि. ४–१–७८ ते ८–१–७८ ला प्रतिभा तिडके स्मृति व्याख्यानमाला गुंफण्यात आली तो अशी. दि. ४–१–७८ ला डॉ. अ. ना. देशपांडे (श्री गुरुनानक देव), ५–१–७८ ला डॉ. अ. ना. देशपांडे (श्रेय आणि प्रेय), ६–१–७८ ला डॉ. मधुकर वाकोडे (समाज परिवर्तन), ७–१–७८ ला डॉ. बाबा आढाव (एक गाव एक पाणवठा), ८–१–७८ ला डॉ. मधुकर आष्टीकर (वाङमय आणि त्याचे प्रकार).

८.७ अमरावती

वेहरे व्याख्यानमालेतील एक पुष्प प्रा. डॉ. पंडित आवळीकर, यांनी दि. १३–२–७८ ला 'कवींचे अनुभव' या विषयावर गुंफले.

८.८ नागभीड

दि. ८–१–७८ ला संघाध्यक्ष डॉ. आष्टीकर यांचे अध्यक्षतेखाली या शाखासभेचे रितसर उद्घाटन झाले.

८.९ ब्रम्हपुरी

शाखेचा प्रथम वार्षिकोत्स व दि. २१ व २२ जानेवारी, १९७८ ला साजरा झाला. या प्रसंगी कवी सम्मेलन, परिसंवाद-विषय 'आजची मराठी रंगभूमी नाटयरसिकांचे समाधान करते काय ?' आणि 'घराण्याचा न्यायदंड,' श्री. मो. दा. देशमुख लिखित नाटक असे कार्यक्रम झाले.

इतर शाखा सभांची वृत्ते हाती आली नाहीत.

प्रा. भ. श्री. पंडित यांची साहित्यसंपदा

कविता–संग्रह :

(१) पिचलेला पावा
(२) उन्मेष आणि उद्रेक
(३) सुवास आणि रस

काव्यानुवाद :

(१) श्री कबीरवचनावली
(२) कुसुम करंडक (इंग्रजी कवितांची भाषांतरे)
(३) मेघदूत मराठी छाया (अप्रकाशित)

लेख–संग्रह :

(१) आधुनिक मराठी कविता
(२) संतसमागम
(३) केशवसुत–पांच चिंतनिका
(४) संचय
(५) सवडीचे क्षण (लघु निबंध)
(६) महाराष्ट्राच्या जीवनातील स्थित्यंतरे (व्याख्याने)
(७) आधुनिक कवितेचे प्रणेते–भाग १, २
(८) संनिचय–पूर्वार्ध व उत्तरार्ध
(९) तांबेयांचे गीतिकाव्य

संपादन

(१) समग्र केशवसुत
(२) उघडि नयन (रेंदाळकरांची निवडक कविता)
(३) विनायकाची कविता
(४) रसधारा
(५) प्रवाहिनी
(६) केशवराव भवाळकर यांचे आत्मवृत्त
(७) संगीत सौभद्र
(८) काव्यकलाप

शिशु साहित्य

(१) बीजेची कोर
(२) चवथीचा चांद
(३) अष्टमीचा चंद्र
(४) पौर्णिमेचे चांदणे
(५) सदाफुली
(६) चांदोबा आणि इतर कविता
(७) सोन्याची गाडी
(८) ऐकलेल्या गोष्टी भाग १, २, ३, ४

साभार पोच

मॅजेस्टिक प्रकाशने, गिरगाव, मुंबई–४.

अखेर जयप्रकाशजीच खरे ठरले
लेखक—वसंत नारगोळकर,
पृ. १४०; मूल्य. रु. १२.

वादळ (नाटक)
लेखक—मधुसुदन कालेलकर,
पृ. ७४, मूल्य रु. ८.

बाळ गंगाधर टिळक (चरित्र)
लेखक—गोविंद तळवलकर,
पृ. ९६, मूल्य रु. ७–५०.

बॅरिस्टर (नाटक)
लेखक—जयवंत दळवी,
पृ. ८२, मूल्य —रु. ८.

माझा रोजचा व्यायाम कोणता?
लेखक—व. ग. देवकुळे,
पृ. १४६, मूल्य—रु. ८.

सोबत नव प्रीतीची (नाटक)
लेखक—रमेश पवार,
पृ. ६९, मूल्य—

चला अन्य ग्रहांवर
लेखक—चिं. श्री. कर्वे,
पृ. ८०, मूल्य—रु. ६.

आरोग्यासाठी योगासने
लेखक—व. ल. वैद्य,
पृ. ११९, मूल्य रु. ८.

ही का ती, ती का ही (नाटक)
लेखक—मुकुंद कोठारे,
पृ. ७२, मूल्य—रु. ६.

कैवल्य लेंणे (कविता)
लेखक—कृष्णा गुरव,
पश्यंती प्रकाशन, कोल्हापूर,
पृ. १२०, मूल्य रु. १२.

पाऊलखुणा (कविता)
लेखक—नारायण रा. पेंडणेकर, कस्तुरीमृग प्रकाशन,
दादर, मुंबई–२८, पृ. ४४, मूल्य रु. ७.

पंख वेदनांचे (कादंबरिका)
लेखक—श्रीधर र. दीक्षित,
सुधा प्रकाशन, तापी नगर, भुसावळ (जळगाव),
पृ. ५९, मूल्य रु. ४.

रंग रागिणी (नाटक)
लेखक—अनिरुध्द घनःश्याम रेळे,
उषा प्रकाशन, २७०–७२, गिरगाव रस्ता, मुंबई–४,
पृ. १०२, मूल्य रु. २.

अधोरेखित (कथा)
लेखक—मोहिनी वर्दे,
मनोहर ग्रंथमाला प्रकाशन,
१६०९, सदाशिव पेठ, पुणे ३०,
पृ. १८३, मूल्य रु. १५.

दलित साहित्य–वेदना व विद्रोह
लेखक—भालचंद्र फडके,
श्री विद्या प्रकाशन, २५०, अष्टभूजा मार्ग,
शनिवार पेठ, पुणे ३०,
पृ. २२५, मूल्य रु. १८.

पुरुष
लेखक—मधुकर त्र्यंबक देव,
वसुदा प्रकाशन, जोशीवाडी, सीतावर्डी,
नागपूर, ४४००१२,
पृ. १९२, मूल्य रु. १५.

कोरल (काव्यसंग्रह)
वसुधा प्रकाशन, जोशीवाडी, सीतावर्डी, नागपूर,
पृ. ७२, मूल्य रु. ५–००.

स्पंदने (काव्यसंग्रह)
प्रकाशक—साहित्य कला सेवा मंडळ,
१२४, चंद्रनगर, नागपूर–९,
पृ. ४६, मूल्य रु. ५.

पॉरध (कादंबरी)
लेखक—निळू दामले,
अभय प्रकाशन, रुईकर मार्ग, नागपूर ४४०००२,
पृ. १०४, मूल्य रु. १०.

अस्मिता (कविता)
कवी—रघुराज मेटकरी,
प्रकाशक—साहित्य सेवा मंडळ, विटे,
पृ. ४०, मूल्य रु. २–५०.

इन्द्रधनुष्य (कथा संग्रह)
लेखक—श्रीधर र. दीक्षित,
सुधा प्रकाशन, तापीनगर, भुसावळ,
पृ. ९६, मूल्य रु. ६.

द्रविड महाराष्ट्र
लेखक—विश्वनाथ खैरे,
साधना प्रकाशन, ४३०–४३१, शनिवार पेठ, पुणे ३०,
पृ. ४२, मूल्य रु. २.

एक गाव, एक मसनवटा
लेखक—एकनाथ आवुज,
कल्पना प्रकाशन, ८५८, गुरुवार पेठ, पुणे-४११००२,
पृ. ९३, मूल्य रु. ५.

गिरीबाल—गीते
कवी—गिरीवाल,
प्रकाशक—सौ. सरोज कृ. हवालदार, शिल्पमोहिनी,
संजोग कॉलनी, शिवाजीनगर, सांगली-४१६४१६,
पृ. ३२, मूल्य रु. १–२५.

⊗ ⊗ ⊗

'युगवाणी' मासिकासंबंधी माहिती

१. प्रकाशन स्थळ	विदर्भ साहित्य संघ, झांशी राणी चौक, नागपूर- १२
२. प्रसिद्धीचा नियतकाल	मासिक, परंतु जोड अंक निघतात.
३. मुद्रकाचे नाव	क. मा. सावंत,
राष्ट्रीयत्व	भारतीय
पत्ता	व्यवस्थापक, नागपूर विद्यापीठ, मुद्रणालय, नागपूर
४. प्रकाशकाचे नाव	गो. स. देहाडराय,
राष्ट्रीयत्व	भारतीय,
पत्ता	सरचिटणीस वि. सा. संघ, झांशी राणी चौक, नागपूर-१२.
५. संपादकाचे नाव	डॉ. वि. वा. प्रभुदेसाई,
राष्ट्रीयत्व	भारतीय,
पत्ता	वि. सा. संघ, झांशी राणी चौक नागपूर-१२.
६. वृत्तपत्राची मालकी	विदर्भ साहित्य संघ, नागपूर-१२.

मी, गोपाळ सदाशिव देहाडराय, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, जाहीर करतो की वर दिलेली माहिती माझ्या माहिती प्रमाणे व समजुती प्रमाणे संपूर्णतः खरी आहे.

गो. स. देयाडराय
प्रकाशक,
सरचिटणीस, वि. सा. संघ, नागपूर-१२.

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका



मुख्य अतिथी शिवशाहीर श्री. बाबासाहेब पुरंदरे यांचा अध्यक्षांकडून सत्कार

(वि. सा. संघाच्या ५५ व्या वर्धापनदिनी).



वि. सा. संघाच्या नागभीड शाखेचा उद्‌घाटन समारंभ.

युगवाणी (Yugwani) Regd. No. 1174 M. H.



वि. सा. संघ, मूर्तिजापूर शाखेची व्याख्यानमाला



कै. पद्माकर डावरे एकांकिका स्पर्धा पारितोषिक वितरण समारंभ

प्रकाशक : गो. स. देहाडराय, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, झाशी राणी चौक, नागपूर १२.
मुद्रक क. मा. सावंत, व्यवस्थापक, नागपूर विद्यापीठ मुद्रणालय, नागपूर.

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका